आंदोलन

वर्ष 16 | अंक 12 | मूल्य 25/-

शाश्वत विकासासाठी

जुलै 2025 | पृष्ठे 36

मराठी असे आमुची मायबोली,
जरी भिन्न धर्मानुयायी असू!

पुरी बाणली बंधुता अंतरंगी,
हिच्या एका ताटात आम्ही बसू!

आंदोलन

शाश्वत विकासासाठी

जन आंदोलनांचा राष्ट्रीय समन्वयाचे मासिक संवाद माध्यम

शाश्वत विकास न्यासाचा उपक्रम

वर्ष सोळावे, अंक बारावा

जुलै २०२५ ⌘ मूल्य रु. २५/-

■ **संपादक**
मेधा पाटकर

संपादक मंडळ
प्रा. सुभाष वारे, मीनल उत्तुरकर, अमेय तिरोडकर, सुनीती सु. र., सुरेश सावंत, साधना दधीच, मिलिंद चंपानेरकर, राज असरोंडकर

■ **कार्यकारी संपादक**
संजय मंगला गोपाळ
९८६९९८४८०३

■ **व्यवस्थापक**
शरद जोशी
७०४५००३६४०

■ **पत्रव्यवहार व वर्गणी पाठविण्याचा पत्ता**
आंदोलन शाश्वत विकासासाठी
द्वारा शरद जोशी
बी/ ९, मेघमल्हार, गावंड पथ,
मल्हार सिनेमा जवळ, नौपाडा,
ठाणे (प.) ४००६०२

■ **अक्षर मांडणी**
पंकज गुरव

■ **मुखपृष्ठ मांडणी**
प्रतीक ठाकूर

■ **मुखपृष्ठावरील छायाचित्रे**
'आंदोलन'च्या संग्रहातून व इंटरनेटवरून

■ **मुद्रणस्थळ**
श्री गुरुकृपा प्रिंटर्स, माहिम, मुंबई - १६

■ **शाश्वत विकास न्यासाचे कार्यालय :**
द्वारा - ६, राघव, श्री रघुराज सोसायटी, सिंहगड रस्ता, पुणे ४११०३०

■ दर महिन्याच्या १ तारखेला प्रसिद्ध होते.

■ अंकात व्यक्त झालेल्या मतांशी संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही.

संपादकीय/मायबोलीसाठी लढण्याची संधी!/**संजय मं. गो.**/ ४
विषेश/विकास नामे विनाशलीला चहीबो नहीं: ओरिसावासींचा संकल्प!/**मेधा पाटकर**/ ५
राजकारण/भारताच्या खऱ्या राष्ट्रवादाची आठवण!/**योगेंद्र यादव**/ ८
वृत्तांत/सळसळत्या उत्साहाची नववी महाराष्ट्र महिला आरोग्य हक्क परिषद/ १०
विषेश/'आवाज बंद' करण्याचा संघटित प्रयत्न होतोय, हाच 'खरा धोका'!/**आ. श्री. केतकर**/ १२
टिप्पणी/विपुल परदेश दौरे, फलनिष्पत्ती काही नाही/**एस. एम. देशमुख**/ १५
निवेदन/इयत्ता पहिलीपासून हिंदी भाषा शिकवण्यास सक्त विरोध/**महाराष्ट्र एकीकरण समिती**/ १६
टिप्पणी/फ्रॉड राज्यकर्त्यांकडून नम्र अपेक्षा: हिंदीची सक्ती मागे घ्या!/**गणेश विसपुते**/ १७
टिप्पणी/सावधान! कृत्रिम बुद्धिमतेचा कृषी क्षेत्रातील वापर दुधारी/**सतीश देशमुख**/ १८
टिप्पणी/कृषी व्यापारात अमेरिकेसमोर गुडघे टेकण्याची तयारी/**योगेंद्र यादव**/ २०
श्रमिक जगत/मॅन्युअल स्कॅवेंजिंगचे संपूर्ण निर्मूलन झाले पाहिजे, सफाई कर्मचारी आयोगाचा आदेश/**जगदीश खैरालिया**/ २२
वृत्तांत/भूमिगत आवाज: आपल्या शहरांची पाठराखण करणाऱ्या कामगारांना सबल करण्याचा प्रयत्न/**DASAM**/ २२
आदरांजली/वाल्मिक थापर: या वाघाच्या गर्जनेचा प्रतिध्वनी सदैव उमटत राहणार!/**आरती कुलकर्णी**/ २६
आस्वाद/चिरडल्या गेलेल्या आदिवासींचे म्हणणे ठासून सांगणारे, त्यांचा आवाज उजागर करणारे संशोधन/**कुसुमताई अलाम**/ २८
टिप्पणी/धार्मिक द्वेषातून झालेल्या हिंसेला कायद्याच्या ढालीने प्रत्युत्तर/**फैजल खान**/ ३१
स्त्री मुक्ती परिषद/महाराष्ट्र स्त्री मुक्ती परिषद - समाजाच्या स्त्रीवादी परिवर्तनासाठी/**संगीता जोशी**/ ३२
वृत्तांत/'पर्यावरण दिना'पलीकडे.../**NACEJ**/ ३४

कृपया वर्गणीचे दर वाढविण्यात आलेले आहेत

कार्यकर्ते/विद्यार्थ्यांना वर्गणीत सवलत मिळू शकेल.
खाली दिलेल्या ईमेल किंवा मोबाईलवर सवलतीसाठी संपर्क साधा.
आंदोलन शाश्वत विकासासाठीची वर्गणी भरा आता ऑनलाईन!

Name of A/c.: Andolan Shashwat Vikasasathi
Bank Of India, Naigaum Cross Road Branch, Dadar (East), MUMBAI 400014. Current A/c No.: 003520110001099, IFSC: BKID0000035

वर्गणी ऑनलाईन जमा केल्यानंतर खाली दिलेल्या ईमेल किंवा मोबाईलवर मेसेज करून लागलीच कळवा! ईमेल : andolan.magazine@gmail.com मोबाईल : 9869984803/ 9869392013/ 7045003640

जन आंदोलनांचा राष्ट्रीय समन्वय - मराठी संवाद माध्यमाचा अंक - वर्ष २९ अंक ७

कार्यालय : आंदोलन शाश्वत विकासासाठी, द्वारा केमिकल मजदूर सभा, २९-३०, पहिला मजला, ए विंग, हाजी हबीब बिल्डिंग, नायगांव क्रॉस रोड, दादर (पूर्व), मुंबई - ४०००१४.

वार्षिक वर्गणी - व्यक्ती - रु. ३००/- संस्था - रु. ४००/-

१२ वर्षांची वर्गणी - व्यक्ती रु. ३,०००/- संस्था - रु. ४,०००/-

• आपण एकाहून अधिक वर्षांसाठी वर्गणी भरू शकता. • चेक/ड्राफ्ट 'आंदोलन शाश्वत विकासासाठी' ह्या नावाने काढावा. • वर्गणी शक्यतो चेक/ड्राफ्टनेच पाठवावी • तसे शक्यच नसल्यास मनिऑर्डरने पाठवावी.

• चेक/ड्राफ्ट/मनीऑर्डर ठाण्याच्या पत्त्यावरच पाठवाव्या.

संपादकीय

मायबोलीसाठी लढण्याची संधी!

सत्ता म्हटली की सक्तीचा अनिर्बंध अधिकार, असा सत्ताधार्यांचा समज बनलाय. देश उभारणीत शिक्षण सर्वात महत्वाचे. शिक्षणातून देशाचे भावी नागरिक उभे राहवते अशी सार्थ अपेक्षा. प्रत्यक्षात या शिक्षणाच्या क्षेत्रातील 'गरीब बिचारी कुणीही हाका', अशी स्थिती असलेल्या लहान मुलांवरच उफराटे मनमानी राजकीय निर्णय लादणारे सत्ताधारी म्हणजे देशाचे भवितव्य अंधारल्याची हमी! त्यामुळे मराठी भाषिकांनीच आता जागे व्हायची वेळ आलेली आहे.

महाराष्ट्राच्या शिक्षणमंत्र्यांनी राज्यात पहिलीपासून हिंदी भाषा सक्तीची करताच त्याविरुद्ध राज्यभर आगडोंब उसळला आणि ही सक्ती होणार नाही असे लागलीच सरकारला जाहीर करावे लागले. राज्यातील मुख्यमंत्र्यांपासून अनेक सत्ताधार्यांना 'सक्ती करणार नाही', असे सांगावेच लागले. अर्थात तशा आशयाचा रीतसर शासकीय अध्यादेश जोवर येत नाही तोवर या भुसभुशीत आश्वासनाला काही अर्थ नव्हता. पहिलीपासून हिंदीची सक्ती करणार नाही, ऐच्छिक ठेवू. अशी सारवा सारव करत असतानाही, सत्ताधार्यांचे याबाबतीत काही खरे नाही असे अनेकजण सांगत होते. अलीकडेच शासनाने पहिली पासून हिंदी भाषा विषय सक्तीचा निर्णय जाहीर करून टाकला आहे. या सक्ती विरूद्ध या आधी उसळलेला विरोध लक्षात घेऊन, वर्गातील वीसपेक्षा अधिक विद्यार्थी जर हिंदी ऐवजी अन्य भाषा शिकू इच्छित असतील, तर त्यांना अन्य भाषा शिकण्याची सूट मिळू शकेल, अशी मखलाशी शासनाने या आदेशात करून ठेवली आहे.

प्रत्यक्षात शासनाच्या या हिंदीच्या गुलामी मागची गोम अनेकांनी सप्रमाण दाखवून दिली आहे. पुण्याच्या योगेश कुटे यांनी शासनाच्या एकेका दाव्याची पोलखोल केली आहे. नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरणानुसार त्रिभाषा सूत्र अवलंबिण्यात आले आहे, हे शासनाचे सांगणे धादांत असत्य आहे. कोठारी आयोगाच्या शिफारशीनुसार पाचवीपासून तीन भाषा महाराष्ट्रात आधीपासूनच शिकवल्या जातात. दक्षिणेतील तमिळनाडू वगळता इतर राज्येही पाचवीपासून हिंदी शिकवतात. याउलट हिंदी भाषिक राज्यांत हे सूत्र अवलंबिले जात नाही. उत्तरेतील राज्यांत तिसरी भाषा म्हणून कोणतीच दाक्षिणात्य भाषा शिकवली जात नाही. मग या तिस्र्या भाषेचा बोजा फक्त हिंदी भाषिक नसलेल्या विद्यार्थ्यांवरच का? या नवीन धोरणात पहिलीपासून तिसरी भाषा शिकवलीच पाहिजे, असेही म्हटलेले नाही. हिंदी ही भाषा देशातील बहुसंख्यांकांची भाषा आहे. ती इतर भाषांना गिळंकृत करतेय. उलट महाराष्ट्रात मराठीचा आग्रह धरला तर, त्यालाच संकुचित विचाराचे समजले जाते.

लहान मुले कितीही भाषा शिकू शकतात. त्यामुळे पहिलीपासूनच तिसरी भाषा शिकायला हवी, असे शिक्षणमंत्री दादा भुसे यांनी म्हटले आहे. लहान मुलांनी भाषा शिकण्यासाठीच आपला जन्म घालवायचा आहे का? पहिलीच्या मुलाचे दफ्तराचे ओझे कमी करायचे असे म्हणायचे आणि त्याला पुन्हा तिस्र्या भाषेच्या बोज्याखाली मेटाकुटीस आणायाचे, हे कुठल्या शास्त्रात बसते ? "त्याच्या भवतालातून तो एखादी भाषा शिकेलही पण तिस्र्या भाषेचा औपचारीक शिक्षणाचा आग्रह योग्य नाही", असे रमेश पानसे यांच्यासारख्या शिक्षणतज्ज्ञांनीही सांगितले आहे.

पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांच्या गुजरात राज्यातही अशी सक्ती नाही. उत्तरेतील राज्यांचा तर याच्याशी काही संबंधच नाही. तमिळनाडूने तर पाचवीपासूनच हिंदी शिकवायला विरोध केला होता. पहिलीपासून हिंदीचा मुद्दा तर त्यांच्या प्राधान्यक्रमावर यायचे कारणही नाही. पहिल्या इयत्तेतील वीस विद्यार्थ्यांनी हिंदी व्यतिरिक्त भाषा शिकणार असल्याची मागणी केल्यास सरकार त्याची व्यवस्था करणार, असा दावा ही मंडळी करत आहेत. म्हणजे पहिलीच्या विद्यार्थ्यांनी आपला वेगळा गट तयार करावा आणि तशी मागणी करावी. वीस मुलांनी एकत्र यायचे म्हणजे पालकांना त्यासाठी आधी एकत्र यावे लागणार. मग त्यांनी शाळेकडे मागणी करायची. शाळेने ती शिक्षण विभागाकडे करायची. मग शिक्षण विभाग सरकारला कळविणार. सरकार कधी तरी शिक्षक

नेमणार. असे हे सारे चक्र सुरू राहणार. हे नाहीच झाले तर सरकार ऑनलाईन शिक्षणाची सोय करणार, म्हणजे यू ट्यूब वर एखादा धडा टाकून विद्यार्थ्यांना शिका म्हणणार.

आम्ही हिंदी सक्तीची केली नसून मराठी अनिवार्य केली आहे. सीबीएसई आणि अन्य बोर्डाच्या विद्यार्थ्यांना मराठी सक्तीची केली असून ती न शिकविल्यास शाळेची मान्यता रद्द करणार असं मा. शिक्षण मंत्री म्हणतात. प्रत्यक्षात, मराठी न शिकविल्यास शाळेला फक्त ५० हजार रुपये दंड करण्याची तरतूद कायद्यात आहे. शाळेची परवानगी वगैरे रद्द करणार असे काहीही होणार नाही. राज्य मंडळ सोडून अन्य किती शाळांत मराठी शिकवली जाते, याचे उत्तर शून्याच्या आसपास येईल. काही शाळांनी नियमित शिक्षक वगैरे काही भरलेले नाहीत. त्यांनीही ऑनलाईन सोय केल्याची पळवाट काढली आहे. या मराठीत उत्तीर्ण झाले पाहिजे, याचीही सक्ती नाही. एकूणच तथाकथित मराठी शिक्षणाचा आनंदच आहे.

पहिलीपासून हिंदी शिकविल्याने मराठीची दुर्दशा होईल. कारण मराठीची अवस्था आताच बिकट आहे. हिंदीच्या आक्रमणामुळे मराठीचा वापर हा प्रसारमाध्यमांमध्ये कसा होतो, हे जरी पाहिले तर मराठी मरणपंथाला लागलेली आहे,हे दिसते. अगदी मराठी प्रसारमाध्यमांच्या कार्यालयांतही तेथील कार्यालयीन भाषा ही इंग्रजी झाली आहे. न्यायालये, रुग्णालये, कार्पोरेट कार्यालये येथून मराठी केव्हाच हद्दपार झाली आहे. त्यामुळे मराठी माणूस मराठीपासून तुटला आहे. आता त्यात हिंदीची भर पहिलीपासून पडल्याने त्याला मराठीची गरजच राहणार नाही. त्यामुळे ज्या लहान वयात मराठी व्यवस्थित शिकायला हवी. तेथे हिंदी आणून बसविल्यानंतर मराठीचे काय होईल, हे वेगळे सांगायला हवे का?

'हिंदी भाषेचा एवढा दुस्वास करण्याची गरज नाही. तुम्हाला इंग्रजी चालते मग हिंदी का नको', असा प्रश्न मुख्यमंत्री फडणवीस यांनी विचारला आहे. प्रत्यक्षात इंग्रजीला पर्याय नाही असे आम्ही आता ठरवले आहे, असा रोख यामागे आहे. हिंदी भाषा मराठी विद्यार्थी पाचवीपासून शिकतोच आहे. तुम्हाला हिंदीचा एवढा पुळका का, हा खरा मुद्दा आहे. हिंदीमुळे राष्ट्रीय एकात्मता साधता येते, हाही असाच फसवा दावा आहे. व्यवसायाची गरज असल्यास तमिळ माणूस हिंदी शिकतो आणि हिंदी भाषक हा तमिळ पण शिकतो. त्यामुळे ज्याला त्याला आपापली भाषा संरक्षण करण्याची आणि तिचे संवर्धन करण्याचा घटनेनुसार अधिकार मिळाला आहे. उलट हिंदी भाषकाने दुसरी एखादी भारतीय भाषा शिकून राष्ट्रीय एकात्मता वाढविण्यासाठी भर द्यायला हवा.

मुद्दा मायबोलीच्या महतीचा आहे. राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचा भाषावार प्रांतरचनेला विरोध होता. त्यामुळे संयुक्त महाराष्ट्राच्या आंदोलनात आताच्या भाजपचे पूर्व सुरी नव्हते. त्यामुळे त्यांना महाराष्ट्र हा मराठीबहुल असावा, असे वाटत नसावे. उत्तरेत ज्या पद्धतीने हिंदुत्वाच्या नावाखाली भाजपने आपले सत्ताबळ वाढवले आहे. त्याचाच वापर त्यांना महाराष्ट्रात करायचा आहे. त्यामुळे हा धोका वेळीच ओळखला पाहिजे. आपल्यालाच आपल्या भाषेविषयी आस्था नसेल तर तिचे मरण अटळ आहे. अभिनेते, पत्रकार, कलाकार, लेखक अशांनी हिंदी भाषा सक्तीला विरोध करायला हवा. किती दिवस दाक्षिणात्य अभिनेत्यांचे त्यांच्या भाषाप्रेमासाठी कौतुक करायचे? मायबोलीसाठी लढण्याची संधी आता अनेक मराठी भाषिक महाराष्ट्र भूषण आणि पद्मभूषण मंडळींना मिळाली आहे. अन्यथा अभिजात मराठीचा दर्जा नावाला राहून, महाराष्ट्रातच मराठी अल्पसंख्यांकांची भाषा ठरेल!

- संजय मं. गो.

मुखपृष्ठावरील काव्यपंक्ती...

कवी माधव ज्युलियन यांच्या खालील कवितेतून घेतल्या आहेत.

मराठी असे आमुची मायबोली जरी आज ही राजभाषा नसे
नसे आज ऐश्वर्य या माउलीला यशाचा पुढे दिव्य आशा असे

....

....

जरी मान्यता आज हिंदीस देई उदेलें नवें राष्ट्र हें हिंदवी
मनाचे मराठे मराठीस ध्याती हिची जाणूनी योग्यता थोरवी

विषेश

विकास नामे विनाशलीला चहीबो नहीं: ओरिसावासींचा संकल्प!

मेधा पाटकर

5 जून होता है पर्यावरण दिन! वैश्विक स्तरावर त्या दिवशी चर्चा होते, विवाद व संवादही! 5 रोपे लावून सोपे नसते, निसर्गप्रेम दर्शवणे! मात्र, ते असते, भासवणे ! अगदी वर्षभर पर्यावरणाचे होत असते तरी काय? याचे उत्तर ओरिसा सारख्या निसर्गसमृद्ध राहिलेल्या राज्यातील घडामोडीं मधून सहज मिळू शकते. त्या राज्यास 'भांडवली गुंतवणूकीच्या आधारे 1 नंबरचे राज्य' नवीन पटनाईकजी, भूतपूर्व मुख्यमंत्र्यांनी जाहीर केले, तेव्हापासून आदिवासी व अन्यही त्या त्या जिल्ह्यातील मूळ निवासींना संघर्षच संघर्ष करावा लागतो आहे. ओरिया भाषेतील गाण्यातून उठणारा आवाज त्यांची जिद्द व बांधिलकी दर्शवतो आहे:

''संग्रामी आमी, संग्रामी आमी...
संग्राम करी जिबो....
संग्राम करी, देशोपायी, जीवनकु दर्द देबो!''

यातूनही दिसते ते हेच की त्यांचा संघर्ष हा केवळ स्वत:साठी नाही तर देशासाठी आहे. देश वाचवण्यासाठीच जल, जंगल, जमीन, पहाड, नद्याही वाचवण्याची गरज, ज्यांनी पिढ्यानपिढ्या, निसर्गासहच जगत असताना, ही नैसर्गिक संसाधने वाचवली, टिकवली, त्यांनाच पटते व सत्याग्रही बनवते.

अशाच आदिवासींच्या सान्निध्यात पर्यावरण दिवस घालवण्यासाठी, त्यांच्या देशभक्तीस व जनशक्तीस सलाम करण्यासाठी ओरिसातील नि:स्वार्थी सक्रिय कार्यकर्ते लिंगराजभाई व नरेन्द्र मोहन्तीसह मी ही पोहोचले. रायगडा रेल्वे स्टेशनवर भल्या पहाटे 4.30 वाजता उतरले तेव्हा एक-दोन वरिष्ठ पत्रकारांचा पुष्पगुच्छ स्वीकारण्याआधीच स्वागत झाले ते पोलिसांच्या धष्ट पुष्ट टीमकडून. रायगडा जिल्ह्यात प्रवेशबंदी त्यांनी जाहीर केली तेव्हा त्यांना खिशात कोंबलेला जिल्हाधिका–यांचा आदेश आम्ही दाखवायला लावला. बंदी होती ती 25 कार्यकर्त्यांना, रायगडा जिल्ल्यात येण्यास, एक दिवस नव्हे, दोन महिन्यांसाठी. कारण दिले होते, जिथे बॉक्साइटच्या खाणींचे प्रकल्प आहेत तिथे आम्ही पोहोचल्याने कायदा व सुव्यवस्था बिघडेल, ही शंका व्यक्त करुन! नम्रपणे का होईना, त्या सिजीमाली पहाडी, जंगली क्षेत्रात या प्रकल्पाबद्दल परस्परविरोधी विचारांचे गट असल्याने ही आशंका असल्याचे सांगून आम्हाला VIP lounge मध्ये बसण्याचा आग्रह पोलीस करत राहिले, जे आम्ही नाकारले... स्टेशनवरच ठाण मांडले, तेव्हा पत्रकाराच्या घरी जाणे मंजूर केले. आदेश पालनाची गुलामी मानणारे पोलीस मजबूर होते... ज्यांनी अखेर तीन जीप्स भरून, आमच्यासह प्रवास केला, भोजन इ. व्यवस्थेसह 10 तास हिरव्यागार प्रदेशातून प्रवास म्हणजे एक प्रकारे eco tourism चा अनुभव दिला व रात्री 9 वाजता बेरहामपूर जिल्ल्यात पोहोचवले, त्या पोलिसांनाही खंत होती व पर्यावरणीय संरक्षणाबद्दल चिंता होती हेच भासले.

प्रश्न उठला सर्वत्र व आमच्याही मनात तो हाच की अखेर आम्हा अहिंसक सत्त्याग्रही मार्गानेच चालणाऱ्या कार्यकत्यांना आदिवासी क्षेत्रातील जनसभेसाठी पोहोचू न देणाऱ्या सरकारला भय कसले? हेच ना की ज्या प्रकल्पाला नियमगिरी वाचवण्यासाठी सर्वोच्च न्यायालयाने ग्रामसभांचा अधिकार मंजूर केला होता व डोंगरिया कोंढ या primitive जमातीतील स्त्री - पुरुषांनी त्याचा आधार घेऊन जीत मिळवली होती... तशाच प्रकल्पाला सोजीमाली पर्वतीय क्षेत्रात पुढे ढकलण्याबाबत आमच्या सारख्यांनी आदिवासींना मार्गदर्शन व समर्थन देऊ नये? जैविक विविधतेने भरलेले, हिरव्यागार जंगलानी आच्छादिलेले, जलधारा व नद्यांचे उगमस्थान असलेले, आदिवासींच्या आजीविकेचा आधार व पर्यावरणीय समृद्धी तसेच आदिवासींच्या श्रध्देचे स्थान असलेले असे पर्वत हे अब्जाधीश कंपन्यांना, ज्यात 'वेदान्त' बरोबरच अदानींनाही स्थान मिळाले आहे, ते वाचवण्याची इच्छा ही स्थानिकांचा स्वार्थ आहे की परमार्थ, याचा विचार करणे आवश्यक आहे. आम्ही त्यांच्या कानूनी व मैदानी लढ्यामध्ये समर्थक बनू तर अजून या खाणींचा पर्यावरणीय व सामाजिक परिणामांचा अभ्यास झालेला नाही, बाधित क्षेत्रात जनसुनावणी झालेली नाही व 'पेसा' कायद्यानुसार कुठल्याही आदिवासी गावातील संसाधनावर आधारित कोणताही प्रकल्प हा ग्राम–सभेच्या मंजुरीविना थोपवू शकत नाही, हे वास्तव त्यांच्या पुढे प्रस्तुत करु, हेच तर शासक टाळतात. कोट्यवधींचे लाभार्थी, काही राजकीय नेते, क्वचित् गावकरींनाही आपल्याशी जोडून घेतात... त्यांना जिल्हा प्रवेशबंदी वा जिल्हाबदल भोगावा लागत नाही हेही सर्वच जाणतात. मात्र या परिस्थितीमध्ये

संविधानाने दिलेला अभिव्यक्तीचा, सत्याग्रहाचा अधिकार सामाजिक कार्यकर्त्यांना नाकारणे शासनकर्ते अत्यावश्यक मानतात, हेच खरे.

ओरिसासारख्या राज्यात काशीपूर मधील ॲल्युमिना प्रकल्प, कलाहंडीतील खाणी प्रकल्प, बोलांगीर सारखा धरण प्रकल्प लसेच पूर्वी पॉस्को व आता जिंदाल स्टील वर्क्सचा जगतसिंगपूर मधील प्रकल्प, या साऱ्याचे अन्यायपूर्ण परिणाम भोगलेले पाहिल्याने, अभ्यासल्याने निसर्गाचा विनाश, विस्थापन व अत्यंत बीभत्स विषमताच विकासाच्या नावाखाली साधली जाण्याचा अनुभव अनेकानेक अहवालांत नोंदलेला आहे. जनसुनावणीमध्ये, क्षेत्रीय भेटीमध्ये, अश्रू गाळत समोर येणाऱ्या निसर्ग-निर्भर समुदायांमधील महिला सत्य समोर मांडत आल्या व जेलही भोगत आल्या आहेत. तरीही भारतातील एकूण कोळसा व लोह खनिजापैकी सुमारे 30% हून अधिक तर-बॉक्साइट पैकी 85% हून अधिक संपदा ही ओरिसा राज्यात असल्याने, आजच्या आयात-निर्यात अर्थव्यवस्थेद्वारा अब्जावधी रुपये कमावणाऱ्या कंपन्या व त्यांच्याशी गठबंधन असलेले कुठलेही सरकार या संपदेवर नजर ठेवून राहते, यात नवल ते काय? मात्र याचा परिणाम निसर्ग रक्षक मूळ निवासी, जंगलवासी, शेतकरी, शेतमजूर, पशुपालक समुदायांना भोगावा लागतो तेव्हा ते हिमतीने, अत्याचार भोगूनही लढतात, हेही कसे नाकारणार? लोकशाही च्या प्रक्रियेत, ओरिसासारख्या राज्यातील 1950-60 च्या दशकातील वन व वनवासींचा अधिकार मानणारे कायदेनियम असोत की 1996 चा 'पेसा' कायदा याच बरोबर संवैधानिक समता-न्याय-स्वातंत्र्याची मूल्य चोकटही पायी तुडवली जाते तेव्हा या परिस्थितीत सत्ता-वादी न होता, समाज-वादीच राहिलेले आम्ही कार्यकर्ते चूप का व कसे राहणार?

आज जलवायु परिवर्तनासारख्या मुद्यावर कोट्यवधी रुपये खर्चून कोपनहेगन, पॅरिस, ग्लासगोला होणाऱ्या राष्ट्रप्रमुखांच्या संमेलनात भारताचेही वरिष्ठ प्रतिनिधी, कार्बन निधी, कार्बन उत्सर्जन थांवबण्याचे, पर्यावरण वाचवण्याचे जाहीर करतात तर विविध प्रकल्पांद्वारा निसर्गाशी धूळघाणीचे कार्य पुढे कसे नेतात? जलनियोजन असो की विद्युत निर्माण, सारे काही केंद्रीकृत व्यवस्थेद्वारा भव्यतेस व भौतिकतेसच पुढे रेटणाऱ्या तंत्रज्ञानाद्वारा पर्यायी, शाश्वत विकासप्रक्रियेस दुर्लक्षून आंतरराष्ट्रीय पातळीवर पारित होणाऱ्या दिमाखदार करार मदारांचे तसेच भारतीय स्वातंत्र्योत्तर काळात सतत पुढे गेलेले पर्यावरणीय कायदे (जसे Air Act, 1974; Water Act, 1981; Forest Conservation Act, 1980, Environmental Protection Act, 1986 तसेच EIA notification -2006) आणि संविधानातील अनुच्छेद 39, 19, 48-A या सर्वासर्वाचे उल्लंघन व कमजोरीकरण सतत अनुभवास येते आहे. स्थानिकांची जनसुनावणी न घेता वा त्याचा रिपोर्ट विकृत करत, पंचायती राज्य कायदा, पेसा कायदा तसेच पाचवी व सहावी अनुसूची (जी सुद्धा केवळ उत्तर–पूर्व भारतातील राज्यांनाच नव्हे तर सर्वच राज्यात लागू होणे आवश्यक आहे) दुर्लक्षून प्रकल्प पुढे रेटले जात आहेत. विकेंद्रीकरण व ग्रामसभा, वॉर्डसभा (खरे तर वस्ती सभा) या एककांना विकास नियोजनाचे अधिकार देणाऱ्या संविधानातील 73वे, 74 वे संशोधन झाल्यापासून (1992) जोडलेल्या अनुच्छेद 243, 244 चे ही पालन कुठे होते आहे, ज्याची तातडीची गरज आहे. हे आज जलवायु परिवर्तनाच्या परिणामांतून शासन व समाज समजू शकले नाहीत तर निसर्गच काय, पर्यावरणाचा हिस्सा असलेली मानवजात व सर्व जीवजंतू प्राणी व प्राणवायूही वाचवणे शक्य कसे होईल? संविधानातील अनुच्छेद 51-A मध्ये (भारतीय नागरिकांना / लोकांना समर्पित केले असताना), आपले पर्यावरण वाचवण्याचे, समृद्ध करण्याचे कर्तव्य पार पाडण्याचे आपले अधिकार संघर्ष व निर्माणातून पुढे नेणे व हे अधिकार ठासून मांडणे सुरुच ठेवणे गरजेचे नाही का? शासन विकास नियोजनात 'शोषित, पीडित, वंचितांचा' सहभाग नाकारते व पैशाच्या भांडवली, बाजारी निवेशकांनाच निर्देशक ही मानते, तेव्हा प्रश्न उठवून पर्यायी, निरंतर विकासाचा आग्रह धरण्याचा, त्यासाठी सत्याग्रही बनण्याचा, खोट्या आरोपांना झेलूनही हिमतीने कार्यरत रहाण्याचा आपला अधिकार कोण नाकारू शकतात, हा ही प्रश्न उठवणे आवश्यक आहेच.

यामध्ये सामाजिक कार्यकर्ते व समाज कमी पडतो, तेव्हा जिथे जनसंघर्ष उभा राहतो, तिथे पोहोचणे, जागरण करणेही अत्यावश्यक भासते. ओरिसातील ऋषिकुल्य नदीच्या खोऱ्यात, ग्रामीण क्षेत्रातील नदी किनारीच्या शेतकरी, शेतमजूर, मच्छिमार भावाबहिणीनी 6 जून रोजी आमचे जोरदार स्वागत केले, ते कशापोटी? ही नदी भारतभरच्या अन्य नद्यांप्रमाणे बरेच काही भोगते आहे. 5 उपनद्यांवर धरणे बांधून धरणाखालच्या क्षेत्रात, पर्याप्त जलप्रवाह (e-flow) निश्चित न केल्याने ऋषिकुल्य आज तहानली आहे. अवैध वाळू खाणी, नर्मदा, तापी, पार्वती, केरळ पर्यंतच्या नद्यांच्या काठी – सुद्धा सुरु आहे तर ऋषिकुल्याच्या

जलचक्रावरही माफिया आघात करत आहेत. मत्स्यप्रजाति तर नष्ट झाल्याच आहेत ज्यामुळे आजीविका प्रभावित झालेल्या महिला आक्रोशित आहेत परंतु नदीने पिढ्यानपिढ्या रोखलेले समुद्री जल आता नदीमध्ये घुसल्याने नर्मदेप्रमाणेच खारेपण भोगणारी जनता पेयजलासाठीही तडफडते आहे. अशा परिस्थितीत, नव्या उद्योगांची स्थापना, नुकत्याच झालेल्या मुख्यमंत्र्यांतर्फे उद्घाटनातून जनजनांना संदेश मिळाला आहे की ऋषिकुल्य नदीवर एक मोठे धरण बांधण्याची योजना आहे व ती कुणासाठी हे ही स्पष्ट आहे. विशेष बाब हीच की प्रफुल्ल सामांतरा व अन्य अनेक बुद्धिजीवी, श्रमजीवी, कार्यकर्ते युवा साथी साऱ्यांनी मिळून गंजाम जिल्हा व बेरहामपूर सारख्या नगरातील जनतेच्या जलाधिकारासाठी एक ऋषिकुल्य बचाओ कृती समिती स्थापन करून सक्रिय ठेवली आहेच पण ओरिसातील जिल्ह्या जिल्ह्यातील – बालिया पाल, कोरापुट, कलाहंडी, थालचेर, अंगुल गंजाम ई. संघटनांनी पक्षविरहित समन्वय साधून एक विशेष भरगच्च उपस्थितीत जाहीर संमेलनात संकल्प घेतला आहे, ओरिसाभरच्या नद्या, पहाड, जंगल, खनिज, शेती वाचवण्याचा !

एक पर्यावरण दिवस व विश्वस्तरीय संमेलन नव्हेत तर धरातळी जनशक्तीद्वारा, आंदोलनजीवी होऊन आपला निसर्ग व मानव आणि एक राज्य नव्हे तर पूरा देश व पृथ्वी वाचवण्यासाठी प्रयत्नशील राहणाऱ्यांना सलाम !

medha.narmada@gmail.com

ओडिशामधील जनआंदोलनांवरील सरकारी दडपशाहीवर देशभरातून निषेध

२४ कार्यकर्ते व आदिवासींना दोन महिन्यांसाठी रायगडामध्ये प्रवेशबंदी करणाऱ्या आदेशाचा निषेध करत भारतभरातील नागरिकांनी रायगड जिल्हाधिकाऱ्यांना पत्र लिहून तात्काळ हा अदेश मागे घेण्याची मागणी केली.

५ जून रोजी जागतिक पर्यावरण दिनानिमित्त आयोजित शांततामय कार्यक्रमासाठी रायगडाला गेलेल्या मेधा पाटकर, लिंगराज प्रधान, नरेंद्र महांती आणि हरा बाणिया यांना सकाळी ४.३० वाजता रायगडा रेल्वे स्थानकावर पोहोचताच ताब्यात घेण्यात आले. जन चळवळीतील सामाजिक कार्यकर्त्यांवर ओडिशा पोलिसांनी जे कठोरपणे निर्बंध आणले व त्रास दिला, त्याचा देशभरातील सामाजिक कार्यकर्ते, शिक्षणतज्ज्ञ, कायदेतज्ज्ञ व विविध लोकचळवळीतील कार्यकर्त्यांनी तीव्र निषेध केला आहे. या संदर्भात त्यांनी रायगडा जिल्हाधिकाऱ्यांना एक ठाम शब्दांत लिहिलेले पत्र पाठवले आहे.

या पत्रात त्यांनी ४ जून २०२५ रोजी जिल्हाधिकाऱ्यांनी काढलेल्या आदेश क्र. १५५६/VII-१४/२०२५ बद्दलही तीव्र नाराजी व्यक्त केली असून, या आदेशानुसार २४ कार्यकर्ते व आदिवासींना रायगडात प्रवेश व आंदोलनांमध्ये सहभाग घेण्यास दोन महिन्यांसाठी मनाई करण्यात आली आहे. **रायगडा हा अनुसूचित क्षेत्र (पंचायत विस्तार अधिनियम, PESA आणि वनहक्क कायदा, FRA) अंतर्गत येतो**, जिथे ग्रामसभा व पंचायतींना विकासविषयक निर्णय घेण्याचा अधिकार आहे. हा नवीन आदेश त्यांच्या या अधिकारावर आणि आंदोलनाच्या हक्कावर मर्यादा आणणारा आहे. नागरिकांनी या आदेशाला अन्यायकारक व असंवैधानिक ठरवत तो तात्काळ आणि बिनशर्त मागे घेण्याची मागणी केली आहे.

NAPM व NAJAR यांच्या पुढाकाराने देशभरातील नागरिकांनी याविरोधात जिल्हाधिकाऱ्याला पत्र पाठवले असून पुढील मागण्या केल्या आहेत:

१. ४ जूनचा बंदी आदेश तात्काळ व बिनशर्त मागे घ्यावा.

२. नागरिक, कार्यकर्ते व आदिवासींच्या अभिव्यक्ती, शांततेत आंदोलन व प्रवासाच्या मूलभूत हक्कांचा आदर केला जावा.

3. PESA व FRA अंतर्गत ग्रामसभांच्या अधिकारांचे संरक्षण करावे.

४. जमिनीच्या लुटी व पर्यावरण नाशाविरोधातील आंदोलने दडपण्याचे प्रयत्न थांबवावेत.

५. सीजिमाली परिसरातील गावकऱ्यांवर होणारे दडपशाही, धमक्या, अटकेची कारवाई थांबवून खटले मागे घ्यावेत. स्थानिक चळवळींसोबत संवाद साधून खाण प्रकल्पासाठी सुरू असलेली जमीन संपादन प्रक्रिया थांबवावी.

राजकारण

भारताच्या खऱ्या राष्ट्रवादाची आठवण!

योगेंद्र यादव

राष्ट्रवादाच्या नव्या अवतारात इतरांना दूर लोटल्याशिवाय, 'आपण' आणि 'ते' अशी दुहीची भाषा बोलल्याशिवाय राष्ट्राविषयी आपलेपणा निर्माण करता येत नाही. असल्या नकली राष्ट्रवादाच्या समर्थकांना मणिपूर किंवा इतर कुठलेच प्रश्न सोडवले पाहिजेत, असे वाटत नाही.

'विविध भारती राष्ट्रवादा'पासून ते 'हिंदी हिंदू हिंदुस्थान' अशा राष्ट्रवादाकडील आपली वाटचाल ही सध्याच्या काळातील सर्वांत मोठी शोकांतिका आहे. मात्र या साऱ्या बदलाचा संपूर्ण दोष उजव्या विचारधारेच्या प्रचारकांना देणे चुकीचे ठरेल. भारतातले उदारमतवादी, धर्मनिरपेक्ष आणि पुरोगामी अभिजनही या अवस्थेला काही अंशी जबाबदार आहेत.

भारताच्या व्यापक आणि सकारात्मक राष्ट्रवादाची जागा ही एका कट्टरतावादी गटाच्या उन्मादाने घेतली असेल तर स्वातंत्र्योत्तर भारतात सत्ताधारी असलेल्या विचारधारेचे, उथळ आधुनिकतेचे आणि नाळ तुटलेल्या विश्वबंधुत्वाचे ते अपयश आहे. भावनिक, सांस्कृतिक आणि आध्यात्मिक आशयाचा अभाव असल्याने भारताच्या स्वातंत्र्य चळवळीचे लोकांशी असलेले आत्मीय नाते जपण्यात या विचारधारेला अपयश आले. युरोपीय राष्ट्रवादाने केलेल्या दुष्टपणाचा अपराधबोध मनाच्या तळाशी ठेवून भारतीय अभिजनांनी राष्ट्रवादाची संकल्पनाच सोडून दिली. त्यानंतर स्वातंत्र्य चळवळीत काडीचंही योगदान नसणाऱ्या मंडळींच्या हातामध्ये राष्ट्रवाद गेला यात काय आश्चर्य!

त्यामुळेच भारतीय राष्ट्रवादाचा वारसा पुन्हा जिवंत करणं, त्यावर आपला दावा पुन्हा सिद्ध करणं हे आताच्या काळातील सर्वांत मोठे राजकीय आणि वैचारिक आव्हान आहे.

अलीकडचा भारत–पाक संघर्ष आणि त्यानंतरच्या घटना यांमधून भारतीय राष्ट्रवादाला लागलेली उतरती कळा लक्षात येऊ शकेल. आपण अति राष्ट्रवादी झालो आहोत, असे नव्हे; तर आपला राष्ट्रवाद दुसऱ्यांची नक्कल करणारा ठरू लागला आहे, ही खरी समस्या आहे. भारतीय राष्ट्रवादाचा समृद्ध वारसा नष्ट होऊ लागला आहे आणि नवा राष्ट्रवाद जर्मन हुकूमशहांच्या अंधानुकरणातून, इस्त्रायलची नक्कल करून आकाराला येऊ लागला आहे. 'हिंदू पाकिस्तान' अशी प्रतिकृती निर्माण करण्याचा प्रयत्न होतो आहे. याबद्दल केवळ नरेंद्र मोदी, भाजप आणि रा. स्व. संघ यांना दोष देऊन उपयोगाचे नाही.

अली खान मोहम्मदाबाद यांच्या खटल्यातला निकाल आणि मुळात या घटनेची पार्श्वभूमी दोन्ही धक्कादायक आहे. राजकीय सूडबुद्धीने केलेल्या कृतीला न्यायालयाने अधिष्ठान मिळवून दिले. कायद्याचे राज्य, संवैधानिक हक्कांचे रक्षण, अभिव्यक्ती स्वातंत्र्य या सगळ्याचा विचार केला गेलाच नाही. कदाचित या खटल्यातील वकील न्यायालयाला ओळखून असल्याने तो या मुद्द्यांना चर्चेत आणण्याच्या फंदातही पडला नाही. सर्वोच्च न्यायालयातील चर्चा पारावरच्या गावगप्पांसारखी किंवा मुख्याध्यापक आणि पालक यांच्यातील असावी तशी झाली. हक्कांपेक्षाही राष्ट्रीय हित अधिक महत्त्वाचे आहे, युद्धग्रस्त देश कोणत्याही प्रकारची असहमती सहन करू शकत नाही, असे जे सांगितले गेले ते केवळ धक्कादायक आहे. मोहम्मदाबाद यांनी अगदी देशाच्या भूमिकेबाबत केलेली सूक्ष्म आणि चिकित्सक मांडणीही सहन केली जाणार नाही, असाच संदेश दिला गेला.

नागरिकांचे स्वातंत्र्य आणि राष्ट्रवाद यातील एक काही तरी सक्तीने निवडावेच लागेल, अशी भारतीय राष्ट्रवादाची परंपरा नाही. १९४२ च्या लढ्याचे नायक जयप्रकाश नारायण काश्मीर/ नागालॅण्डबाबत सत्य बोलायला किंवा १९६२ च्या युद्धानंतर चिनी लोकांसोबत आपली मैत्री असल्याचे जाहीर करायला मुळीच कचरले नाहीत. हे सत्य बोलणे आपले कर्तव्य आहे असे त्यांना वाटत होते. कर्तव्य आणि राष्ट्रवाद यांमध्ये काही संघर्ष आहे, असं त्यांना कधी वाटलं नाही.

नागरिकांच्या स्वातंत्र्याच्या विरोधात राष्ट्रवादाला उभे करणे म्हणजे राष्ट्रवादाला लोकशाहीच्या विरोधात उभे करणे होय. ज्यांनी 'ऑपरेशन सिंदूर'ला बिनशर्त पाठिंबा दिला त्यांनीही लोकशाहीच्या चौकटीत प्रश्न उपस्थित केले तर त्यांना 'राष्ट्रद्रोही' असे संबोधले जाते आहे. शस्त्रसंधीच्या बाबत अमेरिकन राष्ट्राध्यक्षांनी सार्वजनिकरित्या केलेले अनेक दावे भारताच्या अधिकृत भूमिकेशी विसंगत आहेत. तरीसुद्धा प्रश्न सरकारला विचारले जात नाहीत तर सरकारच्या मौनावर प्रश्न उपस्थित करणाऱ्यांनाच उलट जाब विचारला जातो आहे. जेव्हा सरकार

आणि देश हे समानार्थी शब्द होतात तेव्हा ‘सर्वोच्च नेत्या’चं आगमन होतं. कोणीही त्या नेत्याला प्रश्न विचारला की तो प्रचारकी युद्ध सुरू करू शकतो, लष्कराचा पोषाख घालून मिरवू शकतो आणि काहीही करू शकतो ! ही आपली परंपरा नाही. हा आपला वारसा नाही. अटल बिहारी वाजपेयी यांनी १९६२ च्या युद्धातल्या पराभवानंतर संसदेचे विशेष सत्र आयोजित करण्याची मागणी केली होती किंवा नंतरच्या काळात जवाहरलाल नेहरूंचे कडवे टीकाकार असलेल्या राम मनोहर लोहियांनी चीनविषयक धोरणाबाबत सरकारचे वाभाडे काढले होते. कोणीही त्यांना देशद्रोही म्हटले नाही.

या सगळ्या उतरत्या कळेतला अखेरचा टप्पा म्हणजे देशालाच लोकांच्या विरोधात उभे करणे. विचारधारेच्या, सांस्कृतिक किंवा प्रांतीय मतभेदाच्या आधारे कोणालाही ‘देशद्रोही’ असे म्हणण्याचा मग कांगावा करता येतो. एकदा देशद्रोही हा शिक्का मारला की तर्काचा मृत्यू होतो. धार्मिक दुही माजवण्याचा गुन्हा प्रा. महम्मुदाबाद यांच्यावर दाखल होतो, तर ज्यांनी पहलगाम हल्ल्यानंतर मुस्लिमांच्या आणि काश्मिरींच्या विरोधात गरळ ओकली त्यांच्या विरोधात मात्र गुन्हे दाखल होत नाहीत ! कर्नल सोफिया कुरेशी यांचा महम्मुदाबाद यांनी अपमान केला आहे असे सांगितले जाते आहे. ज्या भाजपच्या मंत्र्याने सोफिया कुरेशी यांना ‘पाकिस्तान्यांची बहीण’ म्हटले, त्यांनी म्हणे सोफिया कुरेशींचा अपमान केलेला नाही ! ‘एक राष्ट्र एक अमुक’ अशा प्रकारचा अजेंडा एकतेचे रूपांतर पोकळ एकसारखेपणात करतो. अशा अजेंड्यासाठी एका शत्रूची आवश्यकता असते. हा अजेंडा राबवणाऱ्यांना पहलगामच्या भीषण हल्ल्यानंतर राष्ट्रीय एकात्मतेच्या वेळीही एखाद्या अंतर्गत शत्रूची गरज भासते. भारताचा राष्ट्रवाद हा अशा स्वरूपातला नव्हता. अशा वेळी देश कठीण प्रसंगातून जात असताना वेगवेगळे समूह आणि प्रदेश जोडणाऱ्या सरदार पटेलांची आठवण येते.

आपल्या स्वातंत्र्यलढ्याच्या वारशातून उदयाला आलेला राष्ट्रवाद याहून खूप वेगळा होता. जॉन ए. पॉवेल यांनी म्हटल्याप्रमाणे भारताचा राष्ट्रवाद ‘आपण आणि ते अशी दरी निर्माण न करता आपलेपणातून’ तयार झालेला आहे. देशाच्या आतला किंवा बाहेरचा शत्रू उभा करून हा राष्ट्रवाद उभा राहिला नाही तर सर्वांमध्ये राष्ट्रीय ऐक्य, आपलेपणा वाटून हा राष्ट्रवाद तयार झाला. त्याचा शत्रू एखादे विशिष्ट राष्ट्र नसून वसाहतवादी व्यवस्था हा होता. आपल्या राष्ट्रवादाने आपल्याला शेजारी राष्ट्रांना शिव्या घालण्याची, त्यांची निंदानालस्ती करण्याची गरज भासू दिली नाही तर आशिया, आफ्रिका, लॅटिन अमेरिका इथल्या वसाहतवादाच्या विरोधातील लढ्यातून आणि आफ्रिकेतल्या वंशवाद विरोधी चळवळीशी भारतीय राष्ट्रवादाने आपल्याला जोडले. भारताच्या सर्व लोकांमध्ये ऐक्य निर्माण व्हावे, यासाठी प्रयत्न केले गेले. या राष्ट्रवादाने भाषिक बहुलतेचा, विविध प्रांतांचा आणि धर्मांचा आदर केला आणि त्यातून भारतीय असण्याची विलक्षण सुंदर ओळख गुंफली. सगळ्यांनी एकसारखेच असले पाहिजे, असा आग्रह भारतीय राष्ट्रवादाने धरला नाही आणि ऐक्याला गृहीत धरले नाही. ऐक्य निर्माण करण्यासाठी प्रयत्न केले. अल्पसंख्याकांच्या हक्कांची बहुसंख्याकांनी भलामण केली. त्या राष्ट्रवादामुळे हिंदी भाषिक बिगर हिंदी भाषिकांच्या हक्कांसाठी लढत होते तर बिगर हिंदी भाषिक नागरी प्रचारणी सभेसाठी काम करत होते.

युरोपीय एकसाची राष्ट्र राज्याच्या प्रारूपाऐवजी या राष्ट्रवादाने राज्य राष्ट्राचे नवीन प्रारूप उभे केले. त्यातून खोलवरचे भेद आणि लोकशाही यांचा एकत्रित समावेशी पद्धतीने विचार केला. राष्ट्र म्हणजे काय, यावरच्या वादविवादाचे भारतीय राष्ट्रवादाने स्वागत केले. युरोपीय राष्ट्रवादाप्रमाणे आपण या प्रश्नाला टाळले नाही.

या भारताच्या राष्ट्रवादावर आता हल्ला होतो आहे. राष्ट्रवादाच्या या नव्या अवतारात इतरांना दूर लोटल्याशिवाय, ‘आपण’ आणि ‘ते’ अशी आक्रमक दुहीची भाषा बोलल्याशिवाय राष्ट्राविषयी आपलेपणा निर्माण करता येत नाही. असल्या नकली राष्ट्रवादाच्या समर्थकांना मणिपूरचा गंभीर प्रश्न सोडवला पाहिजे, असे वाटत नाही किंवा पंजाब हरियाणा यांच्यातील संघर्षाचे निराकरण झाले पाहिजे किंवा कर्नाटक आणि तमिळनाडूमधील तंटे सोडवले पाहिजेत, असे वाटत नाही. त्यांच्या विचारांची झेप काश्मीरपलीकडे नाही आणि काश्मीरकडेही ते केवळ संपत्तीचा एखादा तुकडा असल्याप्रमाणे पाहतात. यातून मुस्लिमांना शत्रू बनवले जाते आणि भारताच्या एकतेला बाधा पोहोचते. बाह्य संबंधांच्या पातळीवर विचार केला तर हा राष्ट्रवाद म्हणजे शक्य होईल तेव्हा शक्तिप्रदर्शन करणे आणि आवश्यक असेल तेव्हा शरणागती पत्करणे ! हा राष्ट्रवाद पाकिस्तानच्या विचाराने इतका झाकोळून गेला आहे की आता भारत आणि पाक यांचा जागतिक पातळीवर एकत्रितपणेच विचार केला जातो आहे. शेजारी राष्ट्रांना दमदाटी करत शिव्याशाप दिल्याने आता आपण चहू बाजूंना प्रतिकूल देशांनी घेरले गेलो आहोत.

(पान १५ वर)

वृत्तांत

सळसळत्या उत्साहाची नववी महाराष्ट्र महिला आरोग्य हक्क परिषद

नववी महाराष्ट्र महिला आरोग्य हक्क परिषद मागच्या एप्रिल महिन्यात पालघर जिल्ह्यात आयोजित केली होती. पालघर जिल्ह्यातील नैसर्गिक संसाधनं, पर्यावरण आणि लोकसमुहांची अनेक महाकाय प्रकल्पांमुळे एक प्रकारे कोंडी झाली आहे. जुना तारापूर अणू ऊर्जा प्रकल्प असो किंवा आताचा समृद्धी महामार्ग, बुलेट ट्रेन, वाढवण बंदरासारखे जमीन, पाणी, हवा, जंगला सारख्या नैसर्गिक संसाधनांचा अनिर्बंध, अवैज्ञानिक आणि अमानवी वापर करणारे प्रकल्प असोत, येत्या काळात हे सर्व पालघर जिल्ह्याचा श्वास कोंडतील की काय ही रास्त भीती चळवळीतील अनेक कार्यकर्त्यांच्या मनात आहे. या प्रकल्पांचा आणि त्यातून उद्भवणाऱ्या नैसर्गिक, आर्थिक सांस्कृतिक प्रदूषणाचा परिणाम ग्रामीण आणि शहरी कष्टकरी, आदिवासी आणि विविध वंचित घटकातील लोकांच्या शारीरिक-मानसिक-सामाजिक अनारोग्यात होत आहे. हे अनारोग्याचे प्रश्न वरचेवर अधिक गंभीर रूप धारण करत आहेत. याच पार्श्वभूमीवर महाराष्ट्र महिला आरोग्य हक्क परिषदेसारखी संरचनेतील मूलभूत प्रश्नांना हात घालणारी प्रक्रिया जिल्ह्यातील सर्व जिवंत आणि सक्रिय व्यक्ती, संस्था संघटना कार्यकर्ते यांना एक ऊर्जा देणारी नक्कीच ठरली यात शंका नाही.

कुपोषण, आरोग्य, उपजीविका आणि अधिकार या मुद्यांवर पालघर जिल्ह्यात काम करणाऱ्या आरोहन संस्थेच्या निमंत्रणावरून या वेळची परिषद पालघर जिल्ह्यात घ्यायचे निश्चित झाले तेव्हापासूनच आरोहन आणि जिल्ह्यात सक्रिय कष्टकरी संघटना, आदिवासी शिक्षण प्रयोग, भूमी सेना आणि रमाकांत पाटील यांच्यासारखे जेष्ठ आणि सक्रिय माध्यमकर्मींनी परिषद पूर्व प्रक्रिया राबवण्यात जोरदार आघाडी घेतली. दर दोन वर्षांनी राज्याच्या निरनिराळ्या विभागात आयोजित होणारी ही परिषद केवळ एक इवेंट बनून राहू नये असा खूप जाणीवपूर्वक प्रयत्न केला जातो. त्या प्रमाणेच या वेळीही पालघर जिल्हा आणि शेजारचे ठाणे, नाशिक, मुंबई, रायगड ई जिल्ह्यातील स/मविचारी संस्था, संघटना आणि व्यक्ती यांच्या पर्यंत पोचण्याचे प्रयत्न झाले. त्यातूनच तब्बल २० ते २५ कार्यकर्त्यांची उत्साही, कष्टाळू आणि एक सक्रिय फळी परिषदेच्या यशस्वी आयोजन.

परिषदेचे आयोजन हे प्रामुख्याने संस्था आणि वैयक्तिक देणग्या अशा लहान मोठ्या सहभाग मूल्यातून होते. पालघरच्या स्थानिक संयोजन समितीने या पातळीवरही मोठी आघाडी घेतली आणि बघता बघता खर्चाचा मोठा हिस्सा स्थानिक सहभागातून उभा राहिला. कष्टकरी संघटनेचे ब्रायन भाऊ आणि मधू ताई, आरोहनचे अमित नारकर, सुजाता आयरकर आणि सर्व साथी, आदिवासी सहज शिक्षण प्रयोगच्या वर्षा ताई, जेष्ठ पत्रकार रमाकांत भाऊ आणि इतर अनेक मंडळींनी या सर्व प्रक्रिया यशस्वीपणे आणि लीलया पार पाडल्या हे त्यांच्या संघटन कौशल्य आणि परिसरातील मजबूत उपस्थितीमुळेच शक्य झालं. परिषदेत तिन्ही दिवस ४०० च्या वर महिला सहभागी झाल्या आणि निरनिराळ्या विषयांवर जवळपास २५ ते ३० अभ्यासपूर्ण मांडण्या झाल्या हे आणखी एक वैशिष्ट्य या परिषदेचे होते.

परिषदेच्या उद्घाटन सत्रातील बीज भाषण हा परिषदेचा एक प्रमुख भाग असतो ज्याकडे सर्व सहभागी उत्सुकतेने पाहत असतात. पालघर आणि परिसरात आदिवासी आणि स्थानिक कष्टकरी समुहांच्या अधिकारांसाठी दीर्घ काळ सक्रिय असणाऱ्या जेष्ठ कार्यकर्त्या आणि विचारवंत इंदवी तुळपुळे यांनी आपल्या बीज भाषणातून विकास प्रकल्प, विकास प्रक्रिया आणि महिला आरोग्य या विषयाच्या अनुषंगाने उपस्थितांना संबोधित केले.

परिषदेत पालघर आणि परिसरातील महिला आरोग्य आणि आरोग्य हक्कांच्या दृष्टीने महत्वाच्या अशा अनेक ज्वलंत मुद्यांवर चर्चा झाली. कष्टकरी, शेतकरी, आदिवासी समुदायातील महिला आणि बालकांच्या आरोग्याच्या दृष्टीने माता मृत्यू आणि बाल मृत्यूचे प्रश्न, कुपोषण आणि बाल विवाहाचा प्रश्न, गरिबांच्या प्रति असंवेदनशील आरोग्य सेवांचा प्रश्न यावर कष्टकरी संघटना, भूमी सेना आणि इतर अनेक उत्साही संस्था व्यक्ती यांनी आश्चर्यचकित करणाऱ्या व अभ्यासपूर्ण मांडण्या

केल्या. आदिवासी सहज शिक्षण प्रयोगच्या तरुण मुलींची युवा मुलींच्या वाढत्या आशा/आकांक्षा आणि या मुलींच्या सुरक्षेचे आणि आरोग्याचे प्रश्न या विषयावरील मांडणी ने उपस्थित सर्व सहभागी विचारात तर पडलेच पण त्यांची इतकी सुरेख आणि आखीव रेखीव मांडणी ऐकून आनंदितही झाले. महिला आरोग्य हक्क परिषदेची, या ऐच्छिक प्रक्रियेची हीच ताकद आहे. आपले प्रश्न आपणच मांडायचे, आपणच ते अनुभवतो तर आपणच व्यक्तही करू शकतो. उच्च शिक्षित, तथाकथित अभ्यासकांनी ते अभ्यासायचे, त्यावर लिहायचे हे आवश्यक नाही.

या वर्षी स्त्री मुक्ती चळवळीला ५० वर्षे पूर्ण होत आहेत. या निमित्ताने महाराष्ट्रात होणारी आगामी परिषद प्रक्रिया ओळख, पार्श्वभूमी, उद्देश आणि पुढील दिशा यावर त्या परिषदच्या आयोजनात पुढाकार असलेल्या महाराष्ट्रातील प्रमुख आणि जेष्ठ महिला नेत्यांची एक मुलाखत आयोजित केली होती. त्यात विचारवंत निशा शिवूरकर, लेखिका उर्मिला पवार, स्त्री मुक्ती संघटनेच्या अमोल केरकर आणि काही स्थानिक कार्यकर्त्या सहभागी झाल्या होत्या.

परिषदेत समारोप सत्रात वरील विषयांच्या अनुषंगाने अनेक ठराव पारित झाले. त्यातील काही महत्वाचे ठराव पुढील प्रमाणे:

१. आम्ही पालघरमधील पर्यावरण, नैसर्गिक संपत्ती आणि स्थानिक समुदायांच्या उपजीविकेचे नुकसान करणाऱ्या तथाकथित विकास प्रक्रिया आणि प्रकल्पांच्या विरोधात आहोत. आम्हाला आरोग्य, पोषण आणि एकूणच लोकांच्या हिताची, कल्याणाची प्रेरणा असलेला शाश्वत विकास हवा आहे. असे प्रकल्प गुणवत्तापूर्ण जीवन जगण्यासाठी आवश्यक असलेल्या मूलभूत गोष्टी जसे, स्वच्छ हवा, पाणी आणि जंगल यावर अतिशय वाईट परिणाम करतात म्हणून राज्यकर्त्यांनी अशा विकासाच्या प्रारूपात बदल करून ते अधिक मानवी आणि पर्यावरण पूरक असावे अशी आम्ही मागणी करत आहोत.

२. कोणत्याही विकास प्रकल्पात जमीन संपादन करण्यापूर्वी तसेच प्रकल्प जनहिताचा आहे का, हे ठरवण्यापूर्वी महिला ग्रामसभेची संमती बंधनकारक असावी अशी मागणी आम्ही करत आहोत.

३. पालघर जिल्ह्याची निर्मिती होऊन एक दशक उलटले तरी जिल्हा रुग्णालय उपलब्ध नाही. जिल्हा रुग्णालयाची इमारत बांधून पूर्ण होई पर्यंत न थांबता तत्काळ जिल्हा रुग्णालय सुरु करण्यासाठी आवश्यक सोयी सुविधांची पूर्तता करुन रुग्णालय सुरु करण्याची मागणी आम्ही करत आहोत.

३. पालघर जिल्हात व विशेषत: तालुक्यात मातामृत्यूंची वाढती संख्या अतिशय चिंताजनक आहे. माता मृत्यू दर (MMR) कमी करण्यासाठी शासकीय रुग्णालये ही आवश्यक कर्मचारी आणि सुविधा यांनी सुसज्ज असावीत, अशी आमची मागणी आहे. तसेच, माता मृत्यू सर्वेक्षण व प्रतिसाद (MDSR) प्रक्रियेच्या सर्व टप्प्यांमध्ये आणि सामाजिक लेखापरीक्षणामध्ये सामाजिक संस्थांचा (CBOs) सक्रीय सहभाग असावा.

४. आदिवासी भागांतील बाळंतपण करणाऱ्या पारंपरिक सुईणींचे महत्त्व मान्य करून या पद्धतीचे काम करणाऱ्या स्त्रियांना संस्थागत प्रसूतीच्या वेळी महिलांसोबत राहण्यास (birthing companions म्हणून) व प्रसूती करताना मदत करण्याचे धोरण अमलात आणावे. त्यांना आवश्यक ते प्रशिक्षण द्यावे आणि न्याय्य मोबदला द्यावा.

५. सर्व स्त्रिया व पारलिंगी/उभयलिंगी व्यक्तींसाठी शासकीय, निम शासकीय आणि खाजगी ठिकाणी, तसेच असंघटीत क्षेत्रातील कामाच्या ठिकाणी तसेच प्रवासा दरम्यान सार्वजनिक ठिकाणी, सुरक्षित व स्वच्छ शौचालयाच्या सोयी उपलब्ध करून देणे, ही शासनाची जबाबदारी असून, याची अंमलबजावणी करावी.

६. शाळा, महाविद्यालये येथे मुलींना सन्मानपूर्वक, सुरक्षित जागा (चेंजिंग रूम, पाण्यासह स्वच्छ शौचालय) मिळणे हा त्यांचा हक्क असून, शिक्षण व्यवस्थेत याची अंमलबजावणी त्वरित करण्यात यावी.

७. कुपोषणाबाबत समग्र विचार करून पोषण विषयक शिक्षणासह व स्थानिक खाद्यपदार्थसह, स्थलांतर थांबवण्यावर शासनाने भर द्यावा.

८. असंघटित क्षेत्रातील श्रमिक महिलांसाठी आरोग्य सुरक्षेच्या

(पान २१ वर)

विषेश

‘आवाज बंद’ करण्याचा संघटित प्रयत्न होतोय, हाच ‘खरा धोका’!

आ. श्री. केतकर

काही वेळा काही गोष्टी आपल्याला वाटतं तशा नसतात, आणि काही वेळा आपल्याला जे सांगितलं गेलं किंवा जे आपण शिकलो, ते चुकीचंच होतं, असं वाटायला लागतं. कारण काही अतिज्ञानी लोक अगदी त्याच्याविरुद्ध काहीतरी सांगतात आणि आपल्याला हे कसं कळलं नाही, किंवा कुणी निदान सांगितलं का नाही, असं वाटायला लागतं. या अतिज्ञानी लोकांना ते कसं कळतं, कुणास ठाऊक! पण होतं काय की, त्यांच्या या (अगाध) ज्ञानप्रकाशामुळे आपल्याला दिपून जायला होतं, स्वत:चीच कीव येते. पण काही जण मात्र त्यांची त्यांच्या अगाध ज्ञानाबद्दल कीव करतात किंवा त्यांच्याकडे दुर्लक्ष करतात. त्यांचं महत्त्वच या लोकांना कळलेलं नसतं!

आता हेच पहा ना, २२ एप्रिल २०२५ ला पहलगामध्ये दहशतवाद्यांनी केलेल्या भीषण हत्याकांडात २६ निरपराध पुरुषांना आपल्या जिवाला मुकावं लागलं. त्यांच्या अभागी बायका, मुलं दीनवाणी झाली होती. दहशतवाद्यांच्या या कृत्यानं संपूर्ण देश हळहळला. दहशतवाद्यांबाबत राग उफाळून आला. त्यांना धडा शिकवा, अशी मागणी होऊ लागली. त्याप्रमाणे आपल्या लष्करानं काही प्रमाणात धडा शिकवलादेखील!

नंतर अनेकांनी त्या पर्यटनस्थळी पोलिसांची गस्त का नव्हती? पर्यटकांची गर्दी असतानाही, सुरक्षारक्षक का नव्हते? किंवा आपल्या गुप्तहेरांकडून याबाबत काहीच माहिती का दिली गेली नाही? असे प्रश्न विचारले. त्यांबाबत कसलंही उत्तर मिळालं नाही. पण काही अतिज्ञानी लोकांना अशी वेळ आलीच का, असा जो प्रश्न पडला, तो मात्र कुणाच्या डोक्यात आला नव्हता. वाचकांनाही काही प्रश्न पडले असतील. पण ते विचारले, तर हे ‘अतिज्ञानी’ त्या सगळ्यांना ‘बिनडोक’ म्हणणार!

अर्थात त्यांच्या अगाध ज्ञानाचं भांडारही नक्कीच हेवा वाटण्याजोगं असणार. कारण भाजपच्या एका प्रवक्त्यानं एका वृत्तवाहिनीवर (न्यूज २४, वेळ – १०.३० : ब्रेकिंग विथ अजेंडा) विचारलं की, ‘‘तेथे असलेल्या महिला अहिल्यादेवी होळकरांप्रमाणे का लढल्या नाहीत? किंवा मुसलमानांशी लढणाऱ्या झाशीच्या राणीप्रमाणे त्या झुंजल्या का नाहीत? त्यांनी इतिहासाचा अभ्यास करायला हवा होता. तसे त्यांनी केले असते, तर त्यांना ‘वीरांगना’ म्हणून गौरवलं गेलं असतं!’’

आपण समजतो की, अहिल्यादेवी काही शस्त्रास्त्रं घेऊन कुणाशी लढल्या नव्हत्या. आपण त्यांना शिक्षणाची आस असणाऱ्या आणि सुधारणावादी म्हणून ओळखतो. अगदी अपवादात्मक प्रसंग म्हणून राघोबादादा पेशवे ज्या वेळी त्यांच्यावर चालून येत होते, तो. पण तेव्हाही अहिल्यादेवींनी शस्त्रांचा आधार न घेता केवळ एका पत्राने विजय मिळवला होता.

त्यांनी राघोबादादांना लिहिलं होतं की, आपण चालून याल खरे, पण तुम्हाला आमच्या स्त्रीसैनिकांबरोबर लढावं लागेल. त्यात कदाचित तुम्ही जिंकाल, पण तरीही तुम्ही महिलांविरुद्ध लढलात, त्यात काय पराक्रम, असा तुम्हाला बोल लागेल, आणि आम्ही विजयी झालो, तर मात्र तुमची जी नाचक्की होईल, तिला पारावारच राहणार नाही. बस्स. त्या पत्रानं राघोबादादा माघारी वळले, असं इतिहास सांगतो. (पण त्या प्रवक्त्यालाच इतिहासाच्या अभ्यास करण्याची गरज आहे, हे कोण सांगणार? त्या सांगणाऱ्यालाच ‘देशद्रोही‘ ठरवलं जाईल.)

...आणि झाशीची राणी लक्ष्मीबाई मुसलमानांशी कधी लढल्याचं कुणालाच, अगदी इतिहासतज्ज्ञांनाही, माहीत नाही. त्या लढल्या त्या १८५७च्या स्वातंत्र्ययुद्धात, तेही त्या लढ्यात सहभागी मुस्लिमांच्या बरोबरीनं, अशा नोंदी आहेत. पण हे आपलं अज्ञानच म्हणायचं! याचा अर्थ आपल्याला काहीच योग्य प्रकारे शिकवलं गेलं नसावं. कदाचित पुढील काळात याच गोष्टी इतिहास म्हणून शिकवल्या जातील. कारण तशीही पाठ्यपुस्तकांतील इतिहासात बदल करण्याची सुरुवात झालीच आहे!

या प्रवक्त्यापाठोपाठ भाजपचे संसद सदस्य राम चंदर जांग्र यांनी म्हटलं की, जे पुरुष दहशतवाद्यांच्या गोळ्यांना बळी पडले, त्यांनी थोडं ‘अग्निवीर‘ प्रशिक्षण घेतलं असतं, तर ही वेळ

आली नसती. असं असलं, तरीही मोठा दोष मुख्यत: तिथं उपस्थित असलेल्या महिलांकडेच जातो, कारण त्यांनी बंदुका घेतलेल्या दहशतवाद्यांवर हल्ला केला नाही.'

म्हणजे जांग्र यांच्या मते आपल्या देशातील महिला एवढ्या बलशाली आहेत की, त्यांना 'अग्निवीर' प्रशिक्षणाची गरजच नव्हती. यात जांग्र यांना ऐतिहासिक आणि सांस्कृतिक दृष्टीनं असंही सूचित करायचं असावं की, नेहमी महिलाच सारं बिघडवून टाकतात, ते स्वयंपाकघर असो किंवा रणभूमी.

खरं म्हणजे जगातील कोणत्याही देशापेक्षा आपण अनेक देवींची पूजा, प्रर्थना करतो. इतकंच काय पण आपण आपल्या भारत देशालाही 'माँ भारती' म्हणतो... आणि तरीही एक सत्ताधारी पक्षाचा खासदार त्या कठीण प्रसंगी त्या प्रसंगोचित वागल्या नाहीत, हल्ल्याच्या वेळी तेथे उपस्थित असलेल्या महिलांनाच त्यांनी त्या घुसखोर दहशतवाद्यांशी दोन हात केले नाहीत, म्हणून बोल लावतो. केवळ अगाध ज्ञानींनाच असा साक्षात्कार होऊ शकतो!

पहलगामच्या त्या हत्याकांडाबाबत हे असं गलिच्छ मतप्रदर्शन एक खासदार करू शकतो, आणि हे त्याच्या पक्षाचे पाठीराखे आणि तत्सम लोकांचंही मत असू शकतं. मग ते महिला असोत वा पुरुष. आणि त्यांच्या 'गोदी मीडिया'माध्यमांबद्दल आणि 'जल्पकां'च्या फौजेबाबतही हे खरं असू शकेल. शिवाय ते गलिच्छ उद्गार काढणाऱ्या त्या खासदाराचा निषेध केला जाऊ नये आणि त्याला कोणतीही शिक्षा होऊ नये म्हणून निकरानं प्रयत्न करतील.

अलीकडेच परराष्ट्र मंत्र्यांनी लोकशाहीचे आणि त्यातही खास करून भारतातील लोकशाहीचं कौतुक केलं होतं. आता जांग्रसारखे खासदार आणि ज्यांनी कर्नल सोफिया कुरेशी यांना पाकिस्तानच्या 'दहशतवाद्यांची बहीण' म्हटलं, ते मध्य प्रदेशचे मंत्री विजय शहा काय, आणि जगदीश देवड ज्यांनी आता भारतीय सैन्य मोदींच्या पायाशी झुकते, असं सैन्याची बेअब्रू करणारं विधान केलं होतं, ते काय, त्या साऱ्यांना असं काय वाट्टेल ते बोलण्याचं स्वातंत्र्य होतंच की! पण त्यांना असे बोल बोलू नका, म्हणून कोणी अडवण्याचा प्रयत्न केला, तर त्यांना मात्र भाषण स्वातंत्र्याच्याही काही मर्यादा असतात, याची आठवण करून दिली जाते!

आता अली खान महमुदाबाद यांचंच उदाहरण पाहा. त्यांना कोठडीत ठेवण्यात आलं, तेही त्यांनी समाजमाध्यमांवर टाकलेल्या एका पोस्टमुळे. महमुदाबाद हे अशोका विद्यापीठाच्या राज्यशास्त्र विभागात 'साहाय्यक प्राध्यापक' (असिस्टंट प्रोफेसर) आहेत. त्यांना पोस्टमध्ये आक्षेपार्ह विधान केल्याबद्दल, लडाख विद्यापीठाचे कुलगुरू साकेत खुशवाह, जवाहरलाल नेहरू विद्यापीठाच्या कुलगुरू शांतीश्री पंडित, गुजरात विद्यापीठाच्या कुलगुरू डॉ. नीरजा गुप्ता आणि राजस्थान केंद्रीय विद्यापीठाचे कुलगुरू प्रा. आनंद भालेराव आणि शिक्षणक्षेत्रातील २०० जणांनी 'महमुदाबाद हे छुप्या पद्धतीने टीका करत आहेत, त्यांना या 'ऑपरेशन सिंदूर'बाबतच्या समाजमाध्यामांवरील या पोस्टने जातीय सलोखा कमी करायचा आहे.' असं म्हणत त्यांच्यावर टीका केली.

हा 'अवगुंठित' प्रकार नैतिक मूल्यांचं रक्षण करण्याच्या नावाखाली टीका करणाऱ्यांवर हल्ला चढवण्याचाच आहे. हा सत्ताधाऱ्यांना विरोध करणाऱ्यांचा आवाज दाबून टाकण्याचा सत्ताधाऱ्यांच्याच डावपेचांचा एक भाग असावा, असं वाटतं. खरं तर मेहमुदाबाद यांचा प्रयत्न हा न्याय मिळवण्याचा आणि धोरणात सातत्य असायला हवं, असं सूचित करणारा होता. (दरम्यान काही अटींवर महमुदाबाद यांना सर्वोच्च न्यायालयाकडून जामीन मिळाला आहे.) तरीही या जल्पकांनी भाषेचा नीट अभ्यास करायला हवा, त्याचं महत्त्व समजून घ्यायला हवं, म्हणजे ते भलतेसलते अर्थ काढणार नाहीत.

हा सारा गोंधळ ज्यामुळे सुरू झाला, ती समाजमाध्यमावरील पोस्ट ८ मे २०२५ची होती. त्यामध्ये मेहमुदाबाद यांनी 'ऑपरेशन सिंदूर'बाबतची माहिती योग्य प्रकारे दिल्याबद्दल कर्नल सोफिया कुरेशी आणि विंग कमांडर व्योमिका सिंग यांचे कौतुक आणि पहलगाम हल्ल्याला भारतीय लष्कराने दिलेल्या चोख प्रत्युत्तराचा गौरव केला होता.

महमुदाबाद यांनी लिहिलं होतं : "मला आनंद होतो की, अनेक उजव्या मताच्या समालोचकांनीही कर्नल सोफिया कुरेशी आणि विंग कमांडर व्योमिका सिंग यांचं कौतुक केलं. शाबासकी दिली. हे चांगलंच आहे. पण त्याच वेळी त्यांनी ज्या वेळी जमावांनी कायदा हातात घेऊन 'लिंचिंग'ने ज्यांना मारलं, अनेकांच्या घरांवर, दुकानांवर बुलडोझर चालवले आणि जे भाजपच्या द्वेषभावनेनं ठराविक लोकांना भयभीत करण्याचे प्रयत्न करत आहेत, आणि त्यामुळे जे कमनिशबी बळी जात आहेत,

त्यांच्यावर ही वेळ आणणाऱ्यांचा निषेध करायला हवा. तसं केलं नाही, तर मात्र हा केवळ ढोंगीपणाच म्हणावा लागेल.''

त्यांच्या या पोस्टवर टीका करणाऱ्या चार कुलगुरूंनी म्हटलं की, यामुळे महमुदाबाद यांनी कर्नल सोफिया कुरेशी आणि विंग कमांडर व्योमिका सिंग यांच्या भूमिकेला कमी लेखलं आहे. शिवाय त्यांना केवळ एक प्रतीक म्हणून सर्वांपुढं आणलं आहे, असंही म्हटलं आहे, तेही कथित सांप्रदायिकतेला कायदेशीर मान्यता मिळवून देण्यासाठी. जाणत्यांना यावर हसावं की, रडावं असंच वाटलं असणार. कारण 'अर्थाचा अनर्थ' करण्याचं हे उत्तम उदाहरण आहे.

लवकरच या चार कुलगुरूंना त्यांच्या या कामगिरीबद्दल सन्मानित केलं गेलं तर आश्चर्य वाटू नये. कारण महमुदाबाद यांनी कर्नल सोफिया कुरेशी आणि विंग कमांडर व्योमिका सिंग यांचा उल्लेख केला, तो त्यांची उपस्थिती ही भारताच्या 'विविधतेत एकता' आणि 'धर्मनिरपेक्षता' यांचं प्रतीक होती म्हणून. त्यांचा रोख हा उजव्या विचारसरणीच्या लोकांच्या कथित 'राष्ट्रवाद' आणि 'राष्ट्रभक्ती' यांवर होता. कारण जे समालोचक मुस्लीम अधिकाऱ्यांची स्तुती करतात, ते एकूण मुस्लिमांवर केले जाणारे हल्ले आणि लिंचिंग, केवळ गोमांस असल्याचा संशय आला म्हणून ते मांस नेणाऱ्यांवर होणारे हल्ले, (नुकतीच एक बातमी आली होती की, मध्य प्रदेशात हा प्रकार झाल्यावर ते प्रयोगशाळेत नेण्यात आलं, तिथं ते गोमांस नसून म्हशीचं मांस असल्याचं उघडकीस आलं होतं.) आणि बुलडोझर न्यायामुळे (?) बेघर झालेल्या, उपजीविकेचं साधन गमावून बसलेल्या मुस्लिमांवर होणाऱ्या अन्यायाकडे मात्र डोळेझाक करतात. त्याबद्दल चकारशब्दही काढत नाहीत. एखाद्याच्या विधानाचा भलताच अर्थ काढून त्याला बदनाम करायचं हे तंत्र आहे.

महमुदाबाद यांनी तर अल्पसंख्याकांना न्याय मिळावा, यासाठी सरकारचं धोरण सर्वांसाठी समान असलं पाहिजे, असं सूचित केलं होतं.

या सगळ्यावर ताण केली ती हरयाणा राज्याच्या महिला आयोगाच्या रेणू भाटिया यांनी. त्यांनी १२ मे २०२५ रोजी एक नोटीसच प्रसृत केली. त्यांनी असा दावा केला की, महमुदाबाद यांच्या पोस्टने महिला अधिकाऱ्यांना अपमानित केलं आहे, आणि जातीय बेबनावला उत्तेजन दिलंय. यामुळे १८ मे २०२५ रोजी महमुदाबाद यांना अटक करण्यात आली. या प्रकरणात हरयाणाच्या महिला आयोगाकडून पोस्टकर्त्याला अटक केल्यानं, राजकीय अतिरेक झाला.

महिला आयोगाचं काम महिलांच्या हक्कांचं संरक्षण करणं हा आहे. त्यांना समाजमाध्यमांवर लष्करी कारवाई किंवा राजकीय ढोंगावर टिप्पणी करणाऱ्यांवर कारवाई करण्याचा अधिकार नाही. महमुदाबाद यांनी स्वत:च म्हटलं आहे की, महिला आयोग महत्त्वाची कामं करतो. मात्र मला जे समन्स देण्यात आलंय, त्यात मी केलेली पोस्ट, ही महिलांच्या हक्कांवर किंवा महिलांसाठी असलेल्या कायद्यावर आक्रमण कशी करू शकते, हे मला समजत नाही.

महत्त्वाची बाब अशी आहे की, महमुदाबाद यांच्यापोस्टवर एवढ्या तत्परतेनं नोटीस देणारा हरयाणा महिला आयोग, मध्य प्रदेशचे एक मंत्री विजय शहा यांनी महिला अधिकारी कर्नल सोफिया कुरेशी यांना त्यांची, म्हणजे 'दहशतवाद्यांची समाजभगिनी' असं म्हटलं, त्याबाबत काहीच करत नाही. त्यामुळे महिला आयोगाच्या हेतूविषयी शंका येते. हा महिला आयोग सत्ताधाऱ्यांचा 'राजकीय अजेंडा' तर राबवत नाही ना?

याबरोबरच शैक्षणिक संस्थांच्या अधिकारावरही गदा येत आहे. महमुदाबाद यांच्या पोस्टवरचा वाद वाढत जाण्याचीही शक्यता आहे. आधीच भारत शैक्षणिक संस्थांच्या स्वातंत्र्याच्या यादीत १७९व्या स्थानावर आहे! महमुदाबाद यांना झालेली अटक ही 'भाजप युवा मोर्चा'च्या एक नेता आणि महिला आयोग यांच्या तक्रारीमुळे झाली आहे. सरकारच्या बुद्धिवाद्यांवर पद्धतशीर हल्ला चढवण्याच्या धोरणाचाच हा भाग आहे, असं अनेक शिक्षक संघटनांनी म्हटलंय.

जेएनयूच्या शिक्षक संघटनेचे सूरज मुझुमदार यांनी म्हटलं आहे की, हा केवळ एका व्यक्तीच्या नाही, तर समाजाच्या कोणत्याही महत्त्वाच्या विषयावरील चर्चेच्या हक्कावरीलच हल्ला आहे. दिल्ली विद्यापीठाच्या डीन अनिता रामापाल यांनी महमुदाबाद हे शिक्षक आहेत, ते कुणाला भडकवत नाहीत, असं म्हटलं आहे. अशोका विद्यापीठाच्या 'फॅकल्टी असोसिएशन'ने सरकारची कृती म्हणजे जाणून बुजून केलेला छळ आहे. कोठडीत असताना त्यांना वैद्यकीय उपचार देण्यास, तसंच कुणाशीही संपर्क साधण्यास मनाई केली गेली होती. ही

(पान ३१ वर)

टिप्पणी

विपुल परदेश दौरे, फलनिष्पत्ती काही नाही

एस. एम. देशमुख

९२ परदेश दौरे. ५१ देशांना भेटी. २०१४ ते २०१८ या काळातील विदेश दौऱ्यावर २ हजार २१ कोटींचा खर्च! मे २०२२ ते डिसेंबर २०२४ या काळात केलेल्या ३८ विदेश दौऱ्यांवर 258 कोटी रूपयांचा खर्च. प्रत्येक दौऱ्यावर सरासरी २२ कोटी रूपये खर्च झाला आहे. मा. पंतप्रधान नरेंद्र मोदी अमेरिकेला ९ वेळा गेले. अन्य काही देशांना त्यांनी दोन किंवा पाच वेळा भेटी दिल्या. पंतप्रधान नरेंद्र मोदींच्या परदेश दौर्यांची ही माहिती लोकसभा आणि राज्यसभेत दिली गेलेली आहे. पंतप्रधानांनी परदेश दौरे करणे यात गैर काही नाही. मुद्दा फलनिष्पत्तीचा आहे. विदेशात गेल्यानंतर तेथील भारतीयांकडून मोदी – मोदींचे नारे लावून घ्यायचे. तिकडचा माहोल पाहून मग देशी भक्तांनी त्यांना विश्वगुरू संबोधायला सुरूवात करायची. म्हणजे नरेंद्र मोदी स्वत:चं मार्केटिंग करीत राहिले. देशाला मिळालं काय? काहीच नाही! १५१ देशांना भेटी दिल्यानंतर ऑपरेशन सिंदूरच्या वेळेस जगातील एकाही देशाने भारताला पाठिंबा दिला नाही. चीनसह चार दोन देश होते, जे उघडपणे पाकच्या बाजुने उभे राहिले. भारताच्या बाजुनं एकही देश नव्हता. G - 20 च्या वेळेसही स्वत:भोवती आरत्या ओवाळून घेण्याखेरीज काहीच झालं नाही. G - 20 च्या आयोजनावरही कोट्यवधींची खर्च करून देखील त्यातील एकही देश भारताच्या बाजुनं उभा राहिला नाही. म्हणजे आपले परदेश धोरण केवळ मोदी कौतुकापुरतेच सीमीत होते तर.

ऑपरेशन सिंदूर सुरू होण्यापूर्वी भारतानं काही देशांशी संपर्क साधला होता. त्याचाही काही उपयोग झाला नाही. मग ५९ खासदारांच्या सात टीम्सने ३२ देशांचे दौरे करून हाती काही लागलं असं वाटत नाही! आम्ही सारे एक आहोत हे जगाला दाखविण्यासाठी विरोधी पक्षांना बरोबर घेतलं गेलं. मात्र त्यातही भाजपने राजकारणच केलं. काँग्रेसनं शशी थरूर, मनीष तिवारी यांची नावं न देता ती परस्पर जाहीर केली गेली. जी चार नावं काँग्रेसनं दिली त्यातील एकच नाव घेतलं गेलं. तृणमूल काँग्रेसच्या बाबतीतही हेच घडलं. युसुफ पठाण यांचं नाव परस्पर घेतलं गेलं. म्हणजे एकीकडं राजकारण करू नका असे सल्ले द्यायचे आणि दुसरीकडे स्वत: राजकारण करीत राह्यचं. रेल्वेच्या तिकिटावर मोदींचे फोटो असोत किंवा तिरंगा रॅली असो, हे राजकारण नाही? राजकीय लाभ उठवण्याचाच हा सारा खटाटोप आहे. बिहार निवडणुकांपर्यंत हा माहोल कायम ठेवण्याचा प्रयत्न असणार आहे. जगात आपण एकटे पडणार असू तर ही परिस्थिती फार चांगली नाही. नेहरूंनी तटस्थतेचे धोरण आखले होते. भाजप सरकारने आपल्या परराष्ट्र धोरणाचा बट्ट्याबोळ करून टाकला. खासदारांना जगभर फिरवून काही बदल होईल असं वाटत नाही.. परराष्ट्र धोरणाचाच फेरविचार करावा लागेल.

(लेखक वरिष्ठ पत्रकार आहेत.)

9422377700

(राजकारण : पान ९ वरुन)

आपला कोणीही मित्र नाही.

या बनावटी राष्ट्रवादाच्या माध्यमातून आपण चीनच्या विस्तारवादाला उत्तर देऊ शकत नाही किंवा डोनाल्ड ट्रम्पच्या दादागिरीलाही आव्हान निर्माण करू शकत नाही. भारताच्या राष्ट्रीय हिताला आता कोणतेही तात्त्विक अधिष्ठान राहिलेले नाही आणि त्यामुळेच आताच्या या घटनेतही भारतासोबत कोणीही विश्वसनीय मित्र नव्हता.

त्यामुळेच भारतीय राष्ट्रवादाचा वारसा पुन्हा जिवंत करणं, त्यावर आपला दावा पुन्हा सिद्ध करणं हे आताच्या काळातील सर्वांत मोठे राजकीय आणि वैचारिक आव्हान आहे.

(दै. लोकसत्ताच्या सौजन्याने)

अनुवाद: श्रीरंजन आवटे

निवेदन

इयत्ता पहिलीपासून हिंदी भाषा शिकवण्यास सक्त विरोध

महाराष्ट्र एकीकरण समिती

महाराष्ट्र एकीकरण समितीचे महाराष्ट्राच्या मा. मुख्यमंत्री यांना निवेदन

विषय: इयत्ता पहिलीपासून हिंदी भाषा राज्यातील शाळांमध्ये तृतीय भाषेच्या स्वरूपात सक्तीने शिकविण्याच्या निर्णयास विरोध व निर्णय तात्काळ मागे घेण्याची विनंती.

सादर विनंती अशी की, महाराष्ट्र शासनाच्या शिक्षण विभागाने 'राज्य शालेय अभ्यासक्रम आराखडा २०२४' नुसार इयत्ता पहिलीपासून हिंदी भाषा तृतीय भाषेच्या स्वरूपात सक्तीने शिकविण्याचा निर्णय घेतला आहे.

या निर्णयानुसार मराठी व इंग्रजी माध्यमांच्या शाळांमध्ये इयत्ता १ ली ते ५ वीपर्यंत मराठी व इंग्रजीबरोबर हिंदी ही तृतीय भाषा सक्तीने शिकवावी लागणार आहे. तसेच अन्य माध्यमांच्या शाळांमध्ये माध्यम भाषा, मराठी आणि इंग्रजी या तीन भाषा शिकवल्या जाणार आहेत. सदर निर्णयाची अंमलबजावणी येणाऱ्या शैक्षणिक वर्षाच्या जून २०२५ पासून सुरू होणार आहे.

मराठी एकीकरण समिती – महाराष्ट्र राज्य, ही एक नोंदणीकृत व बिगरराजकीय सामाजिक संस्था म्हणून आम्ही या निर्णयाचा तीव्र निषेध व्यक्त करीत आहोत. आपल्या निर्णयामुळे राज्यातील मातृभाषिक विद्यार्थ्यांवर अन्य राज्यातील भाषेची सक्ती होत असून, ही बाब संविधानातील मूलभूत अधिकारांचे तसेच भाषिक स्वातंत्र्याचे उल्लंघन करणारी आहे.

सदर निर्णयाविरोधात आम्ही खालील मुद्द्यांवरून आपला विरोध नोंदवित आहोत -

१. हिंदी ही राष्ट्रभाषा नाही. ती केवळ इतर भारतीय भाषांप्रमाणेच एक राज्यभाषा असून तिची सक्ती करणे अयोग्य आहे.

२. राज्याच्या सांस्कृतिक अस्मितेवर आघात: महाराष्ट्राची ओळख ही स्वतंत्र मराठी भाषा, साहित्य, संस्कृती व परंपरेशी निगडित आहे. अन्य राज्यातील भाषा लादणे हे सांस्कृतिक आक्रमणच म्हणावे लागेल.

३. शिक्षणाचे ओझे वाढवणारा निर्णय: पहिलीपासूनच तीन भाषा सक्तीने शिकविणे बालकांच्या बौद्धिक व मानसिक विकासासाठी अयोग्य व अन्यायकारक ठरेल.

४. मराठीतील बोलीभाषांना सरकारकडून प्रोत्साहन नाही: मराठीच्या विविध बोलीभाषांच्या संवर्धनासाठी शासन काहीही प्रयत्न करीत नाही, हे दुर्दैवी आहे.

५. स्थानिक विद्यार्थ्यांवर स्थलांतरितांचे भाषिक वर्चस्व लादले जात आहे, ज्यामुळे स्थानिक भाषिक विद्यार्थ्यांचा अधिकार आणि संधी हिरावली जाऊ शकते.

६. केंद्र सरकारच्या त्रिभाषा सूत्राचा चुकीचा अर्थ: त्रिभाषा सूत्र हा प्रशासनापुरता मार्गदर्शक आहे; त्याची सक्ती शालेय शिक्षणात लादणे अन्यायकारक आहे.

७. भाषिक स्वायत्ततेचा संपूर्ण अभाव: प्रत्येक राज्याला त्याच्या भाषिक गरजेनुसार शिक्षण धोरण ठरवण्याचा अधिकार आहे. केंद्राच्या दबावाखाली घेतलेला निर्णय हे राज्याच्या स्वायत्ततेचे उल्लंघन आहे.

त्यामुळे, आम्ही खालील मागण्या आपल्यास सादर करीत आहोत –

१. राज्य शासनाने इयत्ता पहिलीपासून हिंदी भाषा सक्तीने शिकविण्याचा निर्णय तात्काळ रद्द करावा.

२. या निर्णयाच्या रद्दबाबत तात्काळ शासन आदेश किंवा स्पष्ट परिपत्रक निर्गमित करावे.

३. सदर बाबीबाबत शालेय शिक्षण संचालनालय, शिक्षण आयुक्त, शिक्षण मंडळ, गटशिक्षणाधिकारी, शाळा व्यवस्थापन समित्या यांना स्पष्ट सूचना द्याव्यात.

४. बालभारतीसह इतर सर्व पुस्तक छपाई केंद्रे व मुद्रण विभागांना नवीन शैक्षणिक वर्षासाठी हिंदी सक्तीबाबत कोणतीही योजना राबवू नये, याबाबत स्पष्ट लेखी सूचना द्याव्यात.

५. यापुढील अभ्यासक्रम नियोजन प्रक्रियेत विद्यार्थ्यांना तृतीय

(पान १७ वर)

टिप्पणी

फ्रॉड राज्यकर्त्यांकडून नम्र अपेक्षा : हिंदीची सक्ती मागे घ्या !

गणेश विसपुते

कपटी, फसवाफसवी करणारे, अफरातफर करणारे, लबाड्या करणारे यांच्यासाठी फ्रॉड असा इंग्रजीतला शब्द आहे. तो आजच्या राज्यकर्त्यांना, धोरणकर्त्यांना, सर्वपक्षीय राजकारण्यांना (क्वचित अपवाद) चपखलपणे वापरता येईल.

जे फ्रॉड असतात त्यांना लोकभावना, लोकांच्या अस्मिता, लोकांच्या समस्या यांच्याशी काहीही देणंघेणं नसतं. त्यांना त्यांच्या अपयशाची लक्तरं झाकायला नवनव्या गोंधळाच्या परिस्थिती करणं हेच काम असतं.

तिसरी भाषा हिंदी महाराष्ट्रात चालणार नाही. हे माहीत असूनही महाराष्ट्राला प्रयोगशाळा म्हणून राबवण्याचा प्रयोग तिसऱ्या दर्जाचे त्यांचे स्थानिक लॅब असिस्टन्ट्स करू पाहताहेत. स्मृतिभ्रंशाच्या अंमलात सुस्त अजगरासारखी झालेली ही प्रजा काहीही करणार नाही हे मागचं गृहीतक आहे.

मागच्या शतकातल्या सदतीस साली हिंदी लादण्याचे असे प्रयत्न झाले. एकोणचाळीस साली लोक रस्त्यावर आले. भाषेच्या प्रश्नावर माणसं मृत्यूमुखी पडली. दक्षिणेत तेव्हा इ व्ही रामस्वामी नायकरांसारखं – पेरियारांसारखं नेतृत्व होतं.

व्यापारासाठी– सपाटीकरणासाठी वर्चस्ववादी भाषा अनेक जित्याजागत्या भाषांना बोलीच्या पातळीवर आणून सोडतात. नामशेष करायला मदत करतात. हिंदी, फ्रेंच आणि इंग्रजी याची उदाहरणं आहेत. या भाषांनी कितीएक स्वतंत्र भाषा गिळून टाकलेल्या आहेत.

न्यूनगंडातून आपणही गैरसमजुती पाळत असतो. मोठा गैरसमज आहे की जगातली सर्वाधिक बोलली जाणारी भाषा इंग्रजी आहे. वस्तुत: तसं नाही. मॅन्डरिन चिनी भाषा बोलणारे एक अब्ज पाच कोटी लोक आहेत. जगातल्या पहिल्या वीस भाषांत सहा भारतीय भाषा आहेत. त्यात मराठीचा क्रमांक घसरला आहे. त्याला कारण आपली शिक्षणविषयक नादान धोरणं, शिक्षणसम्राटांना मुक्तांगण दिलं जाणं यांत आहे.

जमिनी मोकळ्या करण्यासाठी, भांडवली सत्तेतल्या मर्जीत राहण्यासाठी मराठी शाळा बंद पाडल्या गेल्या हीही वस्तुस्थिती आहे. तिथं पुढे कोणत्या संस्था सुरु झाल्या ह्याचं संशोधन करावं म्हणजे वास्तव कळेल.

उत्तर भारत, गुजरात हे महाराष्ट्राचा द्वेष करणारे आहेत हे सन साठपासून स्पष्टच होत गेलेलं आहे. निवडणूकांसाठी पुन्हा निर्णय फिरवून श्रेय घेण्याचे कावे असू शकतात. किंवा शरणागत झालेल्यांचं आणखी झालेलं पतन असू शकतं.

काहीही असो, कुठल्याही आडवाटेनं हिंदीची सक्ती करण्याचा निर्णय मागे घेतला जावा अशी नम्र अपेक्षा आहे. तो झाला तर ठीकच आहे.

(ह्या नम्र अपेक्षेत मुन्नाभाईचा 'उठ बे, विनम्रतापूर्वक सॉरी बोलना चाहता हूं / माफी मांगना चाहता हूं', चा विनोद पाहिला गेला तरी हरकत नाही.)

ganesh.visputay@gmail.com

(निवेदन: पान १६ वरुन)

भाषा निवडीचा संपूर्ण स्वातंत्र्य देण्यात यावा, कोणतीही सक्ती करू नये.

६. त्रिभाषा सूत्राचे पालन हे राज्याच्या शैक्षणिक धोरणाच्या अनुषंगाने व ऐच्छिक स्वरूपात मर्यादित ठेवावे.

७. राज्यातील मराठी बोलीभाषा, लोकपरंपरा व स्थानिक संस्कृती यांचा अभ्यासक्रमात अंतर्भाव करून स्थानिकतेला प्राधान्य द्यावे.

८. सदर निर्णयामुळे निर्माण होणारा संभ्रम, असंतोष आणि प्रशासकीय अडचणी टाळण्यासाठी त्वरित ठोस कृती करण्यात यावी.

आपणास नम्र विनंती आहे की, राज्यातील विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक हिताचा व महाराष्ट्राच्या भाषिक अस्मितेचा विचार करून, सदर अन्यायकारक निर्णय तात्काळ मागे घेण्यात यावा, ही अपेक्षा.

हितचिंतक: मराठी एकीकरण समिती (महाराष्ट्र राज्य)

टिप्पणी

सावधान ! कृत्रिम बुद्धिमतेचा कृषी क्षेत्रातील वापर दुधारी

सतीश देशमुख

आम्ही नेहमीच नवीन आधुनिक तंत्रज्ञान आणि प्रगतीसाठी अनुकूल असतो.

कृषी विज्ञान केंद्र (ADT) आणि विस्मा (West Indian Sugar Mills Association) ह्यांनी संयुक्तिकपणे आयोजित केलेल्या 'उत्पादकता वाढ, हवामान बदल, पर्यावरणीय आव्हाने व ऊस क्षेत्रासाठीचा कृत्रिम बुद्धिमतेचा (Artificial Intelligence - एआय) वापर' ह्या तंत्रज्ञान परिषदेला, अभ्यास करण्यासाठी मी उपस्थित राहिलो. हेच तंत्रज्ञान इतर पिके जसे केळी, डाळिंब, द्राक्षे, आंबा, भाजीपाला, सोयाबीन, कापूस, कांदा वगैरे साठी वापरता येईल का हे पण बघायचे होते.

बारामतीतील उसावरील प्रयोग दूरदृष्टीने केलेले असून त्यामुळे कृषी क्षेत्राला नवसंजीवनी मिळेल असे प्राथमिकपणे जाणवले. हे प्रकल्प मायक्रोसॉफ्ट कंपनी व ऑक्सफोर्ड युनिर्व्हसिटी ह्यांच्या एकत्रित सहकार्याने कार्यान्वित झालेले आहेत. त्याची दखल घेऊन मायक्रोसॉफ्ट कंपनीचे मुख्य कार्यकारी अधिकारी सत्या नाडेला आणि SpaceX व टेस्ला कंपनीचे संस्थापक इलॉन मस्क ह्यांनी स्तुती केली आहे.

अडीच वर्षापासून अथक प्रयत्न, संयम, वैज्ञानिक संशोधन (Scientific approach) केले आहे. उदा. तुलनात्मक अभ्यास करण्यासाठी जवळच एआय तंत्रज्ञान न वापरलेल्या शेतामध्ये ऊसाची लागवड सारख्याच पद्धतीने केली आहे. वेगवेगळ्या जाती वर प्रयोग केले आहेत. म्हणजे तुलनात्मक आकडेवारी काढताना हवामान, जमीन, पाणी, लागवड पद्धत, जाती वगैरे घटक सारखेच ठेऊन, बदल (Variables) कमीत कमी ठेवले आहेत.

ह्या प्रयोगातून असा दावा करत आहेत की ह्या तंत्रज्ञानामुळे पाण्याची 40%, खतांची 30% बचत व 40% उत्पादन वाढ होते. शिवाय त्यामुळे जमिनीचे आरोग्य सुधारते. उपग्रह आधारित भौगोलिक प्रणाली, सॅटेलाईट मॅपिंग मुळे जमिनीतील अन्नद्रव्यांची अचूक माहीती मिळते. एखाद्या पानावर कोपऱ्यात पिकावरील किडीची सुरुवात झाल्यास ॲप लगेच सूचना देते व खताची नेमकी मात्रा, गरज कळते.

मातीतील ओलावा, तापमान आणि बाष्पीभवनच्या माहितीद्वारे सिंचनाचे व्यवस्थापन करता येते.

एआय बद्दलची एक उत्तम गोष्ट म्हणजे ती अविश्वसनीय वेगाने प्रचंड प्रमाणात डेटाचे विश्लेषण करू शकते.

तथापि, ह्या प्रयोगाचे व्यावसायिकरित्या नियमितीकरण करण्यापूर्वी खालील मुद्द्यांचा विचार व्हावा असे वाटते.

उसासाठी एआय च्या अंमलबजावणीत माझी चिंता आणि अडथळे खालील प्रमाणे:

1. ह्या प्रकल्पाची अंमलबजावणी करताना भारतीय उष्णकटिबंधीय (Indian Tropical conditions) च्या परिस्थितीनुसार आवश्यक ते बदल करण्यात यावेत.
2. बहुसंख्य शेतकयांची बुद्ध्यांक क्षमता (Intelligence quotient) पातळी आणि कौशल्य निपुणता लक्षात घेऊन हे ॲप वापरकर्ता अनुकूल (User friendly) असावे.
3. अंमलबजावणीची सुलभता (Ease of Implementation) ही महत्त्वाची बाब लक्षात ठेवली पाहिजे. जास्त वैज्ञानिक जटिलता, क्लिष्ट आणि अनावश्यक पॅरामीटर्स नकोत.
4. ऊस उत्पादकता सुधारण्याची पूर्वअट (Prerequisite) म्हणजे ठिबक सिंचनाची उपलब्धता हे बंधनकारक आहे.
5. त्यामुळे आमचे पहिले लक्ष्य ठिबक सिंचन 50% पर्यंत वाढवणे हे असले पाहिजे. ह्यात अनेक अडथळे आहेत. जसे की लॉटरी सोडत प्रणालीसाठी शेतकऱ्यांचे 3 लाख ठिबक अर्ज प्रलंबित आहेत. अनेक वर्षांपासून सरकारकडून 500 कोटी रुपयांचे अनुदान थकलेले आहे. काही ठिकाणी खुली प्रवाही सिंचन, कॅनॉल व्यवस्था आहे जिथे ठिबक करत नाहीत, वगैरे.
6. जमीनीतील सेन्सर इनपुट लक्षात घेऊन, वापसा पाहून सॉफ्टवेअर शेतात पाणी देण्याची अचूक वेळ सांगेल. मात्र त्यावेळी पाणी किंवा विद्युत पुरवठा उपलब्ध असेलच असे नाही. जेव्हा अतिवृष्टी होते, शेतात पाणी साचते तेव्हा ह्या सेन्सरचा काही उपयोग नाही.

7. ऊस तोड यांत्रिक पणे करताना एआय च्या सर्व संरचना काढून टाकणे आवश्यक असणार आहे. त्या परत स्थापित कराव्या लागतील.
8. अॅप रिअल टाईम डाटा दररोज देत असतो. परंतु शेतकऱ्यांचा सारखा सारखा जास्त हस्तक्षेप (interventions) टाळावा. नाही तर तो वैतागून जाईल.
9. सॅटेलाईट मॅपिंग सपोर्ट, भौगोलिक स्थान प्रणाली (GPS), IoT-इंटरनेट ऑफ थिंग्ज साठी नेटवर्कची उपलब्धता लागते. पण खराब नेटवर्क ही ग्रामीण दुर्गम भागातील गंभीर समस्या आहे. त्याचा विचार व्हावा.
10. ओव्हरहेड लाईट वायर, ट्रान्सफॉर्मर, पक्षी यांमुळे ड्रोनचे नुकसान, अकुशल ऑपरेटरमुळे होणारे अपघात याची काळजी घेतली जावी.
11. आंतरपीक घेता येणार नाही.
12. बारामती येथील क्षेत्रीय चाचण्या (field trials) सूक्ष्म नियंत्रण आणि देखरेखीखाली असल्याने संशोधन प्रयोगशाळेच्या चाचणी सारख्याच आहेत. त्यामुळे प्रत्यक्षात ज्यांनी एआय लागू केले आहे अश्या शेतकऱ्यांच्या प्रक्षेत्रावर प्रात्यक्षिक प्रकल्प राबवून त्या डेटाचा अभ्यास केला जावा. ती सर्व संभाव्य चलांसह वास्तविक फील्ड चाचणी आहे.
13. उसाची उंची जास्त असल्याने अतिरिक्त बांबू आधार रचना आवश्यक आहे. मशीन हार्वेस्टिंगमध्ये अधिक खर्च आणि अडचण येण्याची शक्यता आहे.
14. वन्य प्राण्यांच्या धुडगुसामुळे ही महागडी संरचना भुईसपाट होऊ शकते.
15. बऱ्याच शेतकऱ्यांनी आपल्या प्रयोगशील अनुभवातून (एआय विना) 150 टन एकरी उसाचा पल्ला गाठला आहे. त्यामुळे कृत्रिम आणि नैसर्गिक बुद्धिमत्तेचे सुवर्ण संयोजन केले जावे.
16. कोरडवाहू शेतकऱ्यांना एआय चा कसा उपयोग होईल ह्याचे संशोधन करण्यात यावे.
17. हे तंत्रज्ञान व्यक्तिगत पातळीवर परवडणारे नाही. कारण त्यात सुरुवातीचा व दरवर्षीचा रिचार्ज खर्च आहे. म्हणून शेतकरी उत्पादक कंपनीच्या लगतच्या किमान 50 शेतकऱ्यांनी एकत्र आले तर खर्च विभागला जाऊ शकेल.
18. 'ऑपरेटिंग एक्सपेन्सेस' (OPEX) - दैनंदिन कामकाजाची देखरेख करण्यासाठीचा खर्च, 'भांडवली खर्च' (CAPEX) व गुंतवणूक परतफेड कालावधी ह्याचा ताळेबंद मांडावा. अर्थात पैशात न मोजता येणारे अनेक इतर फायदे आहेत (Intangible benefits) जसे पाण्याची बचत, जमिनीचे आरोग्य वगैरे, त्याचाही विचार व्हावा.
19. सांगोल्यामध्ये माझ्या एका शेतकरी मित्राने 5000 डाळिंबाची झाडे लावली असून एआय चा वापर न करता, फक्त मातीतील ओलाव्या साठी सेन्सर, ऑटोमॅटिक वेदर स्टेशन लावून, ठिबक करून भरपूर बचत केली आहे. त्यामुळे सर्व काही एआय मुळेच होते हा दावा चुकीचा आहे.
20. एआय द्वारे माती परीक्षण जरी होत असले तरी जमिनीतील सूक्ष्म जीवणूची (Micro Organism) मोजणी ते करीत नाही, ही त्याची मर्यादा आहे. एका ग्रॅम मातीमध्ये किती तरी कोटी हे जीवाणू (TMC- Total Microbial Count) असावे लागतात.

वरील सूचनांचा विचार केला जावा. मगच त्याचे व्यापारीकरण झाले पाहिजे.

अन्यथा सेन्सर, ड्रोन, सॉफ्टवेअर, स्वयंचलित हवामान निरीक्षण केंद्र अशी उपकरणे बनवणाऱ्या कॉर्पोरेट कंपन्यांना नफा मिळेल आणि शेतकरी अजूनही लुटला जाईल.

महाराष्ट्र राज्याच्या 2025-26 च्या अर्थसंकल्पा प्रमाणे कृषि क्षेत्रामध्ये कृत्रिम बुद्धिमत्ता व अत्याधुनिक तंत्रज्ञानाच्या वापराचे धोरण आखण्यात येत आहे व दोन वर्षात त्यासाठी 500 कोटी रुपयांचा निधी उपलब्ध करुन देण्यात येणार आहे. ह्या बाबतच्या दोन्ही बाजू शेतकऱ्यांपर्यंत पोहोचविण्यासाठी हा लेख लिहला आहे. जेणे करून ह्यातील त्रुटी भारतातील परिस्थितीप्रमाणे दूर करून उत्पादकता वाढ, पाण्याची बचत, जमिनीचे आरोग्य, उत्पादन खर्च कमी करणे वगैरे उद्दिष्टे साध्य करता येईल व काळाच्या बरोबर राहता येईल.

हे प्रायोगिक टप्प्या मध्ये असल्यामुळे ज्या शेतकऱ्यांचे पोट फक्त शेतीवर आहे त्यांनी ह्या मध्ये सहभाग घेताना विचार करावा असे वाटते.

deshmukhsk29@gmail.com

खरा तो एकाची धर्म, जगाला प्रेम अर्पावे
– साने गुरुजी

टिप्पणी

कृषी व्यापारात अमेरिकेसमोर गुडघे टेकण्याची तयारी

योगेंद्र यादव

वाह, काय जुगलबंदी आहे! अमेरिकेबरोबर चालू असलेल्या व्यापार चर्चेमधल्या शेती विषयक बाबीवर नीति आयोगाचा पेपर वाचल्यावर माझी ही पहिली प्रतिक्रिया होती. तिथे अमेरिका सरकार धमकी देते की भारत सरकारने आपल्या कृषी आयात वरील शुल्क कमी करावे, नाहीतर..! इथे भारतातलेच सरकारी तज्ज्ञ दाखवतात की अमेरिकेकडून येणाऱ्या कृषी आयातीवर शुल्क कसं कमी करता येईल. तिथे अमेरिका दबाव टाकते आहे की भारताने बंदी घातलेली जेनेटिकली मॉडिफाईड (GM) सोयाबीन आणि मक्याची आयात मागे घ्यावी. इथे भारत सरकाराचे अधिकारीच भारताने GM वर घातलेली बंदी मागे घेण्यासाठी कारणं शोधत आहेत. दोघांचा ताळमेळ इतका खोल आहे की शंका येते – दोघांच्या विचारांचा आणि पैशांचा स्रोत एकच तर नाही ?

बोलायला, नीति आयोगाने या आठवड्यात प्रकाशित केलेल्या 'वर्किंग पेपर' मधे दोन तज्ज्ञांचे स्वत:चे विचार आहेत, पण त्याचे लेखक राका सक्सेनांबरोबर नीति आयोगाचे सभासद आणि मोदी सरकारच्या कृषी नीतिचे निर्माते डॉ. रमेश चंद असतील तर या पेपरमध्ये काहीही स्वत:चं नाही. आणि जर अमेरिकेबरोबर व्यापार डीलची मुदत संपण्या अगोदर काही दिवस आधी नीति आयोगाच्या वेब साईटवर 'अमेरिकेच्या नव्या व्यापार नीति अंतर्गत भारत-अमेरिका कृषी व्यापाराचे संवर्धन' या विषयावर शोध पेपर प्रसिद्ध होत असेल तर हा शोधाचा मामला नाही तर भारत सरकारच्या औपचारिक नीतिची अनौपचारिक घोषणा आहे. किंवा संबंधित पक्षांच्या प्रतिक्रिया अजमावण्याचा प्रकार आहे. जे काही असो, पण या पेपरच्या माध्यमातून भारत सरकार असा प्रस्ताव ठेवत आहे की, अमेरिकेबरोबर होणाऱ्या भावी व्यापार समझोत्यात हे सरकार अमेरिकेच्या कृषी विषयक मागण्या मान्य करायला तयार आहे.

मामला साधा आहे. गेल्या काही वर्षांपासून चीनने अमेरिकेची कृषी उत्पादनं खरेदी करणं कमी केलं आहे, त्यामुळे अमेरिकेची नजर आता भारताच्या कृषी बाजारावर आहे. गेल्या वर्षी अमेरिकेच्या कृषी मंत्रालयाने भारताच्या मांसाच्या उद्योगांबद्दल त्यांच्या अहवालात रिपोर्ट केलं होतं की येणाऱ्या काही वर्षांत भारतात चिकन फीड आणि डुकरांचं अन्न म्हणून सोयाबीनची मागणी वाढणार आहे. ही अमेरिकेला आपलं सोयाबीन आणि मका भारताला विकण्याची चांगली संधी आहे जर भारत सरकार त्यांच्यावरील आयात शुल्क कमी करेल आणि GM पिकांवरील बंदी उठवेल. या वर्षी भारत आणि अमेरिके दरम्यान व्यापार समझोता होण्यासाठी एक उच्च स्तरीय चर्चा पण झाली आहे. अमेरिकेच्या राष्ट्रपतीने त्यांच्या जशास तसे शुल्क बद्दलची घोषणा नव्वद दिवसांसाठी थांबवली आहे. ही मुदत ९ जुलैला पूर्ण होते आहे.

आता या संदर्भात तुम्ही नीति आयोगाच्या पेपर कडे बघा. पहिल्या २३ पानांमध्ये मोठ्या व्यावसायिक पद्धतीने भारतच्या कृषी निर्यातीची दशा आणि दिशेचं मूल्यांकन केलं गेलं आहे; भविष्यात येणाऱ्या आव्हानांचं विश्लेषण केलं आहे. पण त्या नंतर असं वाटतंय की हा अहवाल लिहित असताना जणू कुठून तरी फोन आला असावा. अचानक कृषी आयातीला एका पानात संपवत लेखक निष्कर्ष आणि सूचना वर आले आहेत. सुरुवातीला केलेल्या मूल्यांकनाचा आणि निष्कर्षाचा काहीही संबंध नाही. विश्लेषण आहे निर्यातीचं आणि सल्ला आहे आयातीसाठी. नीति आयोगाचं काम आहे भारताचं हित बघणं पण हा पेपर अमेरिकेची वकिली करताना दिसतो.

एकूणच नीति आयोग अपरिहार्यतेचा तर्क दर्शवतो – कारण की अमेरिका भारताच्या खाद्य उत्पादनासाठी मोठी बाजारपेठ आहे, त्यामुळे आपण अमेरिकेला निर्यात चालू रहाण्यासाठी अनुकूल वातावरण ठेवण्याचे सर्व प्रकारे प्रयत्न केले पाहिजेत. प्रत्यक्षात याच पेपरमध्ये निर्यातीचे दिलेले आकडे या म्हणण्याला पृष्ठी देत नाहीत. भारताच्या एकूण कृषी निर्यातीच्या १० टक्केसुद्धा अमेरिका खरेदी करत नाही, परंतु

कृषी व्यतिरिक्त अन्य गोष्टींच्या निर्यातीपैकी १८ टक्के गोष्टी अमेरिका खरेदी करते. या खोट्या तर्काच्या आधारावर हा पेपर शिफारिश करतो की भारत सरकारने अमेरिकेतून सोयाबीन आणि मक्याच्या निर्यातीला सूट द्यावी. या मध्ये GM ची जी अडचण आहे, त्याचं काय करायचं ? नीति आयोगाचा पेपर यावर मात करण्याची युक्ती सांगतो की सोयाबीन बिया आयात करण्या ऐवजी सोयाबीनचे तेल आयात करावे किंवा सोयाबीनच्या बिया आयात करुन त्यांचा उपयोग फक्त तेल काढण्यासाठी करावा. याच प्रकारे अमेरिकेकडून स्वस्त मका घेऊन त्याचा उपयोग फक्त बायोफ्यूल साठी करावा. अमेरिकी सफरचंद, बदाम आणि पिस्ता यांच्या आयातीत GM ची अडचण नाहीये, फक्त यांच्यावरील आयात शुल्क आपण कमी करावं.

तांदूळ आणि काळी मिरीवरील आयात शुल्क कमी करुन आपल्याला काही फरक पाडणार नाही; अमेरिका खूष होईल आणि आपलंही नुकसान होणार नाही. हे स्पष्ट आहे की हे फक्त सल्ले नाहीत तर सरकारी नीतिमध्ये होऊ घातलेल्या बदलांचे सूचक आहे. या ३० मे ला भारत सरकारने सोयाबीन आणि अन्य खाद्य तेलांचे आयात शुल्क २० टक्क्यांवरून कमी करुन १० टक्क्यांवर आणलं आहे. हा अहवाल हे शुल्क शून्यावर आणण्याची भूमिका मांडत आहे.

नीति आयोगाचे तज्ज्ञ हा प्रश्न विचारत नाहीत की, आपला कृषी बाजार अमेरिकेच्या आयातीसाठी खुला केल्यावर आपल्या शेतकऱ्यांवर काय परिणाम होईल? सोयाबीन आयात करण्याआधीच फटका खाणाऱ्या मध्य प्रदेश आणि महाराष्ट्राच्या सोयाबीन शेतकऱ्यांच्या पिकाला किंमत कशी मिळणार ? मक्याच्या आयातीनंतर पंजाब पासून बंगाल पर्यंत पसरलेल्या मका पिकवणाऱ्या शेतकयांना मक्याच्या पडणाऱ्या भावापासून कसे वाचवणार ? जर GM सोयाबीन आणि मका काहीही कारणाने देशात आले तर त्यांना भारतीय शेतीमध्ये पसरण्यापासून थांबवणे शक्य आहे का ? अमेरिकेसाठी आयात शुल्क कमी केल्याने काही पिकांवर परिणाम होणार नाही, पण याचा परिणाम या पिकांसाठी अन्य देशांबरोबर समझोता होत आहे त्यावर होणार नाही ? दूध, दुधाची उत्पादने आणि कोंबड्यांना या व्यापाराच्या माऱ्यातून कसं वाचवता येईल ? परंतु कदाचित ही चिंता नीति आयोगाच्या मानसपटलाच्या बाहेर आहे. हा प्रश्न किसान आंदोलनाला विचारायला हवा.

लक्षात घेण्यासारखी गोष्ट अशी की, जेव्हा जेव्हा राष्ट्रपती ट्रम्प भारत आणि पाकिस्तान युध्द थांबण्याचा दावा करतात तेव्हा प्रत्येक वेळी युद्धाच्या बदल्यात 'ट्रेड डील' चा उल्लेख करतात. तसंही डोनाल्ड ट्रम्प चा खरं बोलण्याशी काही संबंध नाही, पण तरीही अमेरिका आणि भारत यांच्यातील ट्रेड डील च्या मागे काही गहन जुगलबंदी तर नाही ना ?

yyopinion@gmail.com
अनुवाद: मीनल उत्तुरकर
meenalutturkar16@gmail.com

(वृत्तांत: पान ११ वरुन)

नीतीचा कामगार कायद्यामध्ये अंतर्भाव करण्यात यावा

९. असंघटित क्षेत्रातील महिलांसाठी कामाच्या जागी नियमित मोफत आरोग्य तपासणी, फिरते दवाखाने व पाळणाघरे इत्यादीची व्यवस्था करण्यात यावी.

१०. सर्व श्रमिक महिलांना ESI या सामाजिक सुरक्षा योजनेचा लाभ मिळावा किंवा त्या धर्तीवर योजना तयार करण्यात यावी

११. शासनाने heatwave चा आपत्ती व्यवस्थापनाच्या यादीत समावेश करावा

१२. पर्यावरण संकटाचे बळी ठरणाऱ्या समूहांना 'प्रकल्पग्रस्त' मानून त्यांचे सन्मानाने पुनर्वसन करावे

१३. जनसुरक्षा विधेयक २०२४ हे लोकशाही विरोधी असून अभिव्यक्ती स्वातंत्र्य, मतभेद व्यक्त करणे आणि संघटीत होण्याच्या संविधानिक अधिकारांना बाधा आणते. या विधेयकाचा गैरवापर सरकारविरोधात बोलणारे राजकीय, सामाजिक कार्यकर्ते, पत्रकार तसेच सामान्य नागरिक यांच्याविरोधात केला जाण्याची शक्यता आहे. त्यामुळे हे विधेयक संपूर्णत: मागे घेण्यात यावे, अशी आमची मागणी आहे.

अशा प्रकारे एका उत्साहपूर्ण वातावरणात परंतु प्रस्तुत काळातील अवघड आव्हानं स्वीकारून पुढील वाटचालीच्या मोठ्या निर्धाराने या परिषदेची सांगता झाली.

श्रमिक जगत

मॅन्युअल स्कॅवेंजिंगचे संपूर्ण निर्मूलन झाले पाहिजे, सफाई कर्मचारी आयोगाचा आदेश

जगदीश खैरालिया

मॅन्युअल स्कॅवेंजिंग निर्मूलन कायद्याचे कसोशीने पालन करण्याबाबत महाराष्ट्र राज्य सफाई कर्मचारी आयोगाचे अध्यक्ष यांच्या स्पष्ट सूचना!

महाराष्ट्र राज्य सफाई कर्मचारी आयोगाचे अध्यक्ष श्री शेरसिंह डागोर यांनी नुकताच ठाणे जिल्ह्यातील महानगरपालिका आणि ठाणे जिल्हाधिकारी कार्यालयात सफाई कामगारांच्या समस्यांवर शासनाच्या विविध योजना आणि निर्देशांच्या अंमलबजावणी बाबतीत सत्य परिस्थिती जाणून घेण्यासाठी दौरा आयोजित केला होता.

सर्वप्रथम ठाणे जिल्ह्यातील विविध शासकीय, निमशासकीय आणि स्थानिक स्वराज्य संस्थांच्या सफाई कामगारांसाठीच्या योजनांच्या अंमलबजावणीची स्थिती जाणून घेण्यासाठी जिल्हाधिकारी श्री शिनगारे यांच्या उपस्थितीत चर्चा झाली. महाराष्ट्र राज्य सफाई कर्मचारी आयोगाचे अध्यक्ष श्री शेरसिंह रूक्कनसिंह डागोर यांच्या अध्यक्षतेखाली दि. २४ जून २०२५ रोजी बैठक झाली. बैठकीत The Prohibition of Employment as Manual Scavengers and their Rehabilitation Act 2013 नुसार नुकसान भरपाई आणि मृतक सफाई कर्मच्ग्रयांचे आश्रितांचे सामाजिक न्याय आधारित पुनर्वसन बाबतीत चर्चा करताना मॅन्युअल स्कॅवेंजिंग म्हणजे मानवी मलमूत्र हाताळणी कोणत्याही प्रकारे होत असेल तर ती कामे करणाऱ्या सफाई कामगारांना या कायद्यानुसार त्यांचे सामाजिक न्याय आधारित पुनर्वसन करणे बंधनकारक असल्याचे त्यांनी सांगितले. सदरील काम करताना सफाई कर्मचारी मृत्युमुखी पडल्यास त्यांच्या आश्रितांना ताबडतोब नुकसान भरपाई आणि राहण्यासाठी घर, मुलांना शिक्षण, रोजगार – व्यवसाया साठी मदत आदी करणे ही त्या त्या आस्थापनांची कायदेशीर जबाबदारी कायद्यानुसार निर्धारित करण्यात आली आहे. ठाणे जिल्ह्यातील अधिक्षेत्रात नुकसान भरपाई ची अंमलबजावणी झाली असली तरी पुनर्वसन करण्यासाठी कोणतेही प्रयत्न झाले नसल्याचे चर्चेत स्पष्ट झाले. तसेच लाड – पागे समितीच्या शिफारशीनुसार सेवानिवृत्ती किंवा मृत्यू नंतर सफाई कामगारांच्या वारसांना तीस दिवसात त्यांच्या शैक्षणिक पात्रता नुसार नोकरी दिली पाहिजे. जो माणूस ३०–४० वर्षे शहरातील घाण साफ करून सेवा देतो त्याला आपले कायदेशीर ड्युज वेळेत अदा करणे ही स्थानिक स्वराज्य संस्थांच्या प्रशासनाची जबाबदारी आहे. डॉ बाबासाहेब आंबेडकर श्रम साफल्य आवास योजनेंतर्गत २५ वर्षे किंवा अधिक काळ सेवेनंतर सेवा निवृत्ती अथवा सेवेत असताना मृत्यू झाल्यानंतर सफाई कर्मचारी व त्यांच्या कुटुंबीयांना त्वरित मोफत मालकी हक्काची घरे देण्याची योजना सर्व शासकीय, निमशासकीय आणि स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये राबवणं बंधनकारक आहे. तसेच महाराष्ट्र शासनानच्या १९८७ च्या जी.आर. नुसार २५ ते ३० वर्षे सेवा निवासस्थानी राहतात अशा सर्व निवासस्थानामधील सफाई कामगारांना त्या घरांचे मालकी हक्काचे पट्टे संबंधित कामगारांचे नावे करण्याची योजना अंमलात आणली जावी. त्यासाठी जिल्हाधिकारी व महानगरपालिका प्रशासनाने स्पष्टपणे धोरण राबवणे बंधनकारक असल्याचे आयोगाचे अध्यक्ष यांनी लक्षात आणून देत विविध योजनांची अंमलबजावणी बाबतीत ब्ल्यू प्रिंट ठरवण्यासाठी जिल्हा स्तरावर नोडल ऑफिसर नेमणूक करून निश्चित कालावधी मध्ये कार्यवाही न झाल्यास संबंधित अधिकारी यांना जबाबदार धरून कारवाई करण्यात यावी असे ही सांगितले.

सफाई कामगार स्वत:चे आरोग्य धोक्यात घालून समाजाचे आरोग्य राखण्यासाठी आयुष्यभर झटतात त्यामुळे टीबी, चर्म रोग, डोळ्यांचे आजार, कॅन्सर, मेंदूचे आजार इत्यादी

अनेक आजारांना त्यांना आणि त्यांच्या मुळे कुटुंबीयांना देखील सामोरे जावे लागते. अशा वेळी त्यांच्या आरोग्याची काळजी घेण्यासाठी विशेष उपचार सुविधा देण्यासाठी वैद्यकीय विमा योजना लागू करावी. अशा सूचना महाराष्ट्र राज्य सफाई कर्मचारी आयोगाचे अध्यक्ष श्री शेरसिंह रूक्कनसिंह डागोर यांनी ठाणे जिल्हाधिकारी आणि ठाणे महानगरपालिका आयुक्त यांना आढावा बैठकीत दिले.

या वेळी ठाणे जिल्हा सर्वेक्षण समितीचे सदस्य व श्रमिक जनता संघ युनियनचे सरचिटणीस जगदीश खैरालिया यांनी कंत्राटदारांमार्फत नेमलेल्या सफाई कामगारांच्या समस्या मांडल्या. एकवीस हजार रुपयांहून अधिक वेतन असल्याचे कारण पुढे करून महापालिका कंत्राटी सफाई कामगारांची इएसआयएसची सुविधा प्रशासनाने अचानक बंद केल्यामुळे सफाई कर्मचारी आणि त्यांच्या कुटुंबीयांना कोणतीही उपचार सुविधा मिळण्याचे मार्ग बंद झाले आहे. त्यामुळे प्रिन्सिपल एंप्लॉयर आणि कंत्राटदार यांनी लेव्हीच्या रकमेतून इएसआयएसच्या तोडीची उपचार सुविधा लागू करण्याची मागणी केली. त्याचे समर्थन मा. अध्यक्ष श्री डागोर यांनी करत जिल्हाधिकारी, महापालिका प्रशासनाने कायमस्वरूपी आणि कंत्राटी कामगारांसाठी वैद्यकीय उपचार विमा योजना राबवावी अशी सूचना केली. कल्याण डोंबिवली महापालिकेच्या हद्दीत जून २०२३ मध्ये दूषित गटारात सफाई करतांना मृत्यूमुखी पडलेल्या ऋतिक कुरकटेच्या वारसांना नुकसान भरपाई आणि त्यांच्या पुनर्वसनासाठी ठाणे जिल्हा सर्वेक्षण समिती (मॅन्युअल स्केव्हेंजर) चे सदस्य सचिव यांनी समिती सदस्यांसह विजिट करून न्याय मिळवून देण्यासाठीही बैठकीत आदेश देण्यात आले. तसेच कल्याण डोंबिवली महानगरपालिका कार्यालयात झालेल्या आढावा बैठकीत ही महापालिका प्रशासनाने ऋतिक कुरकटेच्या वारसांना न्याय देण्याचे आदेश आयोगाचे अध्यक्ष यांनी दिले आहेत.

सफाई कामगारांना किमान वेतन कायद्यानुसार वेतन भत्ते आणि कायदेशीर सोयी सुविधा हा त्यांचा कायदेशीर हक्क आहे. ठाणे प्रादेशिक मनोरूग्णालयातील सफाई कर्मच्यायांना किमान वेतना बाबतीत ठाणे जिल्हाधिकारी यांना आठवण करून दिल्यावर त्यांनी त्यांना न्याय मिळवून देण्याचे आश्वासन दिले. अध्यक्ष श्री शेरसिंह डागोर यांनी जर ठेकेदार किमान वेतन कायद्यानुसार वेतन अदा करत नसेल किंवा वेळेवर वेतन अदा करत नसेल तर अशा ठेकेदारांना काळ्या यादीत टाकण्यात यावे. कंत्राटी कामगार कायद्याचे पालन झाले पाहिजे.

महाराष्ट्र राज्य सफाई कर्मचारी आयोगाचे अध्यक्ष श्री शेरसिंह रूक्कनसिंह डागोर यांनी ठाणे जिल्हाधिकारी प्रशासन आणि महापालिका प्रशासनांबरोबर चर्चा करताना लोकसंख्येच्या प्रमाणात सफाई कामगारांची पदे उपलब्ध होण्यासाठी शहरातील लोकसंख्येच्या प्रमाणात पद निर्मिती साठी महाराष्ट्र शासनाला प्रस्ताव पाठविण्याचे आवाहन ही यावेळी केले आहे. शासकीय विश्रामगृहात वाल्मिकी समाजातील विविध संस्था संघटनांच्या वतीने आयोगाचे अध्यक्ष श्री शेरसिंह डागोर यांचे भव्य स्वागत करण्यात आले. यावेळी ठाणे जिल्हा सर्वेक्षण समितीच्या वतीने जगदीश खैरालिया यांनी अध्यक्षांना विनंती केली की, प्रत्येक शहरात दौरा आयोजित करताना तेथील स्थानिक सफाई कामगारांना त्यांचे प्रश्न मांडण्यासाठी किमान दोन तासांचा वेळ सफाई कामगार जनता दरबार स्वरूपात दिला तर सामान्य माणसाला आपल्या अडचणी आयोगापुढे मांडता येतील. श्री शेरसिंह डागोर यांनी त्यास होकार ही दिला आहे.

यावेळी ठाणे जिल्ह्यातील विविध विभागातील अधिकारी, संबंधित महापालिका आयुक्तांसहित विविध खात्यांचे अधिकारी आणि अनुसूचित जाती मोर्चाचे अध्यक्ष बिरसिंह पारचा, ठाणे जिल्हा सर्वेक्षण समितीचे सदस्य व कामगार नेते जगदीश खैरालिया, चरणसिंग टांक, नरेश बोहित, बिरपाल भाल, नरेश भगवाने आदीसह ठाणे जिल्ह्यातील विविध सामाजिक व कामगार संघटनांचे प्रतिनिधी मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

shramikjk1959@gmail.com

आंदोलन अंकाची वर्गणी नियमित भरा!
जन आंदोलनांच्या वैकल्पिक निर्माण व संघर्ष लढ्यांना हातभार लावा!! वर्गणी online वा चेक/MO ने पाठवण्याचे तपशील पान २ वर पहा!!!

वृत्तांत

भूमिगत आवाज: आपल्या शहरांची पाठराखण करणाऱ्या कामगारांना सबल करण्याचा प्रयत्न

DASAM

नवी दिल्लीमध्ये आयोजित सांडपाणी सफाई कामगारांच्या कार्यशाळेत सांडपाणी व सेप्टिक टँक कामगारांच्या मृत्यूंचा अंत, सन्मान, न्याय आणि कामगार हक्क सुनिश्चित करण्यासाठी तातडीच्या सुधारणा करण्याचे आवाहन करण्यात आले.

दिल्ली येथे २४ मे २०२५ रोजी भारताच्या संविधान क्लबमध्ये “भूमिगत आवाज: आपल्या शहरांचा कणा असलेल्या कामगारांना सक्षम करण्याचा प्रयत्न'' या कार्यशाळेसाठी १०० हून अधिक सहभागी एकत्र आले ज्यामध्ये गटार व सेप्टिक टँक सफाई कामगार, कामगार संघटनांचे प्रतिनिधी, संशोधक, वकील, शैक्षणिक, पत्रकार व नागरी समाजातील सदस्य उपस्थित होते. ही कार्यशाळा भारतातील गटार व सेप्टिक टँकमधील टाळता येण्याजोग्या आणि मोठ्या प्रमाणात होणाऱ्या मृत्यूंविरोधात आणि मानवी प्रतिष्ठा, कायदेशीर सुरक्षा व सुरक्षित कामाचे हक्कसुनिश्चित करण्याच्या मागणीसाठी एक प्रभावी मंच ठरली.

ही कार्यशाळा दलित आदिवासी शक्ती अधिकार मंच (DASAM) आणि विविध कामगार संघटना व नागरी संघटनांच्या संयुक्त सहकार्याने आयोजित करण्यात आली होती. गटार साफ करणाऱ्या कामगारांच्या आवाजाला प्राधान्य देणारी ही कार्यशाळा त्यांना दररोज होणाऱ्या जीवघेण्या जोखमींचा सामना करत असतानाही कोणतीही संस्था किंवा शासनिक सुरक्षा न मिळण्याच्या वास्तवावर प्रकाश टाकणारी ठरली. सर्वोच्च न्यायालयाच्या वारंवारच्या निर्देशांनंतरही आणि कायदेशीर बंदी असूनही, धोकादायक हाताने मैलसफाई आजही सुरू आहे, ज्यामुळे अंमलबजावणी आणि राजकीय इच्छाशक्तीचा अभाव स्पष्ट होतो.

भारतामध्ये हाताने मैलसफाई करणारे कामगार सर्वात जास्त शोषित गटांपैकी एक आहेत. यापैकी ९२% कामगार हे प्राचीन काळापासून शोषित समुदायांमधील, विशेषत: दलित आहेत. हे कामगार सहसा खाजगी ठेकेदारांद्वारे किंवा अनौपचारिक पद्धतीने कामावर घेतले जातात, ज्यामुळे त्यांना नोकरीची हमी, योग्य वेतन, कायदेशीर संरक्षण व सुरक्षा साधनांची उपलब्धता मिळत नाही.

याच संदर्भात ही कार्यशाळा आयोजित करण्यात आली गटार कामगारांच्या संघर्षांकडे लक्ष वेधणे आणि त्यांच्यासाठी सुरक्षित, प्रतिष्ठायुक्त आणि न्याय्य कामकाजाच्या अटी निर्माण करण्यासाठी सामूहिक संवादाचे व्यासपीठ निर्माण करणे.

कार्यशाळेदरम्यान DASAMच्या तथ्यशोध अहवालाचे प्रकाशन करण्यात आले, ज्यामध्ये मे २०२४ ते मे २०२५ दरम्यान दिल्ली–एनसीआरच्या ग्रामीण व शहरी भागांत झालेल्या ११ पेक्षा अधिक मैलसफाईमधील मृत्यूंची नोंद करण्यात आली. हे मृत्यू बहुधा अपघात म्हणून झाकले जातात, ठेकेदार कामगारांशी कोणतेही औपचारिक संबंध आकारतात, जेणेकरून जबाबदारीपासून सुटका होईल. यात जातीभेद, संस्था स्तरावरील उदासीनता आणि शोषण स्पष्ट दिसते.

कार्यशाळेत हेमलता कंसोटिया (राष्ट्रीय संयोजिका, NCDRSAW) यांनी सांगितले की, स्वच्छता कामगारांना दीर्घकालीन गॅस संपर्कामुळे होत असलेल्या आरोग्याच्या गंभीर समस्या अजूनही अदखलपात्र व अप्रमाणित राहतात. त्यांनी कामगारांच्या आरोग्यावर परिणाम करणाऱ्या धोरणात्मक पोकळ्यांकडेही लक्ष वेधले. लहान शहरांतील मृत्यू व अपघातांवरचा ‘शहरी पूर्वग्रह‘ हा मुद्दाही त्यांनी उपस्थित केला.

मोहसिना अख्तर (राष्ट्रीय समन्वयक, DASAM) यांनी सांगितले की, महापालिका व पोलीस यंत्रणांकडून होणारी संस्थात्मक दुर्लक्षी ही समस्या मुळापासून गंभीर बनवते. अनेक प्रकरणांमध्ये एफआयआरही नोंदवले जात नाहीत, तर इतर प्रकरणे महिनोन्महिने 'चौकशीखाली' राहतात. ठेकेदार औपचारिक नोकरी असलीच नाही असे सांगून कायदेशीर कारवाई व भरपाई टाळतात. ही अपथ्य संस्था पातळीवरच खोलवर रुजलेली आहे, असे त्यांनी स्पष्ट केले.

धर्मेंद्र भाटी (अध्यक्ष, लाल झेंडा युनियन) यांनी ठेकेदारी व्यवस्थेतील कामगारांना दिल्ली जल बोर्डच्या वेतन यादीत सामील करण्याची मागणीकेली. अन्यथा शोषण व अपायकारक स्थितीत काम करणाऱ्या कामगारांना सुरक्षा मिळणार नाही, असे त्यांनी सांगितले.

डॉ. सुनील राम (समाज कार्यकर्ते) यांनी मृत्यू झाल्यानंतरच दिली जाणारी भरपाई चर्चेचा विषय ठरते, मात्र हे मृत्यू होऊच नयेत यासाठी कोणतीही योजना आखली जात नाही, हे स्पष्ट केले. या कामगारांना ना साधने, ना निधी, ना धोरणात्मक प्राधान्य दिले जाते, ही या समस्येची मुळं आहेत, असे त्यांनी ठासून सांगितले.

डॉ. सीमा माथूर (प्राध्यापिका, दिल्ली विद्यापीठ) यांनी सांगितले की, जात आणि लिंग यांमुळे कामगारांच्या ओळखीवर आणि त्यांच्या वागणुकीवर खोल परिणाम होतो. या कामाचे मानसिक परिणामही गंभीर असून, त्यांच्यावर कुठलीही सार्वजनिक चर्चा होत नाही.

कार्यशाळेत कामगारांनी दिलेल्या थरारक प्रत्यक्ष अनुभवांनी उपस्थितांना हादरवले. धोकादायक परिस्थिती, सुरक्षेचा अभाव, वेतनातील विलंब, अपमान व ओळखीचा अभाव हे वास्तव त्यांनी मांडले.

कार्यशाळेत पुढील तज्ज्ञांनी सहभाग घेतला:

- वीरेन्द्र गौर, अध्यक्ष, CITU दिल्ली–NCR
- हेमलता कंसोटिया, राष्ट्रीय संयोजिका, NCDRSAW
- वेद प्रकाश, अध्यक्ष, दिल्ली जल बोर्ड सांडपाणी विभाग मजूर संघटन
- डॉ. सुनीलम, सामाजिक कार्यकर्ते
- धर्मेंद्र भाटी, अध्यक्ष, महापालिका कर्मचारी लाल झेंडा युनियन (CITU)
- विजय कुमार बाळगुहे, उपाध्यक्ष, अखिल भारतीय श्रमिक संघ (दिल्ली प्रदेश)
- अजय हितेशी, सामाजिक कार्यकर्ते, गाझियाबाद
- आझाद सिंह देधा, अध्यक्ष, ऑल DJB एम्प्लॉईज वेलफेअर असोसिएशन
- डॉ. सीमा माथूर, प्राध्यापिका, दिल्ली विद्यापीठ
- मोहसिना अख्तर, राष्ट्रीय समन्वयक, DASAM
- वर्षा प्रकाश, पत्रकार

कार्यशाळा खालील मागण्यांसह संपन्न झाली:

- प्रत्येक मृत्यूवर त्वरित एफआयआर नोंदवणे, संबंधित कायद्यानुसार – विशेषत:
- मृत्यू झालेल्या कामगारांच्या कुटुंबांना किमान रु. ३० लाख भरपाई
- प्रत्येक मृत्यूची कालमर्यादेत न्यायिक चौकशी
- महापालिकेच्या अधिपत्याखाली सर्व सांडपाणी कामगारांना कायमस्वरूपी नोकरी
- ग्रामीण व शहरी भारतातील स्वच्छता कामकाजावर राष्ट्रीय लेखापरीक्षण
- आरोग्य व सुरक्षा प्रोटोकॉल्सची सक्तीची अंमलबजावणी, योग्य पीपीई व प्रशिक्षणासह

कार्यशाळा गटार कामगारांच्या व्यथा समोर आणण्याच्या दिशेने महत्त्वपूर्ण टप्पा ठरली व शासन, महापालिका व नागरी समाजाने एकत्र येऊन या अत्यावश्यक कामगारांसाठी सन्मान, सुरक्षितता व न्याय मिळवण्यासाठी प्रणालीगत सुधारणा लागू करण्याचे आवाहन केले.

8491052270

आंदोलन अंकाची ३० वर्षांची वाटचाल!
पुढील अंक
वर्षारंभ - स्वातंत्र्यदिन विशेषांक!
जन आंदोलनांचे संवाद माध्यम आता १७ व्या वर्षात!

आदरांजली

वाल्मिक थापर : या वाघाच्या गर्जनेचा प्रतिध्वनी सदैव उमटत राहणार !

आरती कुलकर्णी

"रणथंबोरच्या जंगलात सकाळी जीपने एक फेरफटका मारून येऊन मी जोगीमहलच्या बाल्कनीमध्ये रेंगाळत होतो... एवढ्यात 'चेंगिझ' एका सांबराचा पाठलाग करत सरोवराच्या काठापाशी येऊन पोहोचला. रणथंबोरचा बलाढ्य वाघ होता तो. ते शिंगवालं सांबर आणि चेंगिझ यांच्यात सरोवराच्या पाण्यात अशी काही झटापट झाली की, तळ्यात जोरदार फवारे उठले. त्याचा फायदा घेत सांबर मोठी उडी घेऊन पाण्यातून निसटून गेलं. चेंगिझची शिकार हुकली होती, पण त्याचा रुबाब कायम होता. सांबर त्याच्या हातून सुटून जाताना सरोवराच्या काठावर अनेक प्रकारचे चित्कार उमटले. तळ्याकाठच्या झाडांवरची माकडं, रानातले मोर यांच्यासह आणखीही काही पक्षी त्या गजरात सामील झाले होते... चेंगिझने एक हलकासा विराम घेतला. डावीकडे पाहिलं, उजवीकडे पाहिलं आणि आपणच निर्माण केलेल्या या गदारोळातून तो सरोवराकाठच्या गवतात दिसेनासा झाला. रणथंबोरच्या सरोवरावर रंगलेल्या एका महानाट्याचा मी साक्षीदार झालो होतो..."

रणथंबोरच्या वाघांचं असं जिवंत दर्शन घडवणारे व्याघ्रतज्ज्ञ वाल्मिक थापर आता आपल्यात नाहीत. पण या वाघासारख्या माणसाने गेली पाच दशकं वाघांच्या संवर्धनासाठी, भारतीय वाघांचा आवाज जागतिक पातळीवर पोहोचवण्यासाठी स्वत:ला वाहून घेतलं होतं. 'टायगर मॅन ऑफ इंडिया' अशी वाल्मिक थापर यांची ओळख होती. जंगलामध्ये पायी फिरून एवढे वाघ पाहिलेला मी जगातला एकमेव माणूस असेन, असं ते अभिमानाने म्हणायचे.

लघुपटनिर्माते असलेले वाल्मिक थापर १९७६ मध्ये दिल्लीहून ट्रेनचं तिकीट काढून राजस्थानमधल्या रणथंबोरला गेले. तेव्हा ते अवघे २३ वर्षांचे होते. ते सांगतात, "पहिल्याच भेटीत मी या जंगलाच्या प्रेमात पडलो. याच जंगलात मी पहिल्यांदा वाघ पाहिला तेव्हा त्याच्या पट्टेरी आकृतीचं ओझरतं दर्शन मला झालं होतं. त्याचे पट्टे माझ्या डोळ्यांत, मनात, श्वासात भिनत गेले. नंतर हाच वाघ मी तिथे तब्बल ३० दिवसांनी पाहिला. त्या काळी जंगलात सहजासहजी वाघाचं दर्शन होत नसे."

रणथंबोरच्या जंगलाचे संचालक फतेहसिंग राठोड यांच्याशी वाल्मिक थापर यांची भेट झाली आणि त्यांना गुरू मिळाला. फतेहसिंग यांनी त्यांना 'पद्मिनी' वाघिणीची अनेक रहस्यं सांगितली. याच पद्मिनी वाघिणीचा पाठलाग करताना वाल्मिक थापर यांचं वाघांचं संशोधन सुरू झालं.

वाघ शिकारीसाठी दबा धरून बसतो आणि त्याच्या भक्ष्यावर झडप घालतो. तो चित्त्यासारखा भक्ष्याचा पाठलाग करत नाही, हे सगळ्यांना माहीत होतं. पण रणथंबोरच्या जंगलात वाघ भक्ष्याचा पाठलाग करत सरोवरात उतरत असे. त्याच्या अशा शिकारीचं छायाचित्रण वाल्मिक थापर यांनीच पहिल्यांदा केलं आणि जगाला वाघाच्या अनोख्या क्षमतेचं दर्शन घडलं. याच जंगलात पायी फिरून वाघाचा माग घेताना एकदा एका वाघाने वाल्मिक थापर यांच्या डोक्यावरून झेप घेऊन ती वाट ओलांडली होती ! कितीतरी वेळा त्यांचा वाघांशी असा थेट सामना झाला आहे. 'आम्हाला घाबरवण्यासाठी वाघाने बऱ्याचदा आमच्यावर हल्ल्याचा पवित्रा घेतला, पण कधीही हल्ला केला नाही,' असं ते सांगत.

रणथंबोरचे ढाणे पट्टेरी वाघ, वाघिणी आणि त्यांच्या बछड्यांच्या रोमहर्षक कहाण्या थापर यांनी नोंदल्या आहेत. बछड्यांचा जन्म झाल्यानंतर वाघीणच त्यांचं संगोपन करते. त्यांना शिकार करायला शिकवते. पण याच जंगलात वाल्मिक थापर यांनी वाघ, वाघीण आणि त्यांचे बछडे असं छायाचित्र काढलं होतं. 'मी कुटुंबवत्सल वाघही पाहिला आहे,' असं ते म्हणत.

वाघाच्या गुहेमध्ये बछड्यांच्या जन्मापासून त्यांचं शिकारीचं प्रशिक्षण, पावसाळ्याआधी आणि नंतर पुन्हा जंगलात हद्दी आखण्याच्या त्यांच्या सवयी, याबद्दलची निरीक्षणं वाल्मिक थापर यांनी 'माय टायगर फॅमिली' या लघुपटात सांगितली आहेत. याच कुटुंबातल्या दोन सदस्यांची त्यांच्या कातडीसाठी आणि वाघनखांसाठी झालेली शिकारही त्यांनी पाहिली आहे...

१९३० च्या सुमाराला भारतात ४० हजार वाघ होते. पण शिकारीमुळे वाघांची संख्या घटत चालली होती. १९७३ मध्ये वाघांना वाचवण्यासाठी 'प्रोजेक्ट टायगर'ची स्थापना झाली. वाघांच्या शिकारीवर कायद्याने बंदी घालण्यात

आली. वाघांसाठी भारतभरात अभयारण्यं घोषित करण्यात आली. हा मान रणथंबोरलाही मिळाला.

वाल्मिक थापर सांगतात, ''फतेहसिंग राठोड मला म्हणायचे, एक दिवस रणथंबोर जगाच्या नकाशावर येईल. जगभरातून लोक इथे वाघ बघायला येतील. त्यांचं हे बोलणं ऐकून मला खूप हसू यायचं. फतेहसिंग... हे १९७७ आहे. या जंगलात आपण दोनदोन महिने वाघ बघत नाही. कसे येणार लोक? फतेहसिंग काही बोलत नसत. तू बघत राहा... एवढंच म्हणत.''

'प्रोजेक्ट टायगर' घोषित झाल्यानंतर रणथंबोर खऱ्या अर्थाने आकार घेऊ लागलं. जंगलात वाघासाठी काम सुरू झालं. सरोवरातून जलपर्णी काढण्यात आली. इथे राहणाऱ्या एक हजार गावकऱ्यांना आणि त्यांच्या जनावरांना बाहेर नेऊन राहायला जागा देण्यात आली. हे काम अजिबात सोपं नव्हतं, पण फतेहसिंग यांनी वाघ आणि या जंगलातली माणसं या दोघांनाही विश्वास दिला. रणथंबोरच्या जंगलात वाघ निर्धास्तपणे फिरू लागले. रणथंबोरच नव्हे, तर भारतभरातल्या जंगलात १९९० पर्यंत वाघांची संख्या ४ हजारांवर गेली होती!

वाघांवर संशोधन करत असतानाच वाल्मिक थापर अथकपणे लेखन, छायाचित्रण, लघुपटांचं काम करत राहिले. 'लिव्हिंग विथ टायगर्स', 'द सिक्रेट लाइफ ऑफ टायगर्स', 'सेव्हिंग वाइल्ड इंडिया' अशी १४ पुस्तकं त्यांनी लिहिली आहेत. बीबीसीने भारताच्या वन्यजीवनावर 'लँड ऑफ द टायगर' ही मालिका केली त्या मालिकेचे वाल्मिक थापर सूत्रधार होते.

दऱ्याखोऱ्यांमधल्या निबीड जंगलातून कॅमेरा फिरत येतो... लांबरुंद पंखांच्या गरुडाची भरारी टिपतो, गूढ संगीत ऐकू येत असताना त्या गरुडाच्या नजरेतून जंगलाकडे, झाडांच्या दाटीकडे आपण पाहतो, तेव्हा विस्मयचकित व्हायला होतं. अशाच डोंगरकड्यावरून वाघासारखंच रुबाबदार व्यक्तिमत्त्व असलेले वाल्मिक थापर भारतातल्या जंगलांची कहाणी सांगतात, तेव्हा आपल्याही मनात वाघासारखी हिंमत येते.

वाल्मिक थापर यांना वाघांसाठी झटणारी 'वन मॅन आर्मी' असं म्हणत असत. त्यांचा हा प्रवास एकांड्या शिलेदारासारखा असला, तरी या यात्रेत त्यांनी जगभरातल्या लोकांना सहभागी करून घेतलं होतं. वाघांसाठी नेमलेल्या अनेक कृतीदलांमध्ये त्यांचा सक्रीय सहभाग होता. वाघाच्या संरक्षणासाठी बड्याबड्या लोकांशी पंगा घेतानाही ते मागेपुढे पाहत नसत.

राजस्थानच्या 'सरिस्का नॅशनल पार्क'मधून सगळे वाघ गायब झाले, तेव्हा वाघांच्या संवर्धनासाठी एक कृती दल बनवण्यात आलं. तत्कालीन पंतप्रधान मनमोहनसिंग यांनी पुढाकार घेऊन व्याघ्रतज्ज्ञांची एक समिती स्थापन केली. सरिस्कासारखी स्थिती दुसऱ्या जंगलांमध्ये येऊ नये, हा त्यामागचा उद्देश होता. आपल्या जंगलांमध्ये वन्यजीव आणि आदिवासी यांच्यात सहजीवन असावं, असं या कृतीदलाच्या अध्यक्ष सुनीता नारायण यांचं मत होतं. पण वाल्मिक थापर यांनी त्याला कडवा विरोध केला. वाघाला वाचवायचं असेल, तर जंगलातले काही भाग फक्त वाघांसाठीच असले पाहिजेत, अशी भूमिका त्यांनी मांडली. 'लिव्ह द टायगर अलोन' हा त्या वेळी त्यांनी लिहिलेला एक लेखही खूप गाजला होता. नंतर मात्र वाल्मिक थापर यांनी लोकांच्या सहभागातून वाघांचं संवर्धन या संकल्पनेचा स्वीकार केला.

वाघ हा भारतीय जंगलांचा आत्मा आहे, असं सांगताना त्यांच्या डोळ्यांत एक वेगळीच चमक येई. वाघाच्या जंगलातून भारतातल्या ३०० नद्यांचा उगम होतो. वाघ आणि वाघाचं जंगल नष्ट झालं, तर आपलं जीवनच धोक्यात येईल, असं ते कळकळीने सांगायचे. वाघ महत्त्वाचा आहे, तसंच आपल्या अंगणातली छोटीशी चिमणी सांभाळण्यासाठी आपण धडपडलं पाहिजे, गिधाडांसारख्या निसर्गाच्या रक्षकांना आपण राखलं पाहिजे, हेही ते सांगत.

वाल्मिक थापर व्याघ्रतज्ज्ञ होते, पण एकूणच वन्यजीव संवर्धनाच्या क्षेत्रात त्यांच्या शब्दाला मान होता. पंतप्रधान नरेंद्र मोदींनी मध्य प्रदेशातल्या 'कुनो नॅशनल पार्क'मध्ये चित्ते आणण्याचा प्रकल्प सुरू केला, त्यालाही वाल्मिक थापर यांनी भीडभाड न ठेवता विरोध केला. आफ्रिकेतले चित्ते आणि आपल्याकडे आधी असलेले आशियाई चित्ते यांच्यात फरक आहे. दक्षिण आफ्रिका, नामिबिया इथलं हवामान आणि आपल्याकडचं हवामान वेगळं आहे. हे चित्ते इथे तगू शकणार नाहीत, असं त्यांचं थेट म्हणणं होतं. चित्त्यांच्या नव्या प्रकल्पापेक्षा वन्यजीव आणि माणूस यांच्यातल्या संघर्षावर उपाय काढण्यासाठी आपण झटलं पाहिजे, अशी त्यांची भूमिका होती.

वाल्मिक थापर त्यांच्या भूमिका अतिशय आक्रमकपणे मांडत. ते फटकळ आणि हेकेखोर आहेत, अशी टीका त्यांच्यावर होत असे. त्यालाही त्यांचं ठाम उत्तर होतं. "वाघाला वाचवा,

(पान ३० वर)

आस्वाद

चिरडल्या गेलेल्या आदिवासींचे म्हणणे ठासून सांगणारे, त्यांचा आवाज उजागर करणारे संशोधन

कुसुमताई अलाम

'सुरजागड: विकास की विस्थापन?' लेखक – अविनाश पोईनकर. हर्मिस प्रकाशन, पुणे. पाने १७०, मूल्य २०० रुपये या पुस्तकाचा परिचय आणि शिफारस.

तरुण लेखक–संशोधक अविनाश पोईनकर लिखित 'सुरजागड : विकास की विस्थापन ?' हे पुस्तक वाचून प्रत्येक लोकशाहीवादी माणूस अस्वस्थ होईल. 'पेसा' व 'वनाधिकार कायद्यां'च्या तरतुदीनुसार स्थानिक लोक आणि ग्रामसभांना त्यांच्या कार्यक्षेत्रातील जंगल व इतर संसाधनांचे संरक्षण व संवर्धन करण्याचे अधिकार आहेत. अशा स्थितीत सुरजागड पारंपरिक इलाख्यातल्या विविध ग्रामस्थांच्या हद्दीतील ग्रामस्थांनी कोणतेही ठराव केलेले नसताना आणि पूर्वमान्यताही दिलेली नसताना लोहखाणी प्रस्तावित करण्याचे काम कसे करण्यात आले, हा प्रश्न उपस्थित होतो.

अविनाश यांना या अभ्यासलेखनासाठी 'साधना साप्ताहिक' संयोजित 'तांबे-रायमाने युवा संशोधक पाठ्यवृत्ती' मिळाली. ही अभ्यासवृत्ती त्याला मोठ्या जबाबदारीचे भान देणारी ठरली. या आंदोलनाशी जवळपास तीन वर्षांपासून जुळून असल्याने अभ्यासवृत्तीच्या निमित्ताने पुन्हा शोध सुरू झाला. महाराष्ट्राच्या शेवटच्या टोकावरील अत्यंत महत्त्वाच्या व दुर्लक्षित विषयाला हिमतीने हात घालण्याचे धाडस या पाठ्यवृत्तीतून मिळाले. हे संशोधन एक खडतर अनुभव आहे, याची मी स्वत: साक्षीदार आहे. अविनाश अभ्यासक आहेच, पण संवेदनशील माणूसही आहे.

देशभरात खाणींविरोधात अनेक आंदोलने सुरू आहेत. आंदोलनांना बळाचा वापर करून दाबण्याचा प्रयत्न केला जात आहे. महाराष्ट्रात अतिसुरक्षित समुदायातील माडिया हा समुदाय या भागात आहे. हा समुदाय नक्षलप्रभावित परिसरात पोलीस–नक्षल संघर्षात होरपळून निघालाच आहे, पण आता खाण संघर्षात पिचला जातोय.

सुरजागड खाणीचा इतिहास २००५पासून सुरू होतो. २००७मध्ये लॉयड मेटल्स ॲन्ड एनर्जी प्रायव्हेट लिमिटेड कंपनीला ३४९.०९ हेक्टर क्षेत्र २० वर्षांसाठी लोहखाणकाम सुरू करण्याची मंजुरी देण्यात आली. हे संपूर्ण लीज क्षेत्र भामरागड राखीव जंगलात येते. हे सर्व करताना सार्वजनिक स्तरावर किंवा स्थानिक नागरिकांशी संवाद वा चर्चा केलेली नाही, हा नागरिकांचा आक्षेप आहे. २०११मध्ये स्थानिकांच्या विरोधास न जुमानता कंपनीने खनन सुरू केले. २०१३ ते २०१६ स्थानिक नागरिकांचा विरोध कायम होता. त्यात माओवादी चळवळ कंपनी विरोधात पुढे आली. नक्षली कारवायांना वेग आला. लॉयड मेटल्सचे उपाध्यक्ष जसपाल सिंह ढिल्लन यांनी खोदकाम करण्याचा प्रयत्न केला, नक्षल्यांनी त्यांची व त्यांच्या दोन अधिकाऱ्यांची हत्या केली.

२०१६मध्ये पुन्हा खोदकाम करण्याचा प्रयत्न केला, तेव्हा ७५ ट्रक जाळले गेले. २०१८मध्ये लॉयड कंपनीला ५० वर्षांपर्यंत लीज वाढवण्यासाठी १९५७च्या कायद्यात सुधारणा करण्यात आली. खाणींना परवानगी देताना पेसा, वनाधिकार, खाण खनिज अधिनियम, वनसंवर्धन इत्यादी कायदे डावलण्यात आल्याने २५ ऑक्टोबर २०२१ रोजी जिल्ह्यातील २५ खाणींविरोधात सुरजागड पारंपरिक इलाखा गोटुल समिती, जिल्हा ग्रामसभा स्वायत्त परिषद यांच्या पुढाकाराने हजारो आदिवासींनी उपविभागीय कार्यालय एटापल्ली येथे मोर्चा काढला.

या आंदोलनात नक्षलवादी सहभागी आहेत, असे म्हणत आंदोलन उधळून लावले गेले. आमचा सुरजागड पहाडीवरील ठाकुरदेव वाचवा, त्याला खोदून ट्रकमध्ये नेऊ नका, हा महिलांचा

आक्रोश शासनाच्या दडपशाहीने दाबून टाकला. या भागात आदिवासींच्या, महिलांच्या आरोग्याच्या, हिंसाचार व लैंगिक शोषणाच्या, हत्येच्या व आत्महत्यांच्या, रस्त्यावरील अपघातांच्या मालिकांच्या कहाण्या जंगलातच विरून जातात. संताप व्यक्त करता येत नाही, एवढी या भागात दहशत आहे.

संविधान हातात घेऊन लढणाऱ्या आंदोलकांच्या काय आहेत मागण्या?

१) अनुसूचित क्षेत्रातील तरतूदींचा भंग करून सुरू असलेले काम तातडीने बंद करून ग्रामस्थांची पूर्व परवानगी घ्यावी व संवैधानिकरित्या ज्या कामांकरिता ठराव केलेले आहेत, ती कामे प्राधान्याने करण्यात यावी.

२) अनेक वर्षांपासून वैधानिक ग्रामसभांचे ठराव पारित करून प्रस्तावित व मंजूर लोहखाणींना कायमस्वरूपी रद्द करण्याची मागणी केली असतानाही भारतीय खाण ब्यूरो आणि शासनाने दमकोंडवाहीसह सर्व लोहखाणी तातडीने रद्द कराव्यात.

३) सुरजाग येथील लॉयड मेटल्स कंपनीची अवैधरित्या सुरू असलेली नुकतीच एक कोटी टनाची वाढीव उत्खनन परवानगी तातडीने रद्द करावी.

४) सुरजागड येथील गोपानी आयर्न कंपनीला १५३.०९ हेक्टर आर जमिनीवर दिलेली प्रोस्पेक्टिंगच्या परवानगीला खोटे कागदपत्रे तयार करून उत्खननाची परवानगी मिळवण्याचे प्रयत्न केल्याबद्दल कंपनीवर फसवणुकीचे गुन्हे दाखल करून तातडीने लोहखाणीची परवानगी रद्द करावी.

ज्यांना मागासले समजून सतत हिणकसपणाने ज्यांचेकडे बघितले जाते, त्या अडाणी, अशिक्षित पण लोकशाहीच्या रस्त्याची, जीवनाची खरीखुरी दिशा असलेल्या आदिवासींच्या लढ्याच्या या पुस्तकात पूर्वपीठिकेसह अनेक कहाण्या आहेत. त्यांचे विश्लेषण आहे.

रायपूर येथील पर्यावरण संवर्धन कार्यकर्ते समरजित चटर्जी यांनी सुरजागड खाणींच्या विस्ताराविरुद्ध जनहित याचिका दाखल केली होती. केंद्र व राज्य सरकारसह इतर संबंधित प्रतिवादींना चार आठवड्यांत उत्तर सादर करण्याचा आदेश दिला होता, पण कोणीही त्याचे पालन केले नाही. वन संवर्धन व संरक्षण अधिनियम २०२३ हा संसदेत पावसाळी अधिवेशनात मंजूर करण्यात आलेला कायदा जंगलात राहणारे, जंगलामधील अडचण आहेत त्यांना बाहेर काढा, हे स्पष्ट करतो आहे.

वनहक्क कायद्याचे रोल मॉडेल म्हणून देशात नावारूपाला आलेल्या जिल्ह्यात जेथे खाणी सुरू आहेत आणि प्रस्तावित आहेत, तेथील जंगलाचे व्यवस्थापन करण्याचे अधिकार शासन ग्रामसभांना देईल का, हा महत्त्वाचा प्रश्न लेखक व संशोधक अविनाश पोईनकर यांनी पुस्तकातून उपस्थित केला आहे.

पाचवी अनुसूची, पेसा कायदा अंतर्गत आदिवासींना बळ दिलेले असताना त्याची अंमलबजावणी न करणे, हे आदिवासींच्या हक्कांना डावलून त्यांना दुर्बल बनवण्याचे षडयंत्र आहे. ग्रामसभेत घेतलेल्या निर्णयाला संसदसुद्धा नाकारु शकत नाही. डॉ.बी.डी.शर्मा यांनी 'ना लोकसभा ना विधानसभा, सबसे उंची ग्रामसभा' हे घोषवाक्य दिले होते. ते हृदयातून मेंदूत साठवून आदिवासी हक्काचे संरक्षण करण्यासाठी पुढे आले, तर शासनाच्या लेखी ते घोषित–अघोषित नक्षलवादी ठरतील, ही भीती आंदोलकांना भेडसावते. वनहक्काबाबतचा संभ्रम व घोळ आदिवासी विकासाच्या गतीला बाधा निर्माण करतो.

गडचिरोली प्रेस क्लबच्या वतीने गडचिरोली जिल्हा गौरव पुरस्कार हा जिल्ह्यातील विकासाची बांधीलकी असणाऱ्या कर्तृत्ववान व्यक्तींच्या सन्मानासाठी आहे. केवळ दोन–तीन वर्षांपासून गडचिरोलीत आलेले लॉयड मेटल्स कंपनीचे कार्यकारी संचालक बी. प्रभाकरन यांना हा पुरस्कार दिला जातो, तेव्हा जिल्ह्यातील पत्रकार व पत्रकारिता यावरही विचार करण्याची वेळ आली आहे. हे डोळस व अचूकपणे या पुस्तकात लेखकांने हेरले व लिहिले आहे. तेव्हा लेखक अविनाश पोईनकर मनाने आदिवासींच्या शाश्वत विकासाचे स्वप्न जगताना दिसतो.

ज्येष्ठ संपादक व विचारवंत सुरेश द्वादशीवार यांची या पुस्तकाला रोखठोक प्रस्तावना आहे. ही आकडेवारी जिंदालच्या मालमत्तेची आहे. १९९०पर्यंत मीठही न मिळणा–या, स्वस्त धान्य दुकान क्वचितच उघडली जात होती, जंगल ठेकेदारांनी दिलेली मजुरी, वनखात्याच्या मोसमी रोजंदाऱ्या, संपत आलेली शिकार, उपजिविकेचा अरुंद मार्ग, मानव विकास निर्देशांक ०.६०८ एवढा निकृष्ट, दुर्गम भागातील

ही लिखित–अलिखित आकडेवारी आहे. ४० टनाच्या रस्त्यावरून ८० टनाच्या किमान ६०० मालमोटारी दरदिवशी सुरजागडपासून बल्लारपूरपर्यंत येत असल्याने दगडा-मातीचे रस्ते चिखलात रुपांतरीत झाले आहेत. या मालमोटारींपैकी २०० मोटारी चंद्रपूर जिल्ह्यातील एका नेत्याच्या, १५० दुसऱ्या नेत्याच्या व सर्वपक्षीय काही पुढार्यांच्या आहेत. तात्पर्य, औद्योगिक घराणे, त्यांना साथ देणारे राज्य व केंद्र सरकार आणि स्थानिक पुढारी या साऱ्यांची विक्राळ युती गडचिरोली जिल्ह्यातील असुरक्षित आदिवासींच्या जीवावर उठलेली आहे.

सुरजागड पहाडीचा उपसा सुरू होऊन चार वर्षे झाली आहेत. या आदिवासींवर विस्थापित होण्याची वेळ आली आहे. या प्रकल्पाविरोधात आदिवासींनी शांततामय मार्गाने पण प्रखर आंदोलन चालवले आहे, या आंदोलनाला एकाही राजकीय पक्षाचा, मान्यवर पुढाऱ्यांचा पाठिंबा नाही. हा लढा समाजातील एखाद्या वरिष्ठ, मध्यम वा दलित वर्गाचा असता, तर त्यांच्या बाजूने सारा देश उभा राहिला असता. आपल्या वसाहती, उद्योग विस्तारण्यासाठी आदिवासींना देशोधडीला लावतात हा जगाचा इतिहास आहे. ही एका सैतानी सत्तेविरुद्ध मुंग्यांनी दिलेली लढत आहे. ही लढत यशस्वी होणे, हे लोकशाहीच्या विजयाचे लक्षण ठरणार आहे, असे मत प्रस्तावनेत सुरेश द्वादशीवार यांनी नोंदवले आहे.

या देशात भांडवलशाहीने जोर धरला आहे. मध्यमवर्ग भुरळलेल्या व दिशाहीन अवस्थेत आहे. यांना स्वच्छ हवा-पाणी-ध्वनी नको आहे का? जंगल म्हणजे केवळ जमिनीवर उभी असलेली झाडे नसतात. ती असतात आकाशाला नाते सांगत जीव-जंतू, पशु-पक्षी-माणसे जिवंत असणाऱ्यांच्या जीवनासाठी पावसाची हमी मागणारी, आजतागायत आदिवासींच्या पिढ्यांना शाश्वत रोजगार देणारी अर्थ व्यवस्था, ती उभी असतात तुमच्या-माझ्या जगण्याला श्वास देण्यासाठी. आदिवासींचे जंगल-जमीन हे संस्कृती व सभ्यता ही जीवनमूल्ये टिकवतात. समृद्ध पर्यावरण असलेल्या गडचिरोली जिल्ह्यातील ही झाडे, हे जंगल-जमीन-जल नष्ट करून कोणता विकास करणार?

तोडगट्टा येथील २५५ दिवस शांततेच्या मार्गाने केलेल्या आंदोलनाला चिरडून टाकताना त्या महिलांशी असभ्य वर्तन केले आहे. शासनाचे धोरण आदिवासी समूहाचे जीवनस्तर उंचावण्यासाठी कायदे योजना बनवणारे असताना आपणच बनवलेले कायदे मोडून काढायचे, ही कोणती नीती व धोरणे आहेत? ही लोकशाही नाही, तर लोकशाहीच्या रस्त्यावर भोगशाहीचे सुरुंग पेरले आहेत. आदिवासी महिलांचे शोषण करून, आदिवासींच्या संस्कृतीला नष्ट करून, जनतेला दारुच्या महापूरात गटांगळ्या खायला लावून देश आर्थिक महासत्ता होणार आहे का?

थोडक्यात, हे पोलीस-नक्षल-सरकार-भांडवलदार यात चिरडल्या गेलेल्या सर्वसामान्य आदिवासींचे म्हणणे ठासून सांगणारे, त्यांचा आवाज उजागर करणारे संशोधन आहे. केवळ गडचिरोलीच नव्हे जगभरातील जल-जंगल जमीन लढाईचा संघर्ष समजून घेण्यासाठी हा आश्वासक दस्तऐवज आहे.

('अक्षरनामा'च्या सौजन्याने)

(लेखिका गडचिरोलीतल्या आदिवासी साहित्यिका, माजी जिल्हा परिषद सदस्या व सामाजिक कार्यकर्त्या आहेत)

alamkusum24@gmail.com

(आदरांजली : पान २७ वरुन)

जंगलं वाचवा, असं मी तुम्हाला गुळमुळीत शब्दांत सांगत राहिलो, तर तुमच्यापर्यंत माझा आवाज पोहोचणारच नाही, पण हेच मी आक्रमक होऊन, ठामपणे आणि मोठ्या आवाजात सांगितलं तरच तुम्ही लक्ष देणार आहात, हे मला माहीत आहे. त्यासाठी मला वाईटपणा घ्यावा लागला तरी बेहत्तर !" असं ते डोळ्यात डोळे घालून सांगत असत.

वाल्मिक थापर यांच्या निधनानंतर जगभरातल्या वन्यजीव तज्ज्ञांनी त्यांना श्रद्धांजली वाहिली आहे. पण त्यांच्यासोबत वाघाची अनेक जंगलं पालथी घालणारे ज्येष्ठ व्याघ्रतज्ज्ञ डॉ. उल्हास कारंथ यांची प्रतिक्रिया अत्यंत बोलकी आहे. ते म्हणतात, "या वाघाची गर्जना आता शांत झाली आहे, पण तरीही भारताच्या जंगलांमध्ये त्याचा प्रतिध्वनी सदैव उमटत राहणार आहे...."

'अक्षरनामा'च्या सौजन्याने

लेखिका पर्यावरण प्रेमी मुक्त पत्रकार आहेत.

artikulkarni262020@gmail.com

टिप्पणी

धार्मिक द्वेषातून झालेल्या हिंसेला कायद्याच्या ढालीने प्रत्युत्तर

फैजल खान

२७ मे रोजी, खुदाई खिदमतगार संघटनेच्या हरियाणाचे नेते एम.एम. इस्लाम यांच्या नेतृत्वाखालील प्रतिनिधीमंडळाने फिरदौस आलम यांच्या घरी भेट दिली, ज्यांची हत्या द्वेषापोटी गुन्हा करून करण्यात आली होती. फिरदौस आलम ऊर्फ असजद बाबू पानिपतमध्ये शिलाईचे काम करत होते. २४ मे रोजी रात्री ८.३० वाजता ते आपल्या मित्र शहनवाजसोबत पानिपतच्या फ्लोरा चौकातील मोकळ्या जागेत फेरफटका मारायला गेले होते. परत येताना, तेथील किराणा दुकानदार नरेंद्र ऊर्फ शिशू लाल याने फिरदौसच्या डोक्यावरील टोपी काढून फेकून दिली. फिरदौसने ती टोपी उचलून पुन्हा घातली, पण नरेंद्रने पुन्हा टोपी काढून फेकली.

जेव्हा फिरदौस पुन्हा टोपी उचलायला गेले, तेव्हा नरेंद्रने रागात दुकानातून लाकडी काठी आणली आणि त्यांच्या डोक्यात मारली. मित्रांनी व नातेवाइकांनी पोलिसांना माहिती दिली. पोलिसांनी घटनास्थळी पोहोचून फिरदौस यांना शासकीय रुग्णालयात उपचारासाठी नेले, जिथे डॉक्टरांनी त्यांना रोहतक पीजीआयमध्ये रेफर केले. २५ मे रोजी सकाळी उपचारादरम्यान फिरदौस यांचा मृत्यू झाला. केवळ सात महिन्यांपूर्वीच त्यांचा विवाह झाला होता.

इंडस्ट्रियल सेक्टर २९ पोलीस ठाण्यात दाखल तक्रारीनुसार, पोलिसांनी आरोपीविरोधात खुनाचा गुन्हा दाखल करून शोध सुरू केला होता. नरेंद्र ऊर्फ शिशू लाल याला अटक करण्यात आली आहे. पोलीस उपनिरीक्षक सुभाष यांनी सांगितले की, चौकशीत आरोपीने फिरदौसला काठीने मारून ठार मारल्याची कबुली दिली आहे. गुन्ह्यात वापरलेली काठी पोलिसांनी आरोपीकडून जप्त केली असून, सोमवारी चौकशीनंतर आरोपीला न्यायालयात हजर करण्यात आले व न्यायालयीन कोठडीत पाठवण्यात आले आहे.

खुदाई खिदमतगार प्रतिनिधीमंडळाने फिरदौस यांच्या कुटुंबाला भेट देऊन सर्वतोपरी मदतीचे आश्वासन दिले. खुदाई खिदमतगार नेते एम.एम. इस्लाम म्हणाले की, अशा हल्ल्यांमुळे माणुसकीवरच आघात होतो आहे! आपण हे निर्भयतेने व एकत्र येऊनच परतवू शकतो! ते म्हणाले की, या प्रकारांमधून ते आपल्याला घाबरवण्याचा प्रयत्न करत आहेत, पण त्यांना समजले पाहिजे की, आपण कायद्याच्या चौकटीत राहून व सौहार्द राखून हा लढा लढू. आरोपीला अटक झाल्याबद्दल समाधान व्यक्त करत, त्याला कठोरातील कठोर शिक्षा व्हावी, अशी मागणी त्यांनी केली. त्यांनी तेथे उपस्थित लोकांनाही संबोधित केले.

napmconveners@googlegroups.com

(विषेश: पान १४ वरुन)

गोष्ट माणुसकीच्या विरोधी तसंच शैक्षणिक संस्थांमधील कुणी सरकारच्या धोरणाविरुद्ध आवाज काढू नये, असं बजावणारी कृती आहे.

अशोका विद्यापीठाने मात्र महमुदाबाद यांची टिप्पणी ही त्यांची वैयक्तिक होती, असं म्हणून अंग काढून घेतलं आहे. त्यांच्या एका माजी विद्यार्थ्यानं म्हटलंय की, विद्यापीठाची कृती ही मत व्यक्त करण्याच्या स्वातंत्र्यासाठी नाही. तर त्यांच्यावरील दबावानं सरकारला संतुष्ट करण्यासाठी केलेली दिसते. काही काळापूर्वी प्रताप भानू मेहता आणि अरविंद सुब्रह्मण्यम यांसारख्या विद्वानांवर ज्या प्रकारे दबाव आणण्याचा प्रयत्न झाला होता, त्याचीच ही नवी आवृत्ती दिसते.

पेचप्रसंग निर्माण झाला की, विद्वानांना वाऱ्यावर सोडण्याच्या विद्यापीठांचा पोकळपणा दाखवणारी ही घटना आहे, आणि विद्यमान भारतातला हा सर्वांत मोठा धोका आहे. भारताला महमुदाबाद यांच्या पोस्टमुळे धोका नाहीय, तर कुणी टीका केली की, ज्या प्रकारे त्याचा आवाज बंद करण्याचा संघटित प्रयत्न होतोय, त्याचा(च) 'खरा धोका' आहे.

('अक्षरनामा' च्या सौजन्याने)

(लेखक ज्येष्ठ पत्रकार आहेत.)

aashriketkar@gmail.com

महाराष्ट्र स्त्री मुक्ती परिषद - समाजाच्या स्त्रीवादी परिवर्तनासाठी

संगीता जोशी

स्वायत्त स्त्री चळवळीचे ५० वे वर्ष- १९७५ साली संयुक्त राष्ट्रसंघाने महिला वर्ष आणि महिला दशक जाहीर केले त्याला २०२५ साली ५० वर्षे पूर्ण होत आहेत. अर्धशतकी वाटचाल साजरी करण्यासाठी आणि चळवळीची भविष्यातील दिशा ठरवण्यासाठी महाराष्ट्रातील स्वायत्त स्त्री संघटना आणि स्त्रीवादी कार्यकर्त्या २०२४ च्या सप्टेंबरमध्ये एकत्र आल्या. स्त्री मुक्ती संघटनेच्या शारदा साठे यांनी पुढाकार घेऊन स्त्री कार्यकर्त्यांची पहिली बैठक मुंबईमध्ये घडवून आणली. डिसेंबर पर्यंत तीन आभासी स्वरूपातील बैठकामध्ये महाराष्ट्रातून संघटना आणि कार्यकर्त्या जोडत गेल्या. ५० वर्षात त्यांची कार्यक्षेत्रं, त्यांच्या स्त्रीवादाबद्दलच्या जाणीवा आणि कामाच्या पद्धती बदलल्या होत्या. पण त्यांच्यातील भगिनीभाव आणि समानतेच्या ध्यासाने त्यांना आज ही एकत्र बांधून ठेवले आहे. ११, १२ जानेवारी २०२५ रोजी स्त्री मुक्ती संघटनेच्या कोपरखैरणे येथील इमारतीत कार्यकर्त्यांची बैठक घेण्यात आली. स्त्री मुक्ती आणि स्त्रीवादाची समज अधिक व्यापक आणि सर्व शोषित घटकांना सामावून घेणारी झाली आहे याची प्रचिती आली. क्विअर, ट्रान्स व्यक्तींचे गट त्यांचे प्रश्न घेऊन सोबत आले. लिंगभाव विषमता, जातिव्यवस्था, धर्म, वर्गाची सरमिसळ समजून घेत सगळ्या विषमते विरोधात एकत्रित आवाज उठवण्याचा त्यांचा निर्धार पक्का झाला. सर्वांनी एकत्रित "महाराष्ट्र स्त्री मुक्ती परिषदेची" स्थापना केली. "समाजाच्या स्त्रीवादी परिवर्तनासाठी" पुरुषप्रधान विचारसरणी विरोधात जोरदार हल्लाबोल करण्यासाठी कंबर कसली. वर्षभरात विविध मोहिमा, कार्यशाळा, प्रकाशने करण्याचा निश्चय केला. आणि २०२५ च्या डिसेंबरमध्ये मुंबईत मोठी परिषद आयोजित करण्याचे ठरवले.

महाराष्ट्रातील स्त्री मुक्ती चळवळ – संयुक्त राष्ट्रसंघाने १९७५ साली जागतिक महिला वर्ष जाहीर केले आणि जगभरातील स्त्रीवादी कार्यकर्त्यांमध्ये उत्साहाचे वातावरण पसरले. स्त्रियांचे समाजातील दुय्यम स्थान, त्यांच्यावर होणारी हिंसा, प्रत्येक क्षेत्रात त्यांचे योगदान नाकारले जाणे याकडे समाजाचे लक्ष वेधले गेले.

घटनेने दिलेले स्वातंत्र्य, समता व समानतेचे हक्क प्रस्थापित करण्यासाठी त्यांनी स्त्री मुक्तीची ललकारी दिली. २८ ऑक्टोबर रोजी पुण्यात समाजवादी आणि साम्यवादी स्त्री कार्यकर्त्यांनी "स्त्री मुक्ती संघर्ष परिषद" भरवली. तिथून प्रेरणा घेऊन परतलेल्या मैत्रिणींनी स्वायत्त स्त्री संघटनांची स्थापना केली. यांमध्ये कामगार चळवळीत व सामाजिक आंदोलनात सक्रिय असणाऱ्या, नोकरी करणाऱ्या, विद्यार्थिनी, अभ्यासक आणि गृहिणी सामील झाल्या.

स्वातंत्र्य चळवळीत स्त्रियांनी मोठ्या प्रमाणात सहभाग घेतला होता. स्वातंत्र्य मिळाल्या नंतर समाजात आणि राजकारणात त्यांची पिछेहाट झाली. १९७० च्या आसपास सुरू असलेल्या आंदोलनात व कामगार चळवळीत स्त्रियांचे विभाग असत. पण त्यामध्ये स्त्रियांचे प्रश्न, त्यांच्यावर शतकानुशतके लादलेले दुय्यमत्त्व या विरोधात भूमिका घेतली जात नव्हती. त्यामुळे १९७५ साली जागतिक महिला वर्ष जाहीर झाल्यामुळे स्त्रियांवर होणाऱ्या अन्याय, अत्याचाराच्या विरोधात आवाज उठवण्यासाठी कार्यकर्त्यांना बळ मिळाले. १९७४ साली वीणा मुजुमदारांच्या अध्यक्षतेखाली "Towards Equality - समानतेकडे" हा अहवाल प्रसिद्ध झाला. आरोग्य, शैक्षणिक, आर्थिक, राजकीय आणि कायदे या क्षेत्रातील स्त्रियांची स्थिती दर्शवणारी आकडेवारी त्यात मांडली होती. स्त्रियांची शिक्षणातील गळती, असंघटित व असुरक्षित क्षेत्रातील रोजगारात स्त्रियांची वाढती संख्या, हुंड्याची क्रूर प्रथा, बालविवाह याविषयीची सत्य परिस्थिती समाजासमोर आली. या माहितीवरून आपल्या देशात सर्व क्षेत्रातील स्त्रियांचे दुय्यम स्थान आणि स्त्री-पुरुषामध्ये होणारा भेदभाव ठळकपणे दिसला. त्याच अहवालातून लिंगदराचे गुणोत्तर १००० पुरुषांमागे फक्त ९३२ स्त्रिया असल्याचे अत्यंत विदारक सत्य पुढे आले.

स्त्रीवाद - जगभर लिंगभाव संवेदनशीलता वाढली. स्त्रियांच्या नजरेतून जग बघण्याचा दृष्टिकोन रुजायला सुरुवात झाली. आपल्या देशातील स्त्रियाही आंतरराष्ट्रीय स्त्री चळवळीशी जोडल्या गेल्या. विसाव्या शतकाच्या सुरुवातीला यूरोप अमेरिकेतील कामगार स्त्रियांनी मतदानाचा हक्क, समान कामाला समान दाम, कामाचे नियमित तास, पाळणाघराची मागणी करण्यासाठी लढे दिले. विचारवंतांनी स्त्रीदास्याच्या कारणांचे विश्लेषण केले. त्यात धर्म, जाचक रूढी आणि परंपरांनी पुरुषप्रधान संस्कृती समाजात कशी खोलवर रुजवली आहे त्याचा इतिहास मांडला. स्त्रिया कुटुंबासाठी करत असलेल्या घरातील, शेतातील कामाचे मोल मोजलेच जात नव्हते. स्त्रियांच्या श्रमाने कुटुंबाच्या आणि पर्यायाने देशाच्या संपत्तीत भर पडते याची पहिल्यांदा दखल घ्यायला लावली. त्यांनी "भाकरी आणि गुलाब", "युद्ध नको, शांती हवी", "आमच्या शरीरावर आमचा अधिकार" अशा घोषणा देत जगभर आंदोलने केली. "स्त्री–पुरुष तुलना" हे ताराबाई शिंदे यांचे भारतातील पहिले स्त्रीवादी पुस्तक १८८२ साली प्रकाशित झाले.

स्वायत्त स्त्री चळवळीचा संघर्ष-इकडे भारतात ही स्त्रियांनी न्याय, कायद्यातील बदल, सत्तेतील वाटा आणि स्त्री-केंद्री धोरणे मिळवण्यासाठी यशस्वी संघर्ष केला. राष्ट्रीय महिला धोरण, लिंगभेदभाव आणि असमानतेच्या बळी असणाऱ्या स्त्रियांच्या विकासासाठी अर्थसंकल्पात जाणीवपूर्वक तरतुद करणारी 'Gender Responsive Budget', ग्रामसभा, जिल्हा परिषद आणि नगरपालिकांमध्ये स्त्रियांना ३३% आरक्षण या सारखी धोरणे शासनांनी स्वीकारली. स्त्रियांच्या चळवळीने केलेल्या आंदोलनांमुळे लैंगिक अत्याचार विरोधी, हुंडा प्रतिबंधक, गर्भलिंग चिकित्सा, बालविवाह प्रतिबंधक इत्यादी संदर्भातील कायद्यांमध्ये महत्वाचे बदल झाले. स्त्रीवर कुटूंबांतर्गत होणारी शारीरिक हिंसा, आर्थिक, मानसिक छळ ही घरगुती बाब नसून ते तिच्या मानवी अधिकारांचे उल्लंघन आहे. त्यापासून स्त्रीला न्याय मिळवून देण्यासाठी कौटुंबिक अत्याचार विरोधी कायदा २००५ साली अस्तित्वात आला.

स्त्रीवरील बलात्काराविरोधातील कायद्यात वेळोवेळी बदल झाले. कामाच्या ठिकाणी होणाऱ्या लैंगिक छळाविरोधात POSH (Prevention Of Sexual harassment at work place 2013) कायद्याची निर्मिती झाली. इतिहास, साहित्य, विज्ञान क्षेत्रातील स्त्रियांच्या योगदानाचे विश्लेषण करणे, स्त्रियांच्या क्षमता आणि विचारसरणी बद्दल पसरवलेली मिथके दूर करणे यासाठी स्त्रियांच्या दृष्टीकोनातून अभ्यास करणारी स्त्री अभ्यास केंद्र स्थापन केली.

नवी आव्हाने - गेल्या काही वर्षांत समाजातील अर्थिक, सामजिक, विषमतेचे बळी ठरणाऱ्या शोषित घटकांची संख्या वेगाने वाढली आहे. स्त्रियांवरील अत्याचारांची संख्या वाढते आहे. धार्मिक उन्माद, जातीभेद, प्रांतिक अस्मिता आणि आक्रमक राष्ट्रवादाच्या स्त्रिया ही वाहक बनलेल्या आढळतात. त्यामुळे स्वातंत्र्य लढ्याने आणि भारतीय संविधानाने निर्माण केलेल्या लोकशाही व धर्मनिरपेक्ष प्रक्रियेला धोका निर्माण झाला आहे. त्याचप्रमाणे चळवळींनी मिळवलेले स्त्रियांचे अधिकार नष्ट करण्याचा प्रयत्न सुरु आहेत. जगभर युद्धखोरीचे वातावरण तापत आहे. युद्धाची सर्वात जास्त झळ स्त्रिया आणि मुलांना पोचते. स्त्रियांवर प्रदूषण आणि पर्यावरणातील बदलाचे भयानक परिणाम होतात. भांडवली व्यवस्थेने पराकोटीची विषमता निर्माण केली आहे. खाजगीकरणाने स्त्रियांचे रोजगार हिरावून घेतले आहेत.

स्त्री मुक्तीची ललकारी - या परिस्थितीत स्त्रियांना पुन्हा एकदा लढ्यासाठी सज्ज व्हावे लागणार आहे. धर्मनिरपेक्ष व धार्मिक सद्भावनांच्या वातावरणातच स्त्रिया निर्भयपणे आणि सुरक्षित जीवन जगू शकतात. स्त्रीमुक्ती चळवळींनी सातत्याने लिंग, जात, धर्म, वर्गातील विषमतेच्या विरोधात संघर्ष केला आहे. या विषमतेतून निर्माण झालेल्या क्रूरता आणि अन्यायाचे समर्थन करणाऱ्या मनुस्मृतीला आमचा तीव्र विरोध आहे. आम्ही लोकशाही, धर्मनिरपेक्षता, स्वातंत्र्य, समता, मैत्री, न्याय या मूल्यांवर आधारित संविधाना सोबत आहोत. "आम्हाला मनुस्मृती नको, संविधान हवे." आमचा लढा मानवी हक्क संरक्षणाचा, मानवमुक्तीचा आहे. लिंगभेदावर आधारित श्रमविभागणी नष्ट होणे ही समाज जीवनाच्या सर्व क्षेत्रात स्त्री पुरुष समानता प्रस्थापित होण्यासाठी पूर्वअट आहे. संपूर्ण समाजाच्या मुक्तीच्या क्रमातच स्त्रीमुक्ती साकार होणार आहे.

streevadiparishad@msmporg.in

नर्मदा बचाव! मानव बचाव!!
हिंदी मराठी या गुजराती, लडनेंवाले एकही जाती!

वृत्तांत

‘पर्यावरण दिना’पलीकडे...

NACEJ

भारतातील सार्वजनिक ठिकाणांचे, माणसांचे व सर्व प्रजातींचे रक्षण करण्यासाठी चालू असलेल्या दैनंदिन पर्यावरणीय न्यायाच्या लढाया यांचा गोषवारा...

५ जूनला जगभरात ‘जागतिक पर्यावरण दिन‘ साजरा होत असताना, नॅशनल अलायन्स फॉर क्लायमेट अ‍ॅण्ड इकॉलॉजिकल जस्टीस (NACEJ) — जो नॅशनल अलायन्स ऑफ पीपल्स मूव्हमेंट्स (NAPM) चा अखिल भारतीय मंच आहे यांच्यावतीने ६ जून रोजी एक ऑनलाईन पत्रकार परिषद आयोजित करण्यात आली. यामध्ये देशभरातील विविध भागांतील पर्यावरण न्यायासाठी लढणाऱ्या संघर्षांचे अनुभव शेअर करण्यात आले.

प्रसिद्ध पर्यावरण कार्यकर्ते सौम्या दत्ता यांच्या संयोजनाखाली पार पडलेल्या या परिषदेला प्रसारमाध्यमे व चळवळी दोघांचाही चांगला प्रतिसाद मिळाला.

१२ वर्षांच्या हसदेव संघर्षाच्या अनुभवातून बोलताना, अलोक शुक्ला यांनी छत्तीसगडमध्ये दडपशाहीच्या छायेत सुरू असलेल्या पर्यावरणीय विनाशाकडे लक्ष वेधले. त्यांनी सांगितले की ४० कोळसा प्रकल्पांमुळे सुमारे ४ लाख हेक्टर जंगल नष्ट होणार असून, हा तोटा भरून काढता येणार नाही असा गंभीर इशारा दिला.

काश्मीरमधून नसीर दार यांनी बोलताना, अनियंत्रित पर्यटनामुळे पर्वतीय भागांतील मच्छीमार व पशुपालनावर आधारित समुदायांवर होत असलेल्या नकारात्मक परिणामांची माहिती दिली. त्यांनी सांगितले की, वूलर तलाव तसेच इतर जलाशयांतील मच्छीमार समुदायांनी जमीन व पाण्याच्या हक्कासाठी संघर्ष सुरू ठेवला आहे, जरी त्याकडे सरकारने दुर्लक्ष केले असले तरी. त्यांनी बदलत्या हवामानामुळे नैसर्गिक स्रोतांवर होत असलेल्या परिणामांची, अनियमित पावसाची व त्यातून निर्माण होणाऱ्या उपजीविकेवरील संकटांचीही गंभीर दखल घेतली.

चेन्नईहून विश्वजा यांनी ‘वेस्ट टू एनर्जी (Waste to Energy)‘ प्रकल्पांच्या नावाखाली सुरू असलेल्या पर्यावरणाच्या विनाशाला जोरदार विरोध केला. त्या म्हणाल्या की, हे प्रकल्प केवळ पर्यावरणीय धोका नाहीत ज्यामुळे आद्रभूमी व जैवविविधतेवर परिणाम होतो तर हा सार्वजनिक आरोग्याचाही गंभीर प्रश्न आहे आणि विशेषत: उत्तर चेन्नईसारख्या भागांमध्ये जातीय विषमतेला आणखी तीव्र करत आहेत, जिथे आधीपासूनच ऐतिहासिक दृष्ट्या वंचित समुदाय राहतात आणि ४० हून अधिक ‘रेड कॅटेगरी’ औद्योगिक प्रकल्प चालू आहेत.

भारतातील सर्वात प्राचीन भूगर्भशास्त्रीय व पर्यावरणीय वारशासाठी लढणारे अग्रगण्य कार्यकर्ते कैलाश मीणा आणि नीलम अहलुवालिया यांनी ७०० किमी लांब अरावली पर्वतरांगेत रिअल इस्टेटच्या नावाखाली सुरू असलेल्या बेफाम खाणकामाचा आणि पर्यावरण विनाशाचा तीव्र निषेध केला.

नीलम आहलुवालिया म्हणाल्या की, *People for Aravalis* या समूहाने सरकारला सादर केलेल्या सिटिझन्स रिपोर्टमध्ये स्पष्ट केले आहे की हरियाणामधील अरावली भागात परवाना प्राप्त खाणकाम व स्टोन क्रशिंग युनिट्स नियमांचा सातत्याने भंग करत आहेत.

कैलाश मीणा यांनी सांगितले की, खाणकाम व स्टोन क्रशिंगमुळे पाण्याची, जमिनीची व हवेमध्ये प्रदूषण होत आहे, आणि त्यामुळे अनेक लोक फुफ्फुस, मूत्रपिंड, यकृत व त्वचेसंबंधी आजारांनी त्रस्त आहेत. टेकड्या नष्ट होत असल्याने गाय-गुरांसाठीची कुरणे व औषधी वनस्पतीही लोप पावत आहेत. जमिनीखालील पाण्याची पातळी १००० ते २००० फूटांपर्यंत खाली गेली असून, पिकांवर स्टोन क्रशिंगमधून उडणाऱ्या सिलिका धुळीचा थर जमा होत आहे, ज्यामुळे उत्पन्न घटत आहे. राष्ट्रीय हरित लवाद (NGT) च्या आदेशांचीही सर्रास पायमल्ली होत आहे.

राजकुमार सिन्हा यांनी नर्मदा नदीवर उभारण्यात आलेल्या अनेक धरणांमुळे झालेल्या पर्यावरणीय परिणामांवर प्रकाश टाकला. त्यांनी विशेषत: धरणांमध्ये मासेमारीवर झालेल्या परिणामांचे उदाहरण देत सांगितले की, मच्छीमार समुदायांची उपजीविका मोठ्या संकटात सापडली आहे. २००९ पासून सुरू असलेल्या आदिवासी नेतृत्वाखालील

(पान ३६ वर)

डॉ. शरदचंद्र शंकर कुलकर्णी
भारतीय शैक्षणिक तंत्रविज्ञानाचे जनक

डॉ. शरदचंद्र कुलकर्णींच्या क्रमाधिक्त अध्ययनाने सुरु झालेल्या अनेक प्रयोगांचे फलित म्हणजे आजची "शैक्षणिक तंत्रविज्ञान" ही अतिशय उपयुक्त अशी ज्ञानशाखा. या विषयासंबंधी मला भावलेले डॉ. कुलकर्णी यांचे तीन महत्त्वाचे विचार येथे मांडते.

विद्यार्थ्याला केंद्रीभूत मानणारी शिक्षण प्रणाली हे डॉ. कुलकर्णींचे ध्येय होते. पण विद्यार्थ्याला सतत काही ना काही मदत करीत राहून त्याला आपल्याबरोबर शेवटपर्यंत अवलंबून ठेवण्याऐवजी अध्ययन कौशल्ये शिकवावीत म्हणजे नवीन विषयही त्यांना स्वतःच शिकता येईल आणि आयुष्यभरासाठी ते उपयोगी पडेल. ते म्हणत, टेकडी चढतांना विद्यार्थ्यांबरोबर शेवटपर्यंत जाण्यात काहीच अर्थ नाही. याची दोन कारणे. एक, असाने ते विद्यार्थी स्वतः टेकडी आत्मविश्वासपूर्वक शेवटपर्यंत चढू शकणार नाहीत, आणि दुसरे, शिक्षकाच्या उणीवा (कमतरता) विद्यार्थ्यांच्या पुढे जाण्यात अडथळा ठरू शकतात.

डॉ. कुलकर्णींना शिक्षकाची कुंभाराशी केलेली तुलना अजिबात मान्य नव्हती. ते म्हणत, विद्यार्थी हा मातीचा गोळा नाही आणि शिक्षक म्हणजे या मातीच्या गोळ्याला आकार देणारा कुंभार नाही. प्रत्येक रोपाप्रमाणेच प्रत्येक विद्यार्थ्याकडे स्वतःची आवड, पात्रता असते. शिक्षक म्हणजे माळी आहे आणि माळी ज्याप्रमाणे प्रत्येक रोपाकडे काळजीपूर्वक लक्ष देतो, प्रत्येक रोपाला किती सूर्यप्रकाश हवा, किती पाणी, किती खत हवं ते पाहतो, आणि त्यांच्या गरजेप्रमाणे प्रत्येकाला त्या त्या गोष्टी पुरवितो तसेच शिक्षकाने देखील प्रत्येक विद्यार्थ्यांच्या गरजा समजावून घेऊन त्याला स्वतःचा नैसर्गिकरित्या पूर्ण विकास करून घेण्यासाठी वातावरण निर्माण केले पाहिजे.

त्यांनी मांडलेला आणखी एक महत्त्वाचा विचार म्हणजे **डेटा (data) ते शहाणपण (Wisdom) प्रतिमान.**

विद्यार्थ्यांना आधी Data चे रूपांतर Information मध्ये करण्यास शिकवावे. पण यापेक्षाही महत्त्वाचे कौशल्य आहे ते माहितीपासून ज्ञान निर्मिती करण्याचे. माहिती मिळविणे, त्याचे ज्ञानात रूपांतर करणे, तसेच ज्ञानाबद्दलचे विश्वसनीय स्रोत शोधण्याच्या क्षमता विकसित करणे ही खूप महत्त्वाची उद्दिष्टे आहेत. केवळ खूप माहिती मेंदूत साठवून ठेवणे अनुत्पादक ठरते. त्यांच्या मते "**शहाणपण**" हे शिक्षणाचे सर्वोच्च उद्दिष्ट असले पाहिजे. फारसे ज्ञान नसलेली पण **शहाणपण** असलेली व्यक्ती एकवेळ समाजाचा फारसा विकास कदाचित करू शकणार नाही, पण **शहाणपण** नसलेले ज्ञान मात्र समाजाला हानिकारक ठरू शकते याबद्दल त्यांना खात्रीच होती.

प्रा. डॉ. जयश्री शिंदे
अधिष्ठाता, आंतरविद्याशाखीय अभ्यास विद्याशाखा (अति. भार)
प्राध्यापक, शैक्षणिक तंत्रविज्ञान विभाग, श्रीम. ना. दा. ठाकरसी महिला विद्यापीठ, मुंबई

MKCL
MS-CIT
MKCL KLiC Courses
iLike

Marathi-Monthly - Andolan Shashwat Vikasasathi, Editor-Medha Patkar. Date of Publication 1st of every month
RNI No. MAHMAR/2009/30128

(वृत्तांत: पान ३४ वरुन)

चुटका अणुऊर्जा प्रकल्पाविरोधातील संघर्ष अद्याप सुरू असतानाच, आता बरगी धरण परिसरात आणखी एक अणुऊर्जा प्रकल्प प्रस्तावित केला जात आहे. शेवटी त्यांनी नर्मदा नदीच्या संपूर्ण खोऱ्यावर आधारित धरणांचे खर्च आणि फायद्यांचे सखोल पुनरावलोकन करण्याची मागणी केली.

विविध प्रश्नांमध्ये दुवा साधत मेधा पाटकर यांनी राज्याच्या पूर्णपणे चुकीच्या प्राधान्यक्रमांवर, अ-लोकशाही निर्णयप्रक्रियांवर व प्रकल्पांना दिल्या जाणाऱ्या मनमानी मंजुरींवर तीव्र टीका केली आणि सांगितले की हे सर्व भारतीय संविधानाच्या उल्लंघनातूनच घडत आहे. त्यांनी हेही अधोरेखित केले की हवामान बदलाचे परिणाम कोट्यवधी असंघटित कामगारांवर विशेषत: बांधकाम क्षेत्रातील मैदानी कामगारांवर फार गंभीर पद्धतीने होत आहेत, आणि म्हणूनच हवामानविषयक धोरणे व कामगार हक्क यांची एकत्रितपणे हाताळणी करण्याची गरज आहे.

पुणे रिव्हरफ्रंट प्रकल्पाविरोधातील संघर्षाच्या अनुभवावर आधारित बोलताना संतोष लालवानी यांनी नदीच्या नैसर्गिक प्रवाहाला अडथळा आणणाऱ्या चुकीच्या पायाभूत धोरणांवर कठोर टीका केली. ते म्हणाले की, शासनांनी शहरीकरण व नदी व्यवस्थापनाच्या संदर्भातील योजना पूर्णपणे पारदर्शक व जबाबदार पद्धतीने मांडणं आवश्यक आहे.

मलयमित लेप्चा यांनी सिक्कीममधील तीस्ता नदीवर सुरू असलेल्या अनेक जलविद्युत प्रकल्पांमुळे झालेल्या पर्यावरणीय हानीकडे लक्ष वेधले, आणि राज्याने जो पुनर्वसन व पुनर्स्थापनेचा दावा केला होता, तो प्रत्यक्षात पूर्णपणे अपयशी ठरल्याचे उघड केले. त्यांनी असा प्रश्न उपस्थित केला की, २०२३ मध्ये सिक्कीममध्ये झालेल्या महापुराला केंद्र सरकारने राष्ट्रीय आपत्ती का घोषित केले नाही? आणि तेस्ता– ३ धरणाच्या पुनर्बांधणीला इतकी घाई का केली जात आहे?

तेलंगणातील रवि कन्नेगंती यांनी राज्यातील मोठ्या प्रकल्पांमुळे शेतीची जमीन वळवली आणि नष्ट होत असल्याचे निदर्शनास आणले. १९,००० एकरावर प्रस्तावित असलेला फार्मा सिटी भविष्यात ३०,००० एकरांवर विस्तारणार आहे. त्यांनी डमगुंडम येथील २,९०० एकर अविकसित जंगल जमीन नौदलाच्या रडार स्टेशनसाठी जनसंपर्क न घेता वळवण्यावरही निषेध व्यक्त केला.

मलायका यांनी मुंबईतील आपत्तीजनक समृद्ध किनारपट्टी रस्त्याच्या प्रकल्पामुळे संभाव्य पर्यावरणीय विनाशाबाबत सांगितले. मासेमारी संघटनांनी वारंवार त्यांच्या उपजीविका व मासेमारीच्या ठिकाणांवर होणाऱ्या परिणामाबाबत चिंता व्यक्त केली आहे. विशेषत: ५१,००० खारफुटी झाडे आणि ९,००० खारफुटीची तोड यामुळे होणारा धोका गंभीर आहे.

NACEJ आदिवासी आणि स्थानिक समुदायांच्या नेतृत्वाखालील ओडिशा व अरुणाचल प्रदेशमधील महत्त्वाच्या तळागाळ संघर्षांना पाठिंबा देत आहे. ओडिशाचे प्रफुल्ल समंतरा आणि अरुणाचलचे इबो मिली या दोघेही सहभागी झाले, पण कनेक्टिव्हिटी समस्या असल्यामुळे बोलू शकले नाहीत. राज्याकडून होणारी दडपशाही आणि सैन्यीकरणाची पद्धत खूपच निंदनीय आहे. आम्ही सैन्यीकरणाऐवजी अरुणाचलच्या सियांग व्हॅलीतील नष्ट होणाऱ्या जलविद्युत प्रकल्पांचा आढावा घेण्याची आणि समुदायांशी संवाद साधण्याची मागणी करतो.

पत्रकार परिषद शेवटी पॅलेस्टाईन साठी पूर्ण एकजूट व्यक्त करत संपन्न झाली, जिथे इस्रायली सरकारकडून घडत असलेल्या जनसंहाराला विरोध दर्शवण्यात आला.

NACEJ या संस्थेचा विश्वास आहे की पर्यावरणीय आणि हवामान न्यायासाठीचे संघर्ष सार्वत्रिक आणि दैनंदिन आहेत. लोकांचे सामर्थ्यशाली आवाज राज्य आणि कॉर्पोरेट्स यांच्या ग्रीनवॉशिंगच्या छटांना उघड करून टाकतात, जरी ते अनेक उल्लंघनांत गुंतलेले असले तरी.

nacej.napm@gmail.com

To

‘शाश्वत विकास न्यास’च्या मालकीचा ‘आंदोलन-शाश्वत विकासासाठी’चा हा अंक संपादक, मुद्रक, प्रकाशक मेधा पाटकर यांनी ‘श्री गुरुकृपा प्रिंटर्स’ १२१, अलाइड इंडस्ट्रियल इस्टेट, राम पंजवानी मार्ग, माहिम, मुंबई ४०००१६ येथे छापून दादर, मुंबई येथून प्रकाशित केला.
प्रेषक : द्वारा केमिकल मजदूर सभा, २९-३०, पहिला मजला, ‘ए’ विंग, हाजी हबीब बिल्डींग, नायगाव क्रॉस रोड, दादर (पूर्व), मुंबई